
# जिनधर्म प्रवेशिका

( मराठी )



ॐ

(भगवान महावीरांचे 2600 वे जन्मजयंती वर्ष)

# जिनधर्म-प्रवेशिका

लेखक व संपादक :

**ब्र० यशपाल जैन**

एम. ए., जयपूर

पद्यानुवाद :

**मधुकर गडेकर**

एम. ए., बी. टी. विशारद, हिंदी भाषा रत्न, नागपूर

प्रकाशक :

**पंडित टोडरमल स्मारक ट्रस्ट**

ए-4, बापूनगर, जयपूर (राजस्थान) - 302015

फोन : (0141) 515458, 515581

**मराठी :**

| | | |
|---|---|---|
| प्रथम तीन आवृत्त्या | : | 6 हजार |
| चवथी आवृत्ती | : | 2 हजार |
| (दिनांक 15 ऑगष्ट 2001) | | |

**हिंदी :**

| | | |
|---|---|---|
| आठ आवृत्त्या | : | 25 हजार |

**कन्नड :**

| | | |
|---|---|---|
| दोन आवृत्त्या | : | 2 हजार |
| एकूण | : | 35 हजार |

**किंमत : सात रुपये**

**मुद्रक :**
**प्रिंट 'ओ' लैण्ड**
बाईस गोदाम, जयपूर

## विषयानुक्रमणिका


| | |
|---|---|
| मंगलाचरण | 1 |
| विश्व | 2 |
| द्रव्य | 6 |
| गुण | 14 |
| पर्याय | 22 |
| अस्तित्वादी सहा सामान्य गुण | 30 |
| चार अभाव | 48 |
| सात तत्त्व | 60 |
| कार्य-कारण | 68 |
| नय | 76 |
| अहिंसा | 84 |
| मैं ज्ञानानंद स्वभावी हूँ | 90 |
| मेरा धाम | 90 |
| अरहंत स्तुति | 91 |
| भगवान बनेंगे | 92 |

# प्रकाशकीय

श्री जिनधर्म-प्रवेशिका आपल्या हाती देत असताना आमच्या संस्थेला अतिशय आनंद होत आहे; कारण जैन तत्त्वज्ञान समजणे व समजाविणे या दोन्ही कामांसाठी ही प्रवेशिका अत्यंत उपयोगी आहे. ब्र. यशपाल जैन यांनी हा महत्त्वपूर्ण विषय हजारो जिज्ञासू लोकांना शिकविला आहे, तसेच शिकणाऱ्यांनी जैन तत्त्वज्ञान समजल्याने समाधान व्यक्त केले आहे.

द्रव्य-गुण-पर्यायाची स्वतंत्रता लक्षात येणे हे फार महत्त्वाचे कार्य आहे. ही स्वतंत्रताच जिनेंद्र कथित अध्यात्माचा प्राण आहे. भोगप्रधान अशा काळी समाजाला याची विशेष आवश्यकता लक्षात घेऊनच आम्ही याचे प्रकाशन करीत आहोत.

जिनधर्म-प्रवेशिका पुस्तकासाठी तत्त्वरसिक समाजाकडून विशेष मागणी असल्यामुळे आम्ही याची चवथी आवृत्ती छापत आहोत.

यापूर्वी प्रकाशित जिनधर्म-प्रवेशिका मात्र गद्यात्मक होती. आता हे पुस्तक गद्यपद्यात्मक रूपात वाचकांच्या हाती देत असताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. गद्य विभागामध्ये देखील पूर्व प्रकाशित तीन आवृत्तींपेक्षा काही प्रमाणात सुधार केला आहे. पद्य विभाग पूर्ण रीतीने नवीन आहे.

पं. श्री मधुकर गडेकरांचे आम्ही आभार मानतो; कारण त्यांनी जैन मराठी साहित्यामध्ये विशेष भर घातली आहे. ब्र॰ यशपाल जैन यांनी हे पुस्तक तयार केले, म्हणून संस्था त्यांची आभारी आहे.

प्रकाशन विभागाचे प्रमुख श्री अखिल बंसल यांनी ही कृती सुंदर बनविण्यासाठी विशेष कष्ट घेतलेत, म्हणून त्यांचे देखील आम्ही आभारी आहोत. या गद्यपद्य जिनधर्म-प्रवेशिकेचा लाभ सर्वांनी घ्यावा ही आमची हार्दिक भावना आहे.

**नेमीचंद पाटनी**

महामंत्री

पंडित टोडरमल स्मारक ट्रस्ट

# मनोगत

अनेक वर्षापासून जैन तत्त्वज्ञान शिकविण्याचा महान पुण्य योग माझ्या जीवनात मला मिळत राहिला आहे. त्यातही पुन्हा 5/6 वर्षापासून विशेष अध्ययनशील अशा हिंदी प्रदेशामध्ये जैन सिद्धांत प्रवेशिका शिकविण्यासाठी निमंत्रणे मिळत राहिली. विदर्भ-मराठवाडा या महाराष्ट्राच्या विभागातूनही जिज्ञासू लोकांनी मला बोलावून घेतले. त्यामुळे तत्त्वज्ञान विषयक माझे चिंतन सूक्ष्म, स्पष्ट व सुलभ झाले आहे. माझ्या विद्यार्थी वर्गापैकीच काही प्रौढ, विवेकी व तत्त्वज्ञानाच्या प्रचार-प्रसारामध्ये खास रस बाळगणाऱ्यांनी माझे शिकविणे अक्षरशः आपल्या वहीमध्ये लिहून घेतले व पुन्हा मलाच वाचण्यास दिले. लिहिणाऱ्यांच्या कष्ट व चिकाटीचे मी स्वभाविक कौतुक केले. त्यांना धन्यवाद दिले. तेव्हा माझ्या विद्यार्थ्यांनीच हा सर्व विषय पुस्तकरूपाने छापला तर अनेक पात्र जीवांना अतिशय उपयोगाचे होईल, म्हणून मला आग्रहपूर्वक पुन्हा-पुन्हा सांगीतले. त्यांचा आग्रह मला पटला. शिकविण्यात येणारा सर्व भाग म्हणजेच जिनधर्म-प्रवेशिका होय. जयपूर निवासी पं. श्री शांतिकुमारजी पाटील एम. ए., बी. एड., जैनदर्शनाचार्य व पं. श्री अभयकुमारजी शास्त्री, जैनदर्शनाचार्य, एम. कॉम. यांचे बरोबर बसून हे पुस्तक बारकाईने वाचले. काही बदल सुद्धा केला. आता याची उपयोगीता वाचकांच्या रसिकतेवरच मी सोपवित आहे.

गद्यापेक्षा पद्य कण्ठस्थ (तोंडपाठ) करण्यास अधिक सोपे असते, म्हणून जिनधर्म-प्रवेशिका पद्यमय बनविण्याचा मानस अनेक वर्षापासून माझ्या मनात होता. पं. श्री मधुकरजी गडेकरांनी माझी भावना लक्षात घेऊन प्रश्न व उत्तर दोन्ही पद्यमय करून दिले; परंतु कार्यबाहुल्यामुळे विलंब लागला. उशीरा का होईना गद्यपद्यमय ही कृती वाचकांच्या हाती देत असताना मला विशेष आनंद होत आहे. विद्वानांनी मार्गदर्शन करावे या विचारांसह मी दोन शब्द संपवितो.

**ब्र० यशपाल जैन**

जयपूर

ॐ

# जिनधर्म-प्रवेशिका

## णमोकार मंत्र

णमो अरहंताणं, णमो सिद्धाणं, णमो आयरियाणं।
णमो उवज्झायाणं, णमो लोए सव्व साहूणं।।

## मंगलाचरण

श्रीमत् जिनेंद्र भगवंत तुला स्मरोनी।
करितो सहर्ष प्रणिपात तुझ्याच चरणी।। 1।।
हे वीतराग भगवन् सर्वज्ञ देवा।
वंदन त्रिवार माझे तुज देव-देवा।। 2।।
अर्हत् हितोपदेशी त्रिभुवन महेशा।
तन मन वचन त्रियोगे नमितो जिनेशा।। 3।।
हे शुद्ध बुद्ध परमात्म परमप्रकाशी।
निर्ग्रंथ नाथ अक्षय ध्रुव धामवासी।। 4।।
आहे जगात तुमचे अति पूज्य नाम।
मी भाव भक्तिने तुज करितो प्रणाम।। 5।।
मम चित्त शांत होते तव दर्शनाने।
सम्यक्त्व प्राप्त होते तव चिंतनाने।। 6।।

# विश्व

**प्रश्न** 1 : विश्व कशाला म्हणतात ?

**उत्तर** : सहा द्रव्यांच्या समूहाला विश्व म्हणतात.[1]

**प्रश्न** 2 : विश्वाला दुसरी कोण-कोणती नावे आहेत ?

**उत्तर** : विश्वाला जग, लोक, दुनिया, ब्रह्मांड इत्यादी अनेक नावे आहेत.

**प्रश्न** 3 : विश्वामध्ये किती द्रव्ये आहेत ?

**उत्तर** : विश्वामध्ये जातीच्या अपेक्षेने सहा द्रव्ये आहेत आणि संखेच्या अपेक्षेने अनंतानंत द्रव्ये आहेत.[2]

**प्रश्न** 4 : विश्वामध्ये जातीच्या अपेक्षेने सहा द्रव्ये कोण-कोणती आहेत ?

**उत्तर** : विश्वामध्ये जातीच्या अपेक्षेने जीव, पुद्‌गल, धर्म, अधर्म, आकाश व काल ही सहा द्रव्ये आहेत.[3]

**प्रश्न** 5 : जीवादी प्रत्येक द्रव्य किती-किती आहेत ?

**उत्तर** : जीवद्रव्य अनंत आहेत; पुद्‌गलद्रव्य अनंतानंत आहेत; धर्म, अधर्म व आकाश ही द्रव्ये प्रत्येकी एक-एक आहेत आणि कालद्रव्य असंख्यात आहेत.[4]

**प्रश्न** 6 : जीवादी सहा द्रव्ये विश्वामध्ये कशाप्रकारे राहतात ?

**उत्तर** : जीवादी सहा द्रव्ये विश्वामध्ये दूध-पाण्याप्रमाणे एकक्षेत्रावगाही राहतात; परंतु आपआपल्या स्वभावाला सोडत नाहीत.[5] म्हणून सर्व द्रव्ये स्वतंत्र आहेत.

**प्रश्न** 7 : या विश्वाला कोणी उत्पन्न केले आहे ?

**उत्तर** : या विश्वाला कोणीही उत्पन्न केले नाही.[6] विश्वातील सहाही द्रव्यांना कोणी उत्पन्न केले नाही. ते अनादी-अनंत आहेत. म्हणून सहा द्रव्यमय हे विश्व स्वतःसिद्ध आहे.

---

1) बारसाणुवेक्खा गाथा–38.
2) कार्तिकेयानुप्रेक्षा गाथा–224.
3) नियमसार गाथा–9.
4) गोम्मटसार जीवकांड गाथा–588 व 586.
5) पंचास्तिकाय गाथा–7.
6) कार्तिकेयानुप्रेक्षा गाथा–115.

# विश्व

1. हे गुरुराया ! सांगा मजला, विश्व कशाला म्हणतात ?
षट् द्रव्यांच्या समुदायाला, विश्व असेची म्हणतात ।।

2. या विश्वाला आणि कोणती, दुसरी नावे आहेत ?
जग दुनिया ब्रह्मांड लोक ही; अनेक नावे आहेत ।।

3. सांगा मजला या विश्वातच, द्रव्य नित्यही किती असे ?
जाति अपेक्षा सहा असे अन् , संख्येनेच अनंत असे ।।

4. या विश्वातच जाति अपेक्षा, द्रव्य कोणती आहेत ?
पुद्गल धर्म अधर्म काल नभ, जीवद्रव्य षट् आहेत ।।

5. जीवादिक प्रत्येक द्रव्य हे, या विश्वातच किती असे ?
धर्म अधर्म व नभ ही द्रव्ये, एक-एक जगतात असे ।।
जगी असंख्यात काल आहे, जीव जगात अनंत असे ।
पुद्गल द्रव्य अनंतानंतचि, या लोकातच नित्य असे ।।

6. जीवादिक षट् द्रव्ये जगती, कशाप्रकारे असतात ?
जल दूधासम एकेस्थानी, द्रव्य सहाही राहतात ।।
द्रव्य सहाही स्वभाव अपुला, कधी न जगती सोडतसे ।
म्हणुनी द्रव्य सहाही जगती, पूर्णपणेच स्वतंत्र असे ।।

7. कोण असे हो सांगा मजला, या विश्वाचा निर्माता ?
या विश्वाचा कुणीच नाही, धर्ता हर्ता निर्माता ।।
अनादि काळापासुनिया अन्, अनंत काळापर्यंत ।
द्रव्य सहाही नित्य असे हो, यांना नसे आदि अंत ।।
या लोकातच सहाही द्रव्य, स्वयं सिद्ध शाश्वत आहे ।
पूर्ण द्रव्यमय विश्व एक हे, अविनाशी शाश्वत आहे ।।

**प्रश्न 8 : विश्वाला जाणल्यामुळे काय फायदा होतो ?**

**उत्तर** : विश्वाला जाणल्यामुळे खालीलप्रमाणे अनेक फायदे होतात –

1. मी तथा अनंत जीवद्रव्य व इतर पाच द्रव्ये कोठे आहेत, याचा पत्ता लागतो.

2. हे विश्व स्वत:सिद्ध असल्यामुळे अनादी-अनंत आहे. म्हणून विश्वाच्या नाशाचे भय निघून जाते.

3. या विश्वाचा कर्ता-धर्ता-हर्ता ईश्वर आहे; अशा भ्रमाचा सहजच नाश होतो.[1]

4. वीतरागी, सर्वज्ञ व हितोपदेशी देवच खरे देव आहेत, असा पक्का निर्णय होतो.[2]

5. भगवंतासंबधी खरी भक्ति प्रगट होते.

6. धर्म अर्थात वीतरागता, शुद्धि व मोक्षमार्ग प्रगट करण्याचा यथार्थ उपाय म्हणजेच पुरूषार्थ लक्षात येतो.

7. लौकिक तसेच पारलौकिक जीवनातील परावलंबनाचा नाश होतो व स्वावलंबन प्रगट होते.

8. भगवंतासंबधी सतत दु:ख देणारे व्यर्थ भय नाहीसे होते.

9. भगवंताकडून भोगाची भीक मागण्याच्या भिकारी वृत्तीचा अभाव होतो.

10. जिनेंद्र कथित धर्माची श्रद्धा विशेष दृढ होते आणि धर्माभासासंबधीचे आकर्षण/बहुमान नष्ट होतो.

11. आपले मति-श्रुतरूप अल्पज्ञान देखील केवलज्ञानगम्य विषयांना जाणू लागते.

---

1) कार्तिकेयानुप्रेक्षा गाथा–115. 2) देवागम स्तोत्र श्लोक–6.

*या विश्वाला कोणीही बनविले नाही किंवा टिकवून ठेवलेले नाही. हे विश्व कोणाच्याही आधाराने टेकलेले नाही. विश्व सहा प्रकारच्या द्रव्यस्वरूप आहे. अर्थात हे विश्व जीवादी सहा द्रव्याने खचाखच भरलेले आहे. याचा कोणीही नाश करू शकत नाही.* ***अशा विश्वामध्ये हा अज्ञानी जीव समते-अभावी निरंतर दु:ख सहन करीत भटकत आहे.***

– छहढाला, ढाल-5, पद्य-12 चा अर्थ

8. विश्व जाणता लाभ कोणते ? गुरुराया ! मज सांगावे।
लाभ अनेक सांगतो मी ते, मन लावुनिया ऐकावे।।

1.द्रव्य सहाही कोठे असती, याचे ज्ञान सहज होते।
माझ्या संगे अन्य द्रव्य ही, कसे राहती हे कळते ।।

2.स्वयं सिद्ध हे विश्वचि आहे, हेच अनादि अनंत असे।
विश्व विनाशाचे भय निश्चित, मनातून मग जात असे।।

3.या विश्वाचा कर्ता, धर्ता, हर्ता परमेश्वर असतो।
हा मिथ्याभ्रम या जीवाच्या, हृदयातुनि निघुनि जातो।।

4.वीतराग सर्वज्ञ प्रभूचा, निश्चित निर्णय मनि होतो।
5.अन् हृदयी भगवंताविषयी, भक्तीभाव प्रगट होतो।।

6.वीतरागमय शुद्धभावना, जीव सदा धारण करतो।
अन् शुद्धीच्या वृद्धीसाठी, पुरुषार्था जागृत करतो।।

7.पराधीनता परावलंबन, हृदयातुनि निघुनी जाते।
स्वाधिनतेची खरी भावना, जीवाच्या हृदयी येते।।

8.देवाविषयी अति दुखदायक, क्षणात भय विलया जाते।
द्रव्याचे शाश्वत अविनाशी, स्वरूप ध्यानीही येते।।

9.भव भोगांची भीक भावना, हृदयातुनि निघुनि जाते।
भगवंताचे वीतरागमय, रूप खरे ध्यानी येते।।

10.विश्ववंद्य तीर्थंकर प्रभुच्या, वचनावर श्रद्धा बसते।
या जीवाची जिनधर्मावर, भक्तिभावना दृढ होते।।

11.मति श्रुत ज्ञानाने जीवात्मा, वस्तुस्वरूपा जाणतसे।
जसे वस्तुचे सत्यस्वरूपचि, केवलज्ञानी जाणतसे।।

*आकाश द्रव्याचे क्षेत्र दहाही दिशेला अनंत आहे. आकाशाच्या अत्यंत मध्यभागी स्थित लोक/विश्व आहे. विश्वाला कोणीही बनविलेले नाही किंवा त्याला हरिहरादिकांनी धारण केलेले नाही.*

— कार्तिकेयानुप्रेक्षा, गाथा-115

# द्रव्य

**प्रश्न** 9 : द्रव्य कशाला म्हणतात ?

**उत्तर** : गुणांच्या समूहाला द्रव्य म्हणतात.[1]

**प्रश्न** 10 : द्रव्याला दुसरी कोण-कोणती नावे आहेत ?

**उत्तर** : द्रव्याला वस्तू, सत्ता, सत्, अर्थ, पदार्थ, तत्त्व, अन्वय इत्यादी अनेक नावे आहेत.

**प्रश्न** 11 : द्रव्याचा कर्ता (उत्पादक) कोण आहे ?

**उत्तर** : प्रत्येक द्रव्य अनादी-अनंत अर्थात स्वतःसिद्ध[2] आहे. म्हणून द्रव्याचा कोणीही कर्ता-धर्ता-हर्ता नाही.

**प्रश्न** 12 : द्रव्यामध्ये गुणांना कोणी एकत्रित केले आहे ?

**उत्तर** : द्रव्यामध्ये गुणांना कोणीही एकत्रित केले नाही. द्रव्य स्वयमेवच अनादी काळापासून अनंत गुणमय आहे व अनंत गुणमयरूपच अनंत काळापर्यंत राहील. म्हणून द्रव्य देखील विश्वाप्रमाणे स्वतःसिद्ध आहे.

**प्रश्न** 13 : एका गुणालाच द्रव्य म्हणता येईल काय ?

**उत्तर** : एका गुणालाच द्रव्य म्हणता येणार नाही; कारण एका द्रव्यामध्येच अनंत गुण असल्यामुळे एका द्रव्याच्या ठिकाणीच अनंत द्रव्य मानण्याची आपत्ती येईल.

**प्रश्न** 14 : एका द्रव्यामध्ये किती गुण असतात ?

**उत्तर** : एका द्रव्यामध्ये अनंत गुण असतात.[3]

**प्रश्न** 15 : गुणांच्या अनंततेचे स्वरूप काय आहे ?

**उत्तर** : या विश्वामध्ये जीव अनंत आहेत. त्यापेक्षा अनंतपट पुद्गल द्रव्य आहेत. त्यापेक्षा अनंतपट तीन काळाचे समय आहेत. त्यापेक्षा अनंतपट आकाशद्रव्याचे प्रदेश आहेत आणि त्यापेक्षा अनंतपट एका द्रव्यामध्ये गुण असतात/राहतात.

---

1) पंचास्तिकाय गाथा–44 ची आचार्य अमृतचंद्रकृत टीका समयव्याख्या तथा आचार्य जयसेनकृत टीका तात्पर्यवृत्ति, सर्वार्थसिद्धि अध्याय–5, सूत्र–2 ची टीका.

2) पंचाध्यायी प्रथम खण्ड, श्लोक–8.

3) पंचाध्यायी द्वितीय खण्ड, श्लोक–1011.

# द्रव्य

9. **हे गुरुदेवा ! सांगा मजला, द्रव्य कशाला म्हणतात ?**
अनंत गुणांच्या समुदायाला, द्रव्य असेची म्हणतात।।
10. **द्रव्याला दुसरी ही नावे, कोण कोणती आहेत ?**
वस्तू सत्ता सत् पदार्थ ही, अनेक नावे आहेत।।
11. **द्रव्याचा उत्पादक जगती, सांगा मजला कोण असे ?**
या जगती प्रत्येक द्रव्य हे, अनादि आणि अनंत असे।।
स्वयं सिद्ध हे द्रव्यचि आहे, याचा कर्ता कुणी नसे।
द्रव्य एक हे स्वतंत्र आहे, धर्ता हर्ता कुणी नसे।
12. **द्रव्यामध्ये एकत्रित गुण, सांगा मज कोणी केले ?**
द्रव्य आणि त्याच्याच गुणांना, कुणी न जगती निर्मियले।।
अनादि काळापासुनि जगती, अनंत गुणमय द्रव्य असे।
अनंत काळापर्यंतचि जग, स्वतःसिद्ध अन द्रव्य असे।।
13. **द्रव्याच्या एकाच गुणाला, द्रव्य म्हणावे का सांगा ?**
**हे म्हणण्यातच दोष काय तो, श्री गुरुवर ! मजला सांगा।।**
द्रव्याच्या एकाच गुणाला, द्रव्य मानणे दोष असे।
कारण एका द्रव्यामध्ये, अनंत गुण नित वसत असे।।
याचमुळे एका द्रव्यातच, अनंत द्रव्ये राहतील।
दोषपूर्ण या आपत्तीचा, कधि परिहार न होईल।।
14. **एका द्रव्यामध्ये सांगा, किती किती गुण असतात ?**
एका द्रव्यामध्ये ऐका, अनंत गुण नित असतात।।
15. **याच गुणांच्या अनंततेचे, स्वरूप मजला सांगावे ?**
या विश्वात अनंत जीव हे, असती नित्यहि ऐकावे।।
जीवापेक्षा अनंतपट हे, पुद्गल द्रव्यहि सदा असे।
त्यापेक्षाहि त्रिकाल समय हे, अनंतपट जगतात असे।।
त्यापेक्षा जगि अनंतपटहि, आकाशाचे प्रदेश असे।
त्यापेक्षाही अनंत पट गुण, एका द्रव्यामधे असे।।

**प्रश्न** 16 : आम्ही कोणते द्रव्य आहोत ?

**उत्तर** : आमचा आत्मा जीवद्रव्य आहे व आमचे शरीर पुद्‌गलद्रव्य आहे.

**प्रश्न** 17 : द्रव्याच्या इतर व्याख्या कोण-कोणत्या आहेत ?

**उत्तर** : तत्त्वार्थसूत्र ग्रंथामध्ये द्रव्याचे 'सत्' असे लक्षण सांगितले आहे. तसेच 'गुणपर्ययवत् द्रव्यम्' अर्थात द्रव्य गुणपर्यायवान आहे आणि सत् उत्पाद-व्यय-ध्रौव्य सहित आहे.[1] – असेही कथन केले आहे.

**प्रश्न** 18 : उत्पाद कशाला म्हणतात ?

**उत्तर** : द्रव्यामध्ये समया-समयाला नवी-नवी पर्याय (अवस्था) उत्पन्न होते; त्याला उत्पाद म्हणतात.[2] **जसे** – हिरवा आंबा पिवळा होतो.

**प्रश्न** 19 : व्यय कशाला म्हणतात ?

**उत्तर** : द्रव्याच्या पूर्व पर्यायाचा (अवस्थेचा) नाश होतो, त्याला व्यय म्हणतात.[3] **जसे** – आंब्याच्या हिरवेपणाचा नाश झाला.

**प्रश्न** 20 : ध्रौव्य कशाला म्हणतात ?

**उत्तर** : उत्पाद व व्यय होत असतांना त्या दोहोंमध्ये जी अखंडता राहते; त्याला ध्रौव्य म्हणतात.[4] **जसे** – हिरवा आंबा पिवळा होत असतांना आंबा अखंड राहिला.

**प्रश्न** 21 : जीव कशाला म्हणतात ?

**उत्तर** : ज्यामध्ये चेतना अर्थात ज्ञान-दर्शनरूप शक्ति आहे; त्याला जीव म्हणतात.[5]

**प्रश्न** 22 : पुद्‌गल कशाला म्हणतात ?

**उत्तर** : ज्यामध्ये स्पर्श, रस, गंध व वर्ण हे विशेष गुण आहेत; त्याला पुद्‌गल म्हणतात.[6]

---

1) तत्त्वार्थसूत्र अध्याय–5, सूत्र–29, 30, 38. 2) प्रवचनसार गाथा–95 ची आचार्य अमृतचंद्रकृत टीका तत्त्वप्रदीपिका, तत्त्वार्थसूत्र अध्याय 5, सूत्र–42. 3) प्रवचनसार गाथा–95. आचार्य अमृतचंद्रकृत टीका तत्त्वप्रदीपिका, सर्वार्थसिद्धि अध्याय–5, सूत्र–30 ची टीका. 4) प्रवचनसार गाथा–95, आचार्य अमृतचंद्रकृत टीका तत्त्वप्रदीपिका, तत्त्वार्थसूत्र अध्याय–5, सूत्र–35. 5) पंचास्तिकाय गाथा–40. 6) तत्त्वार्थसूत्र अध्याय–5, सूत्र–23.

**16. हे गुरुदेवा ! सांगा आम्ही द्रव्य कोणते जगी असे ?**
अमुचा आत्मा जीव द्रव्य अन्, शरीर पुद्गल द्रव्य असे ।।

**17. द्रव्याच्या व्याख्या मज सांगा, कोण-कोणत्या आहेत ?**
श्री तत्त्वार्थसूत्र ग्रंथातच, यथार्थ व्याख्या आहेत ।।
द्रव्याचे लक्षण सत् आहे, गुणपर्ययवत् द्रव्य असे ।
सत् उत्पाद आणि व्यय ध्रौव्यहि, यांनी सहित सदाच असे ।।

**18. सांगा मज उत्पाद कशाला, हे गुरुदेवा ! म्हणतात ?**
पर्यायाच्या उत्पत्तीला, जगी उत्पादचि म्हणतात ।।
समया समयाला द्रव्यातच, नित्य नवीन अवस्थेची ।
उत्पत्ती होतेच निरंतर, नवी नवी पर्यायाची ।।
वृक्षावरती हिरवा आंबा, हळू हळू पिवळा होतो ।
पदार्थ अपुली तशी अवस्था, स्वयं सदा बदलत जातो ।।

**19. गुरुराया ! सांगा मजला, व्यय जगी कशाला म्हणतात ?**
द्रव्याच्या पूर्वावस्थेच्या, नाशाला व्यय म्हणतात ।।
पिवळ्या आंब्याचे हिरवेपण, हळू हळूच जसे जाते ।
द्रव्याची पूर्वावस्था ही, तशी सदा विलया जाते ।।

**20. हे गुरुदेवा ! सांगा मजला, ध्रौव्य कशाला म्हणतात ?**
उत्पत्ती विलयातिल त्या, नित अखंडतेला म्हणतात ।।
हिरवा आंबा पिवळा झाला, पण आंबाच अखंड असे ।
नित्य अवस्था बदलत असता, द्रव्य अखंड सदाच असे ।।

**21. श्री गुरुराया ! सांगा मजला, जीव कशाला म्हणतात ?**
दर्शन ज्ञानशक्तिमय नित जो, त्याला जीवच म्हणतात ।।

**22. श्री गुरुदेवा ! सांगा पुद्गल कुणा कशाला म्हणतात ?**
स्पर्श गंध रस वर्ण जयातचि, त्याला पुद्गल म्हणतात ।।

**प्रश्न** 23 : पुद्गलाचे भेद किती आहेत ?
**उत्तर** : पुद्गलाचे दोन भेद आहेत – 1) परमाणू, 2) स्कंध.[1]

**प्रश्न** 24 : परमाणू कशाला म्हणतात ?
**उत्तर** : ज्याचा दुसरा तुकडा अर्थात विभाग होत नाही, अशा सर्वात सूक्ष्म असणाऱ्या पुद्गलाला परमाणू म्हणतात.[2]

**प्रश्न** 25 : स्कंध कशाला म्हणतात ?
**उत्तर** : दोन अथवा दोन पेक्षा अधिक परमाणूंच्या बंधाला स्कंध म्हणतात.[3]

**प्रश्न** 26 : धर्मद्रव्य कशाला म्हणतात ?
**उत्तर** : स्वयं गमन करणाऱ्या जीव व पुद्गलांना गमन करण्यामध्ये जे द्रव्य निमित्त बनते; त्याला धर्मद्रव्य म्हणतात.[4]
**जसे** – गमन करणाऱ्या माशाला गमन करतांना पाणी.

**प्रश्न** 27 : अधर्मद्रव्य कशाला म्हणतात ?
**उत्तर** : स्वयं गतिपूर्वक स्थिररूप परिणमन करणाऱ्या जीव-पुद्गलांना स्थिर राहण्यामध्ये जे द्रव्य निमित्त बनते; त्याला अधर्मद्रव्य म्हणतात.[5]
**जसे** – वाटसरू/प्रवाशाला स्थिर राहण्यामध्ये झाडाची सावली.

**प्रश्न** 28 : आकाशद्रव्य कशाला म्हणतात ?
**उत्तर** : जीवादिक पाच द्रव्यांना राहण्यासाठी जे द्रव्य जागा देते; त्याला आकाशद्रव्य म्हणतात.[6] आकाशद्रव्य सर्वव्यापक व सर्वत्र आहे.

**प्रश्न** 29 : आकाशाचे किती भेद आहेत ?
**उत्तर** : जरी आकाश एकच अखंड द्रव्य आहे; तरीही सहा द्रव्यांची उपस्थिती व अनुपस्थितीच्या निमित्ताने आकाशाचे लोकाकाश व अलोकाकाश असे दोन भेद होतात.

---

1) तत्त्वार्थसूत्र अध्याय–5, सूत्र–25.
2) पंचास्तिकाय गाथा–75 आणि दोन्ही संस्कृत टीका.
3) पंचास्तिकाय गाथा–75 आणि दोन्ही संस्कृत टीका, सर्वार्थसिद्धी अ. 5 सूत्र–25 ची टीका.
4) पंचास्तिकाय गाथा–83 ते 85 व दोन्ही संस्कृत टीका.
5) पंचास्तिकाय गाथा–86 ते 89 व दोन्ही संस्कृत टीका.
6) पंचास्तिकाय गाथा–90 ते 96 व दोन्ही संस्कृत टीका.

23 सांगा मज पुद्गल द्रव्याचे, भेद किती ते आहेत ?
स्कंध अणू पुद्गल द्रव्याचे, दोन भेद हे आहेत।।

24. सांगा मजला परमाणू वा, अणु कशाला म्हणतात ?
ज्याचा तुकडा होई न, त्याला अणू परमाणू म्हणतात।।
ज्याचा दुसरा विभाग होइ न, सूक्ष्म अशाच पुद्गलाला।
अणु परमाणू जगि म्हणतात, अंतिम सूक्ष्म पुद्गलाला।।

25. श्री गुरुराया ! सांगा मजला, स्कंध कशाला म्हणतात ?
परमाणूंच्या बंधाला जगि, स्कंध असेची म्हणतात।।
दोनच अथवा त्यापेक्षा, बहु परमाणूंच्या बंधाला।
स्कंध असेच जगि म्हणतात, अधिक अणूंच्या बंधाला।।

26. धर्मद्रव्य म्हणतात कशाला, श्री गुरुवर ! सांगा मजला ?
गमनशील पुद्गल जीवाच्या, निमित्त होइ गमनाला।।

27. अधर्मद्रव्य जगात कशाला, सांगा मजला म्हणतात ?
स्थिर होणाऱ्या पुद्गल जीवा, निमित्त जे स्थिर होण्यात।।

28. जे आकाशद्रव्य नित आहे, त्याचे स्वरूप सांगावे ?
द्रव्यांना जे जागा देते, ते आकाशचि जाणावे।।
जीवादिक पाचही द्रव्यांना, राहण्यास जागा देते।
ते आकाशद्रव्य जगतात, सर्वांना आश्रय देते।।

29. आकाशाचे भेद किती ते, आता मजला सांगावे ?
लोकाकाश अलोकाकाशचि, दोन भेद हे जाणावे।।

*पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व काल – या पाच अजीव द्रव्यांपासून जीव द्रव्याचा स्वभाव (परिणाम) अत्यंत भिन्न आहे. अज्ञानी (मिथ्यादृष्टी) जीव आत्मस्वभावाला न जाणता विपरित श्रद्धा करून शरीरादिकामध्ये आत्मबुद्धी करतो.*

– छहढाला, ढाल-2, पद्य-3 चा अर्थ

**प्रश्न** 30 : कालद्रव्य कशाला म्हणतात ?

**उत्तर** : आपआपल्या अवस्थारूपाने स्वयं परिणमनाऱ्या जीवादी द्रव्यांच्या परिणमनामध्ये जे द्रव्य निमित्त आहे; त्याला कालद्रव्य म्हणतात.[1]

**जसे** – कुंभाराच्या चाकाला फिरण्यासाठी लोखंडाचा खिळा.

**प्रश्न** 31 : कालद्रव्याचे किती भेद आहेत ?

**उत्तर** : कालद्रव्याचे दोन भेद आहेत[2] – 1) निश्चय काल, 2) व्यवहार काल.

**प्रश्न** 32 : सहा द्रव्यांचे विभाजन कोण-कोणत्या प्रकारे होऊ शकते ?

**उत्तर** : **अ) जीव-अजीवाच्या अपेक्षेने** – आत्मद्रव्य जीव आहे व पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व काल ही पाच द्रव्ये अजीव आहेत.[3]

**ब) रूपी-अरूपीच्या अपेक्षेने** – एक पुद्गलद्रव्य रूपी आहे व जीव. धर्म, अधर्म, आकाश व काल ही पाच द्रव्ये अरूपी आहेत.[4]

**क) प्रदेशाच्या अपेक्षेने** – एक कालद्रव्य एकप्रदेशी आहे व जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व काल ही पाच द्रव्ये बहुप्रदेशी आहेत.[5]

**ड) क्रियावती शक्तिच्या अपेक्षेने** – जीव व पुद्गल दोन्ही द्रव्ये क्रियावती शक्तिमुळे सक्रिय आहेत आणि धर्म, अधर्म, आकाश व काल ही चार द्रव्ये निष्क्रिय आहेत.[6]

**प्रश्न** 33 : **द्रव्याचे स्वरूप जाणल्यामुळे काय फायदे होतात ?**

**उत्तर** : द्रव्याचे स्वरूप जाणल्यामुळे आम्हाला खालीलप्रमाणे फायदे होतात –

1) प्रत्येक द्रव्य विश्वामध्ये स्वतःसिद्ध व स्वतंत्र आहे, म्हणून कोणत्याही द्रव्याचा कोणीही कर्ता-धर्ता-हर्ता नाही; अशा सत्यस्वरूपाचे ज्ञान होते.

2) प्रत्येक द्रव्यामध्ये अनंत गुण आणि त्यांच्या अनंतानंत पर्यायी आहेत; असे ज्ञान होते आणि मी जीवद्रव्य देखील अनंत गुणात्मक आहे; असे जाणल्यामुळे स्वतःचा विशेष महिमा उत्पन्न होतो.

3) परस्पर विरूद्ध स्वभावी अनंत द्रव्ये एका विश्वामध्ये अविरोधरूपाने अनादी काळापासून राहतात व अनंत काळापर्यंत राहतील; असे ज्ञान झाल्यामुळे सह-अस्तित्वाचा बोध होतो.

---

1) पंचास्तिकाय गाथा–100 ते 102.
2) पंचास्तिकाय गाथा–100 व दोन्ही टीका.
3) पंचास्तिकाय गाथा–124 व द्रव्यसंग्रह गाथा–1.
4) पंचास्तिकाय गाथा–97.
5) पंचास्तिकाय गाथा–27 ची तात्पर्यवृत्ति टीका.
6) सर्वार्थसिद्धी अध्याय–5 सूत्र–7 ची टीका.

**30. कालद्रव्य म्हणतात कशाला, श्रीगुरु ! मजला सांगावे ?**
परिणमनातच निमित्त जे ते, कालद्रव्यचि जाणावे।।
जीवादिक पाचहि द्रव्यांच्या, परिणमनात निमित्त असे।
कालद्रव्य ते जगि जाणावे, काळाचा संकेत असे।।

**31. या काळाचे भेद किती ते, आता मजला सांगावे ?**
निश्चय अन् व्यवहार काल हे, दोन भेदची जाणावे।।

**32. षट् द्रव्यांचे कसे विभाजन, होऊ शकते सांगावे ?**
निम्नलिखित हे असे विभाजन, होऊ शकते ऐकावे।।
अ.जीवाजीव अपेक्षेने नित, आत्मद्रव्य हे जीव असे।
पुद्गल धर्म अधर्म काल नभ, ही द्रव्येच अजीव असे।।
ब.रूपि अरूपीच्या दृष्टीने, रूपी पुद्गल द्रव्य असे।
धर्म अधर्म काल नभ जीवच, नित्य अरूपी द्रव्य असे।।
क.आणि प्रदेशाच्या दृष्टीने, एकप्रदेशी काल असे।
पुद्गल धर्म अधर्म जीव नभ, बहूप्रदेशी द्रव्य असे।।
ड.क्रियावती शक्तिने द्रव्ये, सक्रिय पुद्गल जीव असे।
धर्म अधर्म काल नभ जगती, निष्क्रिय द्रव्ये चार असे।।

**33. द्रव्य स्वरूपाच्या ज्ञानाने, काय फायदे होतात ?**
द्रव्य स्वरूपाच्या ज्ञानाने, अनेक फायदे होतात।।
1.विश्वामध्ये द्रव्ये सारी, स्वयं सिद्ध स्वाधीन असे।
कुणी कुणाचा कर्ता धर्ता हर्ता नाहि स्वतंत्र असे।।
2. अनंत गुणमय द्रव्य असे नित, अनंतपट पर्याय असे।
जीव अनंत गुणात्मक आहे, अपुला महिमा जाणतसे।।
3.या विश्वात विरूद्ध स्वभावी, अनंत द्रव्ये राहतात।
परंतु ती संघर्ष न करता, अपुले जीवन जगतात।।
अनंत काळापासुनि, द्रव्ये अनंत काळापर्यंत।
या जगती अविरोधपणे, ही नित्य राहती सर्वत्र।।
सत्य ज्ञान हे होता जीवा, भ्रम सारे क्षणि जात असे।
सहअस्तित्वाने जगण्याचा, बोध मनाला होत असे।।

4) प्रत्येक द्रव्य स्वतंत्र असल्यामुळे मी जीवद्रव्य कोणाचे बरे-वाईट करू शकत नाही आणि इतर द्रव्य देखील माझे बरे-वाईट करू शकत नाहीत; असा निर्णय होतो.

5) प्रत्येक द्रव्यामध्ये अनंत गुण असतात; या अपेक्षेने कोणतेही द्रव्य लहान वा मोठे नाही; असे समजून येते.

6) मी देखील एक द्रव्य आहे, म्हणून मी अनंत गुणांचा पिंड आहे; अशा ज्ञानामुळे आपल्या/निज भगवान आत्म्याचा महिमा येतो व अन्य द्रव्याचे आकर्षण नाहीसे हाते.

7) प्रत्येक द्रव्य अनंत गुणात्मक भरीव (आकंठ भरलेली) वस्तु आहे; पोकळ नाही, म्हणून द्रव्याच्या पूर्णतेचे आणि (परद्रव्यापासून) निरपेक्षतेचे ज्ञान होते

# गुण

**प्रश्न 34** : गुण कशाला म्हणतात ?

**उत्तर** : जे द्रव्याच्या संपूर्ण भागामध्ये व त्याच्या सर्व अवस्थेमध्ये असतात; त्यांना गुण म्हणतात.[1]

**प्रश्न 35** : गुण द्रव्याच्या संपूर्ण भागामध्ये असतात; याचा काय आशय आहे ?

**उत्तर** : गुण व द्रव्याचे क्षेत्र एकच आहे, लहान-मोठे नाही, त्यांना एकमेकापासून वेगळे करता येत नाही, याप्रमाणे गुण व क्षेत्राच्या अखंडतेचे ज्ञान होते.

**प्रश्न 36** : गुण, द्रव्याच्या संपूर्ण अवस्थेमध्ये राहतात; याचा काय आशय आहे ?

**उत्तर** : गुण व द्रव्य त्रैकालिक आहेत. म्हणून गुणांचा द्रव्यामध्ये कधीही अभाव होत नाही; याप्रमाणे गुण आणि द्रव्याच्या कालासंबधी अखंडतेचे ज्ञान होते.

---

1) न्यायदीपिका प्रकाश--3/78, आलापपद्धति गुणव्युत्पत्ति अधिकार सूत्र--92, 93.

4. स्वतंत्र हे प्रत्येक द्रव्य, नित या विश्वात सदा असते।
या ज्ञानाने जीवद्रव्य हे, संशयमुक्त सदा होते।।
मी न कुणाचे बरे न वाईट, जगी कधी ना करु शकतो।
मी न कुणाला जगवु शकतो, मी न कुणा मारू शकतो।।
दुसरी द्रव्ये माझे जगती, इष्टानिष्ट करीत नसे।
या तत्त्वाचा निर्णय होता, आनंदित मन होत असे।।
5. अनंत गुणमय द्रव्ये असती, लहान मोठे कुणी नसे।
या तत्त्वाचा बोधचि होता, चित्त शांत मग होत असे।।
6. मी पण जीवद्रव्य जगि आहे, अनंत गुणगण सहित असे।
हे कळता दुसऱ्या द्रव्यांचे, आकर्षण क्षणि मिटत असे।।
7. या जगती प्रत्येक द्रव्य हे, अनंत गुण भंडार असे।
निश्चित ही संपूर्ण असे हे, अचिंत्य नित निरपेक्ष असे।।
द्रव्य व्यवस्थेच्या ज्ञानाने, जीव दुःख विसरुनि जातो।
शिव नगरीच्या ध्रुवधामाचा, निर्मल पथ त्याला दिसतो।।

# गुण

34. **मला गुणाची व्याख्या सांगा, हे गुरुदेवा ! कृपा करा।**
**आणि तयाचे महत्त्व सांगा, संशय माझा दूर करा।।**
द्रव्याच्या सगळ्या भागातच, त्याच्या सर्व अवस्थेत।
व्यापुनिया जे सदा राहती, त्यांना गुण नित म्हणतात।।
35. **द्रव्याच्या सगळ्या भागातच, व्यापुनि नित गुण राहतसे।**
**हे गुरुराया ! सांगा मजला, याचा आशय काय असे ?**
द्रव्य आणि गुण एके स्थानी, सदा सर्वदा राहतसे।
लहान मोठे कुणीच नाही, ते तर नित्य अभिन्न असे।।
द्रव्य गुणांच्या अखंडतेचे, ज्ञान होतसे जीवाला।
अन् क्षेत्राच्या अखंडतेचे, ज्ञान होतसे जीवाला।।
36. **द्रव्याचे गुण नित द्रव्याच्या, सर्व अवस्थेमधे असे।**
**गुरुजी ! मजला आता सांगा, याचा आशय काय असे ?**
गुण त्रैकालिक जगती असती, त्रैकालिक हे द्रव्य असे।
द्रव्य गुणांचा अभाव जगती, कधी कधीही होत नसे।।
द्रव्य आणि गुण शाश्वत असती, हेच ज्ञान जीवा होते।
अन् काळाच्या अखंडतेचे, ज्ञान खरे जीवा होते।।

**प्रश्न** 37 : गुण व द्रव्याचा परस्पर कोणता संबंध आहे ?

**उत्तर** : अ) **नित्यतादात्म्य संबंध** – गुण आणि द्रव्यामध्ये साखर व त्यातील गोडी, याप्रमाणे नित्यतादात्म्य संबंध आहे.[1] साखर व डब्याप्रमाणे संयोग संबध नाही.

आ) **अंश-अंशी संबंध** – ज्ञान व आत्म्यासमान अंश-अंशी संबंध आहे.[2]

इ) **विशेषण-विशेष्य संबंध** – शुभ्र वर्ण (रंग) आणि साखरेसमान विशेषण-विशेष्य संबंध आहे.[3]

ई) **आधेय-आधार संबंध** – गुण व गुणीच्या समान आधेय-आधार संबंध आहे[4] (गुण आधेय, गुणी आधार)

**प्रश्न** 38 : गुण व द्रव्यामध्ये कोणत्या अपेक्षेने अंतर आहे ?

**उत्तर** : गुण व द्रव्यामध्ये संज्ञा (नाव), संख्या (अनेक-एक), लक्षण (स्वरूप), प्रयोजन (उद्देश) यांच्या अपेक्षेने अंतर आहे.

**प्रश्न** 39 : गुणांचे द्रव्यामध्ये काय स्थान आहे ?

**उत्तर** : प्रत्येक वस्तू/द्रव्य, द्रव्य-क्षेत्र-काल व भाव स्वरूप आहे. आणि गुण द्रव्यादी चारपैकी केवळ भावरूप आहे.

**प्रश्न** 40 : गुणांचा कर्ता कोण आहे ?

**उत्तर** : द्रव्याप्रमाणे गुण देखील अनादी-अनंत व अकृत्रिम आहेत. म्हणून गुणांचा कर्ता कोणी नाही, ते स्वयंभू-स्वतःसिद्ध आहेत.

**प्रश्न** 41 : तत्त्वार्थसूत्रामध्ये गुणाला निर्गुण का म्हटले आहे ?

**उत्तर** : ज्याप्रमाणे द्रव्यामध्ये गुण असतात, त्याप्रमाणे एका गुणामध्ये अन्य गुण असत नाहीत अर्थात एक गुण दुसऱ्या गुणाने रहित असतो.

---

1) समयसार गाथा–69, 70 ची आत्मख्याती टीका.

2) सर्वार्थसिद्धी अध्याय–5 सूत्र–35 ची टीका.

3) पंचाध्यायी प्रथम खण्ड, श्लोक–38.

4) तत्त्वार्थसूत्र अध्याय–5, सूत्र–41.

**37. द्रव्य गुणांचा सांगा गुरुजी ! कसा काय संबंध असे ?**
**द्रव्य गुणांची विशेषता मज, सांगा गुरुजी ! काय असे ?**

अ. साखर आणि तयाची गोडी, यांचा नित संबंध असे।
तसे द्रव्य गुण संबंधातहि, नित्यनित्यतादात्म्य असे।।

आ. ज्ञान व आत्मा यांचा निश्चित, अंश अंशि संबंध असे।
तसेच गुण द्रव्याचा निश्चित, अंश अंशि संबंध असे।।

इ. दूध व त्याचा शुभ्र वर्ण हे, नित्य अभिन्न असे जगती।
हा संबंध विशेष्य विशेषण, द्रव्य गुणासम या जगती।।

ई. गुणी गुणांचा अविनाभावी, जसा नित्य संबंध असे।
तसा वस्तु अन् तिच्या गुणांचा, अविनश्वर संबंध असे।।
हा आधार व आधेयासम, निश्चित नित संबंध असे।
जिनवाणीचे सत्य तत्त्व हे, या विश्वात प्रसिद्ध असे।।

**38. हे गुरुदेवा ! द्रव्य गुणातील, अंतर मजला सांगावे ?**
**कसे कोणत्या दृष्टीने हे, अंतर मजला सांगावे ?**

द्रव्य गुणातील अंतर जाणा, संज्ञा संख्या दृष्टीने।
लक्षण आणि प्रयोजन यांच्या, जाणावेच अपेक्षेने।।

**39. द्रव्यामध्ये याच गुणांचे, काय कोणते स्थान असे?**

द्रव्य क्षेत्र अन् काल भावमय, द्रव्य नित्य हे एक असे।।
परंतु केवळ भावस्वरूपी, गुण हे असती जगतात।
तत्त्व खरे हे जाणुनि घ्यावे, अन् ठेवावे हृदयात।।

**40. कर्ता कोण गुणांचा आहे ? गुरुजी ! मजला सांगावे।**

द्रव्यासम या सर्व गुणांचा, कुणी न कर्ता जाणावे।।
अनादि आणि अनंत असे गुण, आणि स्वयंभू जाणावे।
अकृत्रिम हे असे सर्वथा, स्वतःसिद्ध हे जाणावे।।

**41. आचार्यांनी याच गुणांना, निर्गुण का म्हटले आहे ?**
**श्री तत्त्वार्थसूत्र ग्रंथातहि, हेच कथन केले आहे।।**

द्रव्यामध्ये गुण असतात, गुणामधे गुण नसतात।
एकएक गुण अन्य गुणाने, रहित असे या जगतात।।

**प्रश्न** 42 : गुणामध्ये परिवर्तन होते अथवा होत नाही ?

**उत्तर** : गुणाचे स्वरूप बदलत नाही, म्हणून गुण अपरिवर्तनीय[1] (नित्य) आहेत आणि गुणांची अवस्था बदलत राहते; म्हणून गुणामध्ये परिवर्तन[1] (बदल) होत असते.

**प्रश्न** 43 : गुणांचे किती भेद आहेत ?

**उत्तर** : गुणांचे दोन भेद आहेत[2] – 1) सामान्य गुण 2) विशेष गुण.

**प्रश्न** 44 : सामान्य गुण कशाला म्हणतात ?

**उत्तर** : जे गुण सर्व द्रव्यामध्ये असतात; त्यांना सामान्य गुण म्हणतात.[3]

**प्रश्न** 45 : विशेष गुण कशाला म्हणतात ?

**उत्तर** : जे गुण सर्व द्रव्यात न राहता आपआपल्या द्रव्यात राहतात/असतात; त्यांना विशेष गुण म्हणतात.[4]

**प्रश्न** 46 : सामान्य गुण किती आहेत ?

**उत्तर** : सामान्य गुण अनंत आहेत; परंतु त्यात मुख्य सहा आहेत[5] – 1) अस्तित्व 2) वस्तुत्व 3) द्रव्यत्व 4) प्रमेयत्व 5) अगुरुलघुत्व आणि 7) प्रदेशत्व.

**प्रश्न** 47 : द्रव्यामध्ये सामान्य गुणाला नाही मानले तर काय हानी होईल ?

**उत्तर** : द्रव्यामध्ये सामान्य गुणाला नाही मानले तर द्रव्याची सिद्धी होणार नाही.

**प्रश्न** 48 : द्रव्यामध्ये विशेष गुणाला नाही मानले तर काय हानी होईल ?

**उत्तर** : द्रव्यामध्ये विशेष गुणाला नाही मानले तर एक द्रव्य दुसऱ्या द्रव्यापासून भिन्न सिद्ध होणार नाही. सर्व द्रव्ये एकद्रव्यरूप होतील. कारण विशेष गुण भेदविज्ञानाचा बोधक आहे.

---

1) राजवार्तिक अ. 5, सूत्र–24 व 25 ची टीका, पंचाध्यायी प्रथम खण्ड श्लोक–112 ते 159.

2) प्रवचनसार गाथा–95 ची तत्त्वप्रदीपिका टीका, बृहत्नयचक्र गाथा–11.

3) अध्यात्मकमलमार्तण्ड अध्याय–2 श्लोक–7, 8.

4) अध्यात्मकमलमार्तण्ड अध्याय–2 श्लोक–7, 8.

5) प्रवचनसार गाथा–95 ची तत्त्वप्रदीपिका टीका, बृहत्नयचक्र गाथा–12, आलापपद्धति गुणाधिकार सूत्र–9.

42. काय गुणामधे बदल होतसे, अथवा बदल न होतअसे ?
हे सांगावे गुरुजी ! मजला ? असे कसे हो होत असे।।
याच गुणांचे स्वरूप कधिही, बदलत नाही जाणावे।
म्हणुनि गुण हे परिवर्तनमय, नसे नित्य हे जाणावे।।
याच गुणांची बदलत असते, सदा अवस्था जाणावे।
म्हणुनि गुण हे परिवर्तनमय, असे हेच जाणुनि घ्यावे।।

43. सांगा मजला याच गुणांचे, किती भेद हे आहेत ?
विशेष अन् सामान्य असे हे, भेद गुणांचे आहेत।।

44. सांगा मज सामान्य गुणांची, व्याख्या कशी काय आहे ?
विशेषता अन् महत्त्व त्यांचे, सांगा कसे काय आहे ?
जे गुण सर्वहि द्रव्यामध्ये, सदा सर्वदा असतात।।
त्यांना गुण सामान्य सदोदित, ज्ञानी जगती म्हणतात।।

45. विशेष गुण म्हणतात कशाला ? हे गुरुराया ! सांगावे।
जे गुण अपुल्या द्रव्यामध्ये, सदा राहती जाणावे।।
अपुल्या द्रव्याला सोडुनिया, कधीच दुसऱ्या द्रव्यात।
जाणुनि घ्यावे ते विशेष गुण, ज्ञानी म्हणती नसतात।।

46. हे गुरुदेवा ! सांगा मजला, गुण सामान्य किती असती ?
गुण सामान्य अनंत असे ते, त्यातहि मुख्य सहा असती।।
ते अस्तित्व आणि वस्तुत्वहि अन्, द्रव्यत्व प्रमेयत्व।
जगती असती जाणुनि घ्यावे, अगुरुलघुत्व प्रदेशत्व।।

47. या सामान्य गुणाला जर का, नाहि मानले द्रव्यात।
तर मग काय कसे होइल ते ? सांगावे मज जगतात।।
द्रव्याच्या अस्तित्वाची मग, सिद्धि न जगती होईल।
द्रव्यासह त्याच्याच गुणांचा, अभाव जगती होईल।।

48. आणि विशेष गुणाला जर, का नाहि मानले द्रव्यात।
तर मग काय कसे होईल ते ? सांगावे मज जगतात।।
एक द्रव्य कधि भिन्न न होइल, दुसऱ्या द्रव्यापासुनिया।
एक द्रव्यमय दुसरी सारी, द्रव्ये होतिल जगती या।।

**प्रश्न** 49 : जीवादी प्रत्येक द्रव्यामध्ये कोण-कोणते गुण आहेत?

**उत्तर** : जीवादी सर्व द्रव्यामध्ये अस्तित्वादी अनंत सामान्य गुण समान रीतीने असतात. केवळ विशेष गुणच सर्व द्रव्यात न राहता आपआपल्या द्रव्यात असतात[1] ते पुढील प्रमाणे आहेत –

1) **जीवद्रव्य** – ज्ञान, दर्शन, सुख, वीर्य, श्रद्धा, चारित्र, क्रियावती शक्ती इत्यादी.
2) **पुद्‌गलद्रव्य** – स्पर्श, रस, गंध, वर्ण, क्रियावती शक्ती इत्यादी.
3) **धर्मद्रव्य** – गतिहेतुत्व इत्यादी.
4) **अधर्मद्रव्य** – स्थितिहेतुत्व इत्यादी.
5) **आकाशद्रव्य** – अवगाहनहेतुत्व इत्यादी.
6) **कालद्रव्य** – परिणमनहेतुत्व इत्यादी.

**प्रश्न** 50 : **गुणाची व्याख्या जाणल्यामुळे काय फायदे होतात ?**

**उत्तर** : गुणाची व्याख्या जाणल्यामुळे आम्हाला अनेक फायदे होतात –
1) गुणामुळे द्रव्याची सिद्धी होते, म्हणून द्रव्याचा परिचय प्राप्त होतो.
2) एक द्रव्याचा कोणताही गुण त्याच द्रव्याच्या दुसऱ्या गुणामध्ये देखील काही करू शकत नाही; कारण प्रत्येक गुणाचे लक्षण (स्वभाव) भिन्न-भिन्नच असते; असा सम्यक् बोध झाल्यामुळे कर्तृत्वबुद्धीचा व आकुलतेचा नाश होतो.

---

1) आलापपद्धती गुणाधिकार सूत्र-11.

*ज्ञायकस्वरूप भगवान आत्म्यामध्ये न स्पर्श आहे, न रस आहे, न गंध आहे, न वर्ण आहे आणि न शब्द आहे; म्हणून हा आत्मा इंद्रियग्राह्य नाही. स्पर्श, रस, गंध, वर्ण व शब्द या पुद्‌गलाच्या गुण व पर्याय आहेत. ज्ञान-दर्शनस्वभावी आत्मा या स्पर्शादिकांपासून भिन्न आहे. म्हणून आत्म्यामध्ये यांचे अस्तित्व अशक्य आहे. चेतनागुण सहित व अनिर्दिष्ट संस्थान (ज्याचा आकार निश्चित सांगता येत नाही) अशा भगवान आत्म्याला अव्यक्त व अलिंगग्रहण जाणावे.*

– **प्रवचनसार, गाथा**-172

49. जीवादिक द्रव्यात कोणते, गुण असती मज सांगावे ?
गुण सामान्य अनंत असे, नित द्रव्यामध्ये जाणावे ।।
द्रव्यामध्ये अस्तित्वादिक, अनंत गुण सामान्य असे ।
द्रव्यामध्ये समानतेने, सदा सर्वदा राहतसे ।।
पण विशेष गुण अपुल्या, अपुल्या द्रव्यामध्ये सदा असे ।
कोण कोणत्या द्रव्यामध्ये, विशेष गुण गुरु सांगतसे ।।
दर्शन ज्ञान वीर्य सुख श्रद्धा, संयम क्रियावती शक्ती ।
इत्यादिक हे गुणही सारे, जीवामध्ये नित असती ।।
स्पर्श गंध रस अन् वर्णादिक, क्रियावती शक्ती गुण हे ।
पुद्गल द्रव्यामध्ये निरंतर, राहतसे सारे गुण हे ।।
गतिहेतुत्वादीक गुणांनी, धर्मद्रव्य परिपूर्ण असे ।
स्थितिहेतुत्वादीक गुणांनी, अधर्मद्रव्यहि पूर्ण असे ।।
अवगाहनहेतुत्व गुणानी, हे आकाशचि पूर्ण असे ।
परिणमनादिक नित्य गुणांनी, कालद्रव्य परिपूर्ण असे ।।

50. **याच गुणांची व्याख्या जाणुनि, काय फायदे होतात ?**
व्याख्या जाणुनिया आम्हाला, बहुत फायदे होतात ।।

1. द्रव्याची सिद्धी होते अन्, द्रव्याचा परिचय होतो ।
द्रव्य गुणाच्या स्वातंत्र्याचा, खरा बोध आम्हा होतो ।।

2. एका द्रव्याचा एकहि गुण, त्याच्या दुसऱ्या गुणामधे ।
फेरबदल कधि करू न शकतो, बोध होतसे मनामधे ।।
कारण या प्रत्येक गुणाचे, लक्षण भिन्न भिन्न असते ।
या ज्ञानाने अहंकार अन्, आकुलता निघुनि जाते ।।
कर्तृत्वाचा भाव भयानक, नष्ट होतसे जीवाचा ।
कषाय शमुनि जागृत होतो, शुद्ध भाव निज आत्म्याचा ।।

# पर्याय

**प्रश्न** 51 : पर्याय कशाला म्हणतात ?

**उत्तर** : गुणाच्या कार्याला अर्थात परिणमनाला पर्याय म्हणतात.[1]

**प्रश्न** 52 : पर्यायाला दुसरी कोण-कोणती नावे आहेत ?

**उत्तर** : पर्यायाला अवस्था, क्रिया, कार्य, दशा, परिणाम, परिणमन, परिणती, अंश, भाग, प्रकार, भेद, क्रमवर्ती, व्यतिरेकी, अनित्य, विशेष इत्यादी अनेक नावे आहेत.

**प्रश्न** 53 : पर्यायाचे किती भेद आहेत ?

**उत्तर** : पर्यायाचे दोन भेद आहेत[2] – 1) व्यंजनपर्याय 2) अर्थपर्याय.

**प्रश्न** 54 : व्यंजनपर्याय कशाला म्हणतात ?

**उत्तर** : द्रव्याच्या प्रदेशत्व गुणाच्या कार्याला व्यंजनपर्याय म्हणतात. (जी पर्याय स्थूल, इंद्रियगोचर, शब्दगोचर आणि अल्पकाळ स्थिर राहते; त्याला व्यंजनपर्याय म्हणतात.)[3] **जसे** – जीवादी द्रव्यांचा आकार.

**प्रश्न** 55 : अर्थपर्याय कशाला म्हणतात ?

**उत्तर** : प्रदेशत्व गुणाला सोडून इतर सर्व गुणांच्या कार्याला (परिणमनाला) अर्थपर्याय म्हणतात. **जसे** – ज्ञानादी वा रसादी गुणांच्या अवस्था.

**प्रश्न** 56 : पर्यायाचे दुसरे भेद कोणते आहेत ?

**उत्तर** : पर्यायाचे 1) द्रव्यपर्याय व 2) गुणपर्याय हे देखील दोन भेद आहेत (प्रवचनसार ग्रंथाच्या मुख्यतेने)[4]

**प्रश्न** 57 : द्रव्यपर्याय कशाला म्हणतात ?

**उत्तर** : अनेक द्रव्याची जणु एकच अवस्था आहे असे भासित होणाऱ्या अवस्थेला द्रव्यपर्याय म्हणतात. [4]

---

1) तत्त्वार्थसूत्र अध्याय–5, सूत्र–42, आलापपद्धती पर्यायाधिकार सूत्र–15.

2) आलापपद्धति पर्यायाधिकार सूत्र–15.

3) पंचास्तिकाय गाथा–16 तात्पर्यवृत्ति टीका.

4) प्रवचनसार गाथा–93 ची टीका तत्त्वप्रदीपिका.

# पर्याय

**51. पर्यायाची व्याख्या सांगा, महत्त्व मजला सांगावे ?**
सर्व गुणांच्या परिणमनाला, नित पर्यायचि जाणावे।।

**52. पर्यायाला कोण कोणती, दुसरी नावे आहेत ?**
दशा अवस्था कार्य क्रिया अन्, अंश भाग हि आहेत।।
परिणति व्यतिरेकी क्रमवर्ती, भेद प्रकार हि आहेत।
विशेष आणि अनित्यादिकही, अनेक नावे आहेत।।

**53. पर्यायाचे भेद किती ते ? गुरुजी मजला सांगावे।**
व्यंजन आणि अर्थ पर्यायचि, दोन भेद हे जाणावे।।

**54. व्यंजनपर्यायाची व्याख्या, काय असे मज सांगावे ?**
प्रदेशत्व द्रव्याचा गुण हा, निश्चित असतो जाणावे।।
याच गुणाच्या परिणमनाला, व्यंजनपर्याय म्हणतात।
जसे जीवादि द्रव्याचेच, अनेक आकार असतात।।

**55. एक अर्थपर्यायाची मज, आता व्याख्या सांगावी ?**
एक अर्थपर्यायाची ही, आता व्याख्या ऐकावी।।
प्रदेशत्व गुण सोडुनि, दुसऱ्या सर्व गुणांच्या कार्याला।
एक अर्थपर्याय म्हणावे, जाणुनि घ्या या वचनाला।।
जगात या ज्ञानादि गुणांच्या, जशा अवस्था होतात।
आणि रसादिक सर्व गुणांच्या, जशा अवस्था होतात।।

**56. पर्यायाचे सांगा दुसरे भेद कोणते आहेत ?**
द्रव्य आणि गुणपर्यायचि, हे दोन भेद पण आहेत।।

**57. एक द्रव्यपर्यायाची मज, व्याख्या आता सांगावी ?**
एक द्रव्यपर्यायाची ही, व्याख्या आता ऐकावी।।
अनेक द्रव्यांची एकच जणु, जशी अवस्था जगी दिसे।
अशी दशा भासित होते ती, एक द्रव्यपर्याय असे।।

जसे – धोतर, पुस्तक, इत्यादी (समान जातीय द्रव्यपर्याय) यात अनंत पुद्‌गलांची पर्याय-अवस्था एकरूपाने भासित होते. जीवाची नर-नारकादी पर्याय-अनंत पुद्‌गल परमाणू अर्थात औदारिक शरीर परिणत आहार वर्गणा+कर्मरूप परिणत अनंत पुद्‌गलरूप कार्माण वर्गणा+तेजस शरीररूप परिणत तेजस वर्गणा व जीव मिळून एक अवस्था झाली असे वाटते. याला असमानजातीय द्रव्यपर्याय म्हणतात.

**प्रश्न** 58 : गुणपर्याय कशाला म्हणतात ?

**उत्तर** : अर्थपर्यायालाच गुणपर्याय असे म्हणतात.[1]

**प्रश्न** 59 : व्यंजनपर्यायाचे किती भेद आहेत ?

**उत्तर** : व्यंजनपर्यायाचे दोन भेद आहेत[2] – 1) स्वभावव्यंजनपर्याय 2)विभावव्यंजनपर्याय.

**प्रश्न** 60 : स्वभावव्यंजनपर्याय कशाला म्हणतात ?

**उत्तर** : पर निमित्ताच्या संबंथाने रहित द्रव्याचा जो आकार होतो, त्याला (आकाररूप अवस्थेला) स्वभावव्यंजनपर्याय म्हणतात.[3]

**जसे** – जीवाची सिद्ध पर्याय, पुद्‌गलाची परमाणुरूप पर्याय.

**प्रश्न** 61 : विभावव्यंजनपर्याय कशाला म्हणतात ?

**उत्तर** : पर निमित्ताच्या संबंधाने सहित द्रव्याचा जो आकार होतो, त्याला (आकाररूप अवस्थेला) विभावव्यंजनपर्याय म्हणतात.[4]

**जसे** – जीवाच्या नर-नारकादी अवस्था आणि पुद्‌गलाची स्कंधरूप पर्याय.

---

1) पंचाध्यायी प्रथम खण्ड, पद्य–62.
2) पंचास्तिकाय गाथा–16 ची तात्पर्यवृत्ति टीका.
3) पंचास्तिकाय गाथा–16 ची तात्पर्यवृत्ति टीका.
4) पंचास्तिकाय गाथा–16 ची तात्पर्यवृत्ति टीका.

जसेच पुस्तक धोतर आदिक, यात अनंत पुद्गलांची।
दशा एक प्रतिभासित होते, अनंत अणु परमाणूंचि।।
समजातीय द्रव्यपर्यायचि, आहे हे जाणुनि घ्यावे।
या विश्वातिल खरे ज्ञान हे, हे जीवा! जाणुनि घ्यावे।।
मनुष्य पर्यायाची जगती, कशी कथा आहे ऐका।
मनुष्य पर्यायाची जगती, कशी व्यथा आहे ऐका।।
अनंत पुद्गल परमाणूंनी, औदारिक तनु बनत असे।
हीच असे आहार वर्गणा, औदारिक तनु बनवितसे।।
अनंत पुद्गल परमाणूमय, नित कार्माण वर्गणा या।
बनवितसे कार्माण तनूला, कर्मरूप होऊनीया।।
अन् तैजस वर्गणा मिळूनी, तनुला तैजस बनवितसे।
याचमुळे औदारिक तनुला, तेज कांति नित येत असे।।
अशा वर्गणा आणि जीव हा, मिळुनि अवस्था होत असे।
हीच विषम जातीची जगती, एक द्रव्यपर्याय असे।।

**58. गुणपर्याय कोणती आहे, आणि कशाला म्हणतात ?**

एक अर्थपर्यायाला नित, गुण पर्यायचि म्हणतात।।

**59. व्यंजनपर्यायाचे सांगा, भेद किती हे आहेत ?**

व्यंजनपर्यायाचे नित्यहि, दोन भेद हे आहेत।।
स्वभावव्यंजन विभावव्यंजन, हे पर्याय असे दोन।
व्यंजनपर्यायाचे जगती, दोन भेद जीवा जाण।।

**60. स्वभावव्यंजनपर्यायाची, व्याख्या मजला सांगावी ?**

स्वभावव्यंजनपर्यायाची, व्याख्या ही ऐकुनि घ्यावी।।
परनिमित्त संबध रहित जो, द्रव्याचा आकार असे।
स्वभावव्यंजनपर्यायाची, व्याख्या हीच प्रसिद्ध असे।।
जसे निरंतर या जीवाची, शुद्ध सिद्ध पर्याय असे।
जाणुनि घ्या हे सत्य तत्त्व नित, जे विश्रुत सर्वास असे।।

**61. विभाव व्यंजनपर्यायाची, व्याख्या मजला सांगावी ?**

विभावव्यंजनपर्यायाची, व्याख्या ही ऐकुनि घ्यावी।।
परनिमित्त संबंध सहित जो, द्रव्याचा आकार असे।
विभावव्यंजनपर्यायाची, व्याख्या हीच प्रसिद्ध असे।।
नर नारक इत्यादि अवस्था, जसे जिवाच्या होत असे।
खरे तत्त्व हे ज्ञानी जगती, नित सर्वांना सांगतसे।।

**प्रश्न** 62 : अर्थपर्यायाचे किती भेद आहेत ?

**उत्तर** : अर्थपर्यायाचे दोन भेद आहेत[1] – 1) स्वभावअर्थपर्याय व 2) विभावअर्थपर्याय

**प्रश्न** 63 : स्वभावअर्थपर्याय कशाला म्हणतात ?

**उत्तर** : पर निमित्ताच्या संबंधाने रहित जी अर्थपर्याय होते, त्याल स्वभावअर्थपर्याय म्हणतात. **जसे** – जीवाची केवलज्ञान पर्याय.

**प्रश्न** 64 : विभावअर्थपर्याय कशाला म्हणतात ?

**उत्तर** : पर निमित्ताच्या संबंधाने जी अर्थपर्याय होते, त्याला विभावअर्थपर्या म्हणतात.[2] **जसे** – जीवाचे राग-द्वेषादि परिणाम.

**प्रश्न** 65 : कोण-कोणत्या द्रव्यामध्ये कोण-कोणत्या पर्यायी होतात ?

**उत्तर** : 1) **जीवद्रव्य** – 1) स्वभावअर्थपर्याय, 2) विभावअर्थपर्या 3) स्वभावव्यंजनपर्याय, 4) विभावव्यंजनपर्याय.

2) **पुद्‌गलद्रव्य** – जीवाप्रमाणे पुद्‌गलद्रव्यामध्ये वरील चार ही पर्यायी होता

3) **धर्मद्रव्य**, 4) **अधर्मद्रव्य**, 5) **आकाशद्रव्य**, 6) **कालद्रव्य** – या चार द्रव्यामध्ये केवळ स्वभाव अर्थपर्याय व स्वभाव व्यंजनपर्यायीच होतात. दोन विभाव पर्यायी होतच नाहीत.[3]

**प्रश्न** 66 : ज्ञान, श्रद्धा, चारित्र गुणाच्या कोण-कोणत्या पर्यायी आहेत ?

**उत्तर : ज्ञान** – कुमती, कुश्रुती, विभंगावधी ही तीन मिथ्याज्ञाने व मती, श्रु अवधी, मनःपर्यय व केवलज्ञान ही पाच सम्यग्ज्ञाने अशा एकूण ज्ञानाच्या अ पर्यायी आहेत.[4]

**श्रद्धा** – मिथ्यात्व व सम्यक्त्व या दोन पर्यायी.

**चारित्र** – मिथ्याचारित्र व सम्यकचारित्र अशा दोन पर्यायी.

---

1) पंचास्तिकाय गाथा–16 ची तात्पर्यवृत्ति टीका.
2) पंचास्तिकाय गाथा–16 ची तात्पर्यवृत्ति टीका.
3) नियमसार गाथा–18 ची पद्मप्रभमलधारीदेवकृत तात्पर्यवृत्ति टीका.
4) तत्त्वार्थसूत्र अध्याय–1 सूत्र–31.

62. **एक अर्थपर्यायाचे ही, किती भेद हे होत असे ?**
स्वभाव आणि विभाव असे हे, दोन अर्थपर्याय असे।।

63. **मग स्वभावअर्थपर्यायहि, कुणा म्हणावे सांगावे ?**
एक स्वभावअर्थपर्यायहि, गुरुजी सांगे ऐकावे।।
परनिमित्त संबध रहित जी, होते तीच अर्थपर्याय।
त्याला ज्ञानी नित म्हणतात, तीच स्वभावअर्थपर्याय।।
केवलज्ञान जसे जीवाची, परमशुद्धपर्याय असे।
ही पर्याय जगी जीवांचे, सर्व दुःख क्षणि मिटवितसे।।

64. **एक विभावअर्थपर्यायहि, कुणा म्हणावे सांगावे ?**
एक विभावअर्थपर्यायहि, गुरुजी सांगे ऐकावे।।
परनिमित्त संबंधाने जी, होते तीच अर्थपर्याय।
त्याला योगी नित म्हणतात, तीच विभावअर्थपर्याय।।
जसे जिवाच्या रागादिक या, बहुत अवस्था होतात।
याच अवस्था दुःख देतसे, श्रीगुरु हेच सांगतात।।

65. **कोण कोणत्या द्रव्यामध्ये, कोण कोणत्या पर्याय ?**
**होत असे हे गुरुजी ! सांगा, नाव असे त्यांचे काय ?**
स्वभावव्यंजन विभावव्यंजन, या पर्यायी जीवात।
स्वभावअर्थ व विभावअर्थहि, या पर्यायी होतात।।
याचप्रमाणे चार पर्याय, पुद्गलात ही होतात।
श्री गुरुदेव सकल जीवांना, ज्ञान खरे हे देतात।।
धर्म अधर्म काल अन् नभ, या नित्य चारहि द्रव्यात।
स्वभावव्यंजन स्वभावअर्थचि, या पर्यायी होतात।।

66. **श्रद्धा ज्ञान चारित्र गुणांच्या, किति पर्यायी होतात ?**
श्री गुरुवर हे या प्रश्नाचे, उत्तर आता देतात।।
या जीवाचा श्रद्धागुण हा, याच्या पर्यायी दोन।
सम्यग्दर्शन मिथ्यादर्शन, असती जीवा! हे जाण।।
कुमति कुश्रुति आणि कुअवधी, ही तीनच मिथ्याज्ञाने।
मति श्रुत अवधि मनःपर्यय, अन् केवल खरी पाच ज्ञाने।।
ज्ञानाच्या आठच पर्यायी, जाणुनि घ्या या आहेत।
धर्माचे हे ज्ञान अलौकिक, ठेवा अपुल्या हृदयात।।
सम्यक अन् मिथ्याचारित्रचि चारित्र्याच्या या दोन।
पर्यायी आहेत निरंतर, गुरुजी सांगे हे ज्ञान।।

प्रश्न 67 : स्पर्शादी गुणांच्या कोणत्या पर्यायी आहेत ?

**उत्तर : स्पर्श** – 1) शीत, 2) उष्ण, 3) स्निग्ध, 4) रुक्ष, 5) हलका, 6) भारी, 7) कोमल, 8) कठोर.[1]

रस – 1) गोड, 2) कडू, 3) तिखट, 4) खारट, 5) आंबट.[1]

गंध – 1) सुगंध, 2) दुर्गंध.[2]

वर्ण – 1) पांढरा, 2) पिवळा, 3) निळा, 4) लाल व 5) काळा.[2]

**प्रश्न 68 : पर्यायाचे स्वरूप जाणल्यामुळे काय फायदे होतात ?**

**उत्तर :** पर्यायाचे स्वरूप जाणल्यामुळे पुढीलप्रमाणे अनेक फायदे होतात –

1) द्रव्याच्या परिवर्तन स्वभावाचे ज्ञान झाल्यामुळे परसन्मुखतेचा नाश होऊन स्वसन्मुखप्रवृत्ती बनते.

2) द्रव्य व गुणांच्या सहज आणि स्वत:सिद्ध वैभवाला प्रगट करण्याचे द्वार (उपाय, साधन) केवळ पर्यायच आहे; म्हणून द्रव्य-गुणांचा परिचय पर्यायांच्या माध्यमातून आम्हाला प्राप्त होतो.

3) जीवाची पूर्ण शुद्धरूप पर्याय कार्यपरमात्मा अर्थात अरहंत-सिद्धरूप आहे; असे लक्षात आल्यामुळे अनादी-अनंत सहज, शुद्ध अशा कारणपरमात्म्याचे ज्ञान होते.

4) आस्रवादी विशेष (पर्याय) तत्त्वांचे ज्ञान झाल्यामुळे हेयोपादेयाचा विवेक प्रगट होतो.

5) प्रत्येक द्रव्याचे परिणमन त्याच्या पर्याय स्वभावानेच होते; असे जाणल्यामुळे निमित्ताधीन दृष्टी मिटते.

---

1) सर्वार्थसिद्धी अध्याय–5 सूत्र–23 ची टीका.

2) सर्वार्थसिद्धी अध्याय–5 सूत्र–23 ची टीका.

67. स्पर्श गंध रस वर्ण गुणांच्या, किति पर्यायी आहेत ?
श्री गुरुवर हे या प्रश्नाचे, उत्तर आता देतात।।
हलका भारी शीत उष्ण अन्, स्निग्ध रुक्ष हे पर्याय।
कठोर कोमल स्पर्श गुणांचे, आठ असे हे पर्याय।।
गोड कडू आंबट अन् खारट, तिखट रसाचे पर्याय।
सुगंध अन् दुर्गंध दोन हे, गंध गुणाचे पर्याय।।
पिवळा काळा निळा लाल अन्, शुभ्ररंग हे पर्याय।
ऐकुनि घ्यावे वर्ण गुणांचे, पाच असे हे पर्याय।।

68. पर्यायाचे स्वरूप जाणुनि, काय फायदे होतात ?
ऐकुनि घ्यावे निम्नलिखित हे, बहुत फायदे होतात।।

1.परिवर्तनमय या द्रव्याचे, स्वरूप जीवाला कळते।
परसन्मुखता जावुनि सत्वर, स्वभावसन्मुखता येते।।

2.द्रव्य गुणांच्या ऐश्वर्याचे, सहज ज्ञान जीवा होते।
पर्यायाच्या द्वारे अक्षय, अनंत वैभवही कळते।।

3.जीवाची संपूर्ण निरामय, शुद्ध अवस्था सिद्ध तथा।
श्री अरिहंत कार्य परमात्मा, वीतराग सर्वज्ञ यथा।।
हे कळताच अनादि अनंतचि, सहज शुद्ध निज आत्म्याचे।
ज्ञान होतसे या जीवाला, कारण ध्रुव परमात्म्याचे।।

4.आस्रवादि तत्त्वज्ञानाने, विवेक जागृत होत असे।
हेयोपादेयाचा बोधही, जीवाला नित होत असे।।

5.या विश्वात सकल द्रव्यांचे, निज पर्याय स्वभावाने।
नित्य परिणमन अपुल्यामध्ये, होते अपुल्या शक्तीने।।
या ज्ञानाने या जीवाची, निमित्तदृष्टी मिटत असे।
निर्मल शाश्वत वीतरागमय, स्वरूप दृष्टी येत असे।।
पराधीन वृत्ती जावुनिया, मग स्वाधीन वृत्ती येते।
निज द्रव्याच्या स्वातंत्र्याचे, दिव्यज्ञान जीवा होते।।

# अस्तित्व गुण

**प्रश्न** 69 : अस्तित्व गुण कशाला म्हणतात ?

**उत्तर** : ज्या शक्तीच्या कारणाने (कोणत्याही) द्रव्याचा (कधीही) नाश होत नाही व नवीन द्रव्य उत्पन्न ही होत नाही; त्या शक्तीला अस्तित्व गुण म्हणतात.[1]

**प्रश्न** 70 : अस्तित्व गुणाच्या कारणाने द्रव्याला काय म्हणतात ?

**उत्तर** : अस्तित्व गुणाच्या कारणाने द्रव्याला 'सत्' अथवा 'सत्ता' म्हणतात.

**प्रश्न** 71 : अस्तित्व गुणाला नाही मानले तर काय हानी होईल ?

**उत्तर** : अस्तित्व गुणाला नाही मानले तर द्रव्याचा सर्वथा अभाव मानावा लागेल. द्रव्याचा सर्वथा अभाव मानला तर विश्वाचा पण अभाव मानावा लागेल.

**प्रश्न** 72 : अस्तित्व गुणाला जाणल्यामुळे काय फायदे होतात ?

**उत्तर** : अस्तित्व गुणाला जाणल्यामुळे पुढीलप्रमाणे अनेक फायदे होतात –

1) जन्म-मरणाने रहित अनादी-अनंत अशा आपल्या अस्तित्व गुणाचे ज्ञान झाल्यामुळे मरणभय टळते.

2) मी कोणाचे रक्षण करू शकत नाही आणि इतर कोणीही माझे रक्षण करू शकत नाहीत; कारण मी स्वयं सुरक्षित आहे; असे ज्ञान झाल्यामुळे अरक्षाभय टळते.

3) प्रत्येक जीव देखील जन्म मरणाने रहित अनादी-अनंत आहे. म्हणून मी कोणाला वाचवू शकतो अथवा मारू शकतो; अशा विपरीत अभिप्रायाचा अभाव होतो.

4) प्रत्येक द्रव्य व विश्व अनादी-अनंत आहे. म्हणून जगतकर्ता कोणी ईश्वर आहे, कोणी ईश्वर जगाचे रक्षण करतो व कोणी ईश्वर जगाचा नाश करतो; अशी मिथ्या बुद्धी निघून जाते.

---

1) आलापपद्धति गुणाधिकार सूत्र–9 व गुणव्युत्पत्ति अधिकार सूत्र–94, नियमसार गाथा–34 ची पद्मप्रभमलधारिदेवकृत तात्पर्यवृत्ति टीका.

# अस्तित्व गुण

69. **या अस्तित्व गुणाची सांगा, व्याख्या मजला गुरुदेवा !**
स्वरूप या अस्तित्व गुणाचे, महत्त्व सांगा गुरुदेवा !
ज्या शक्तीच्या योगाने जगि, द्रव्य नष्ट कधि होत नसे।
आणि नवीन द्रव्य या जगती, उत्पन्नहि कधि होत नसे।।
द्रव्याचे अस्तित्व अबाधित, ज्या शक्तीने नित्य असे।
त्या शक्तीला अस्तित्वचि गुण, योगी जन नित म्हणत असे।।

70. **या अस्तित्व गुणाच्या कारण, काय म्हणावे द्रव्याला ?**
सत् वा सत्ता या नावाने, जन जाणतसे द्रव्याला।।

71. **या अस्तित्व गुणाला जर का, नाहि मानले जगतात ?**
**तर होईल कशाची हानी, सांगा मजला जगतात ?**
या द्रव्याचा सहज सर्वथा, अभाव होइल जाणुनि घ्या।
याचमुळे मग या विश्वाचा, अभाव होइल जाणुनि घ्या।।

72. **या अस्तित्व गुणास जाणता, किती फायदे होतात ?**
या अस्तित्व गुणास जाणता, बहुत फायदे होतात।।
1. जन्म मृत्युने रहित असे, निज द्रव्याचे अस्तित्व सदा।
याचमुळे जगि जन्म मृत्युचे, भय नसते जीवास सदा।।
2. मी न कुणाचे रक्षण करतो, कुणी न मजला वाचवितो।
या ज्ञानाने जगी पूर्णतः, स्वयं सुरक्षित मी असतो।।
3. जन्म मृत्युने रहित जीव हा, जगी अनादि अनंत असे।
स्वतंत्र शाश्वत नित्य असे हा, त्रैकालिक जगतात असे।।
या ज्ञानाने मीच कुणाला, मारू शकतो जगवीतो।
हा मिथ्या अभिप्राय मनातुन, निश्चित ही निघुनि जातो।।
4. सारी द्रव्ये अन् सारे हे, विश्व अनादि अनंत असे।
म्हणून यांचा कर्ता धर्ता, हर्ता ईश्वर कुणी ही नसे।।
मिथ्याभ्रम विलया जाऊनिया, खरे ज्ञान जीवा होते।
निज द्रव्याच्या अमरत्वाचे, प्राणतत्त्व त्याला कळते।।

5) अस्तित्व गुणाच्या अपेक्षेने जीवादी सर्व द्रव्ये समान आहेत; असे जाणल्यामुळे विषमता निघून जाते व समता भाव प्रगट होतो.

6) प्रत्येक द्रव्याचे अस्तित्व स्वतंत्र आहे; असे ज्ञान झाल्यामुळे परद्रव्यासंबधी एकत्व-ममत्व-कर्तृत्व व भोक्तृत्व बुद्धीचा अभाव होतो.

7) मी कोणाला उत्पन्न करू शकत नाही आणि मला देखील कोणी उत्पन्न केले नाही; म्हणून अभिमान व दीनतेचा नाश होतो.

# वस्तुत्व गुण

**प्रश्न** 73 : वस्तुत्व गुण कशाला म्हणतात ?
**उत्तर** : ज्या शक्तीच्या कारणाने द्रव्यामध्ये अर्थक्रियाकारित्व (प्रयोजनभूतक्रिया) होते, त्या शक्तीला वस्तुत्व गुण म्हणतात.[1]

**प्रश्न** 74 : 'अर्थक्रियाकारित्व' किंवा 'प्रयोजनभूतक्रिया' या शब्दाचा आशय काय ?
**उत्तर** : प्रत्येक द्रव्य आपआपल्या स्वभावाला अनुसरूनच कार्य करते; निरर्थक नाही, यालाच प्रयोजनभूतक्रिया म्हणतात.[2] **जसे** – डोळे पाहण्याचे काम करतात, कान ऐकण्याचे काम करतात. तसे जीव जाणण्याचे काम करतो, अन्य कार्य करू शकत नाही.

**प्रश्न** 75 : वस्तुत्व गुणाच्या कारणाने द्रव्याला काय म्हणतात ?
**उत्तर** : वस्तुत्व गुणाच्या कारणाने द्रव्याला 'वस्तु' म्हणतात. द्रव्यामध्ये गुण राहतात/असतात, म्हणून द्रव्य वस्तु आहे.

**प्रश्न** 76 : वस्तुत्व गुणाला नाही मानले तर काय हानी होईल ?
**उत्तर** : वस्तुत्व गुणाला नाही मानले तर द्रव्याच्या निरर्थकपणाचा म्हणजेच कार्यशून्यतेचा प्रसंग येईल.

---

1) आलापपद्धती गुणाधिकार सूत्र–9 व गुणव्युत्पत्ति अधिकार सूत्र–95.

2) कार्तिकेयानुप्रेक्षा गाथा–225, 226.

5\. या अस्तित्व गुणाच्या द्वारे, द्रव्यांच्या नित्यत्वाचे।
ज्ञान होतसे या जीवाला, अपुल्या नित्य स्वभावाचे।।
अन् याच्याच अपेक्षेने नित, द्रव्ये एकसमान दिसे।
हे कळताच विषमता जाते, हृदयी समता येत असे।।
6\. प्रत्येक द्रव्य हे या जगती, स्वतंत्र अन् संपूर्ण असे।
या ज्ञानाने या जीवाची, अहंबुद्धि ही जात असे।।
अन् एकत्व ममत्व भाव हा, जीवाचा निघुनि जातो।
कर्तृत्वाचा भोक्तृत्वाचा, अहंभाव निघुनि जातो।।
7\. मी न कुणाला निर्मियले, अन् कुणी न मजला निर्मियले।
हे कळता अभिमान दीनता, खोटे भाव लया गेले।।

# वस्तुत्व गुण

**73. या वस्तुत्व गुणाची व्याख्या, गुरुजी मजला सांगावी।**
या वस्तुत्व गुणाची व्याख्या, मन लावुनिया ऐकावी।।
ज्या शक्तीच्या योगाने नित, जगी सहाही द्रव्यात।
अर्थक्रियाकारित्व होतसे, ठेवा अपुल्या ध्यानात।।
त्या शक्तीला वस्तुत्वचि गुण, जगात ज्ञानी म्हणतात।
ऐकुनि घ्यावे महत्त्व याचे, ठेवा अपुल्या हृदयात।।
अर्थक्रियाकारित्वाचे जे, दुसरे नाव जगात असे।
तीच प्रयोजनभूत क्रिया हे, ज्ञानी जन नित म्हणत असे।।

**74. याच प्रयोजनभूत क्रियेचा, आशय समजावुनि सांगा।**
**महत्त्व याचे अर्थचि याचा, समजावुन मजला सांगा।।**
हे प्रत्येक द्रव्य या जगती, अपुले अपुले कार्य करी।
अपुल्या स्वभावास अनुसरुनी, नियमित अपुले कार्य करी।।
जसे नयन पाहण्याचे केवळ, जीव जाणण्याचे कार्य।
करित असे नित पण या जगती, करी न कधि दुसरे कार्य।।

**75. या वस्तुत्व गुणाच्या कारण, काय म्हणावे द्रव्याला ?**
या वस्तुत्व गुणाच्या कारण, वस्तु म्हणावे द्रव्याला।।
द्रव्यामध्ये नित गुण असती, म्हणुनी द्रव्य वस्तु आहे।
जाणुनि घ्या वस्तुत्व गुणाचे, हेच खरे लक्षण आहे।।

**76. गुण वस्तुत्व जगी न मानला, कसे काय तर होईल ?**
कार्यशून्यतेमुळे द्रव्य हे जगी, निरर्थक होईल।।

प्रश्न 77 : वस्तुत्व गुणाला जाणल्यामुळे काय फायदे होतात ?

उत्तर : वस्तुत्व गुणाला जाणल्यामुळे पुढीलप्रमाणे अनेक फायदे होतात –

1) प्रत्येक द्रव्य आपआपली प्रयोजनभूतक्रिया करते. म्हणून जगातील कोणताही पदार्थ निरर्थक नाही; असे समजून येते.

2) प्रत्येक द्रव्याची प्रयोजनभूतक्रिया त्याच्या वस्तुत्व गुणामुळेच होते; इतर ईश्वर इत्यादीकांच्या केल्यामुळे होत नाही; याप्रमाणे वस्तुच्या स्वातंत्र्याचे ज्ञान होते.

3) माझ्या ज्ञान-दर्शनरूप कार्याचा कर्ता मी स्वयं आहे; पुस्तक, अध्यापक इत्यादी पदार्थ कर्ता नाहीत; याप्रमाणे स्वावलंबनाचे ज्ञान होते.

4) परद्रव्याचे कार्य देखील त्यांची प्रयोजनभूतक्रिया आहे. ती त्यांच्या वस्तुत्व गुणामुळे झाली आहे; असे समजून घेतल्यामुळे परद्रव्याविषयी राग-द्वेष उत्पन्न होत नाहीत, शांती व समाधान राहते.

5) अरहंत व सिद्ध यांच्या समान मी देखील ज्ञान-दर्शन स्वभावीच आहे; अशी श्रद्धा उत्पन्न होते. जसे केवली सर्व वस्तुंना मात्र जाणतात, तसे मी देखील फक्त जाणावयाचेच कार्य करतो.

6) जाणणे जीवाचे प्रयोजनभूतकार्य आहे; म्हणून जाणणे हे जीवाला दुःखास कारण होऊ शकत नाही.

7) ज्ञाता-दृष्टारूप कार्याशिवाय माझे कोणतेही काम नाही; असे जाणल्यामुळे आपल्या कार्यसीमेचा निर्णय होतो व परकर्तृत्वाचा निषेध होतो.

*या विश्वामध्ये जी वस्तू आहे, ती स्वभावमात्र आहे आणि 'स्व' चे भवन अर्थात् परिणमनच स्वभाव आहे; म्हणून निश्चय नयाने ज्ञानाचे अस्तित्व म्हणजेच परिणमन आत्मा होय. क्रोध उत्पन्न होणे अर्थात् क्रोधरूपाने परिणमनच क्रोध आहे.*

— समयसार, गाथा-71 ची टीका

77. या वस्तुत्व गुणास जाणता, काय फायदे होतात ?

या वस्तुत्व गुणास जाणता, बहुत फायदे होतात।।

1.प्रत्येक द्रव्य हे या जगती, अपुले अपुले कार्य करी।
नित्य प्रयोजनभूत क्रिया ही, निश्चित नियमित द्रव्य करी।।
म्हणुनि कोणताही पदार्थ जगि, कधी निरर्थक ना असतो।
या ज्ञानाने या जीवाचा, अहंकार निघुनि जातो।।

2.या वस्तुत्व गुणाच्या द्वारे, नित्य प्रयोजनभूत क्रिया।
करित असे प्रत्येक द्रव्य हे, अपुली अपुली नित्य क्रिया।।
या ज्ञानाने या जीवाची, आकुलता निघुनि जाते।
आणि वस्तुच्या स्वातंत्र्याचे, खरे ज्ञान जीवा होते।।

3.मी माझ्या दर्शन ज्ञानाचा, जगती कर्ता स्वयं असे।
अन्य कुणीही पदार्थ अथवा, ईश्वर या जगतात नसे।।
या ज्ञानाने या जीवाचा, क्षणि कर्तृत्वभाव जातो।
स्वावलंबनाची बुद्धी अन्, स्वाभिमान जागृत होतो।।

4.या वस्तुत्व गुणाच्या द्वारे, हीच प्रयोजनभूत क्रिया।
परद्रव्यातहि होत असे नित, अपुली अपुली नित्य क्रिया।।
हे समजुनि येता क्षणीच मग, पर द्रव्यासंबधीचा।
राग द्वेष जावुनिया येतो, भाव शांति आनंदाचा।।

5.श्री अरहंत सिद्ध देवासम, दर्शन ज्ञान स्वरूपी मी।
सर्व जीव ही ज्ञान स्वभावी, ज्ञानानंद स्वभावी मी।।
या श्रद्धेच्या ज्ञानाने मी, अदभुत भाव मुग्ध होतो।
जसे केवली भगवंतासम, ज्ञाता दृष्टा मी होतो।।

6.एक प्रयोजनभूत कार्य हे, नित्य जाणणे जीवाचे।
म्हणुनि जाणणे हे कारण, नच या जीवाच्या दुःखाचे।।

7.नित्य जाणणे या कार्याविण, दुसरे कार्य न जीवाचे।
या श्रद्धेने संसारातहि, मंगल होते जीवाचे।।
याचमुळे अपुल्या कार्याच्या, सीमेचा निर्णय होतो।
अन् जगती परकर्तृत्वाचा, निषेध निश्चित नित होतो।।

# द्रव्यत्व गुण

**प्रश्न** 78 : द्रव्यत्व गुण कशाला म्हणतात ?

**उत्तर** : ज्या शक्तीच्या कारणाने द्रव्याची अवस्था निरंतर बदलत राहते; त्या शक्तीला द्रव्यत्व गुण म्हणतात.[1]

**प्रश्न** 79 : द्रव्यत्व गुणामुळे वस्तुला काय म्हणतात ?

**उत्तर** : द्रव्यत्व गुणामुळे वस्तुला द्रव्य म्हणतात.

**प्रश्न** 80 : द्रव्यत्व गुणाला नाही मानले तर काय हानी होईल ?

**उत्तर** : द्रव्यत्व गुणाला नाही मानले तर द्रव्य सर्वथा कूटस्थ नित्य होण्याचा प्रसंग येईल; जे प्रत्यक्ष विरूद्ध आहे.

**प्रश्न** 81 : **द्रव्यत्व गुणाला जाणल्यामुळे काय फायदा होतो ?**

**उत्तर** : द्रव्यत्व गुणाला जाणल्यामुळे खालीलप्रमाणे अनेक फायदे होतात –

1) द्रव्य सर्वथा कूटस्थ (नित्य) आहे; या मिथ्या मान्यतेचे निराकरण होते व यथार्थ वस्तुस्वरूपाचे ज्ञान होते.

2) प्रत्येक द्रव्याच्या स्वतंत्र परिणमन शक्तीचे ज्ञान होते.

जसे – संपूर्ण शरीर वा शरीरातील दात इत्यादी अवयव नेहमी बदलत राहतात.

3) परद्रव्याच्या कर्तृत्वबुद्धीचा नाश होतो.

4) पराश्रीत बुद्धीचा नाश होतो.

5) मी आपल्या परिणमनाचा स्वयं कर्ता आहे; असे ज्ञान झाल्यामुळे स्वसन्मुखतेची प्रेरणा मिळते.

6) परिणमन करणे वस्तुचा स्वभाव आहे; असे समजल्यामुळे कोणत्याही परिवर्तनाला (बदल) पाहून भय उत्पन्न होत नाही. जीवन सहज व सुखद बनते.

---

1) आलापपद्धति गुणाधिकार सूत्र–9 व गुणव्युत्पत्ति अधिकार सूत्र–98.

# द्रव्यत्व गुण

**78. या द्रव्यत्व गुणाची व्याख्या, सांगा मजला गुरुदेवा !**
**विशेषता अन् महत्त्व याचे, सांगा मजला गुरुदेवा !**
ज्या शक्तीच्या सहयोगाने, बदल होतसे वस्तूत।
द्रव्याची पर्याय निरंतर, बदलत असते जगतात।।
त्या शक्तीला गुण द्रव्यत्वचि, ज्ञानी जन नित म्हणतात।
तत्त्व खरे हे जाणुनि घ्यावे, अन् ठेवावे हृदयात।।

**79. या द्रव्यत्व गुणाच्या कारण, काय म्हणावे वस्तूला ?**
या द्रव्यत्व गुणाच्या कारण, द्रव्य म्हणावे वस्तूला।।

**80. गुण द्रव्यत्वचि जर न मानला, हानि कोणती होईल ?**
द्रव्य सर्वथा नित्य निरंतर, अन् कूटस्थचि होईल।।

**81. या द्रव्यत्व गुणास जाणता, काय फायदे होतात ?**
या द्रव्यत्व गुणास जाणता, बहुत फायदे होतात।।

1. द्रव्य सर्वथा नित्य निरंतर, आणि पूर्ण कूटस्थ असे।
हा विचार जाउनि वस्तूचे, सत्य स्वरूपचि कळत असे।।
2. प्रत्येक द्रव्य हे या जगती, स्वयं सदा बदलत असते।
सत्य स्वरूप वस्तूचे कळते, जशि काया बदलत असते।।
3. पर द्रव्यासंबधीची ही, भ्रामक बुद्धि लया जाते।
निज द्रव्याच्या ज्ञान शक्तिची, जाण जिवाला मग होते।।
4. बुद्धि पराश्रित विलया जाते, स्वाश्रित बुद्धि प्रगट होते।
अपुल्या निर्मल स्वभावावरी, अपुली श्रद्धा स्थिर होते।।
5. मी अपुल्या नित परिणमनाचा, जगी स्वयं कर्ता आहे।
निज सन्मुखतेचा प्रेरक हा, एकच मार्ग सदा आहे।।
6. नित्य परिणमन वस्तूचा हा, स्वभाव आहे जगतात।
या ज्ञानाने परिणमनाची, भीति न उरते हृदयात।।
सहज सुखद आनंदाने मग, जीवन जीव जगी जगतो।
अपुल्या पुरुषार्थावर अविचल, तो विश्वास सदा करतो।।

7) कोणत्याही वस्तू (द्रव्य) ची स्थिती सदा एकसमान राहत नाही; असे जाणल्यामुळे राग-द्वेष उत्पन्न होत नाहीत; जीवनात समता प्रगट होते.

8) वर्तमानकालीन दु:खमय संसार अवस्थेचा नाश होऊन सुखद सिद्ध दशा प्रगट होऊ शकते; असा विश्वास उत्पन्न होतो.

9) द्रव्याची पर्याय निरंतर बदलत राहते; असे जाणल्यामुळे पर्यायमूढता नष्ट होते.

10) परदोष पाहण्याच्या हीन वृत्तीचा परिहार होतो. कर्म बलवान आहे; अशी मिथ्या भ्रांती निघून जाते.

# प्रमेयत्व गुण

**प्रश्न** 82 : प्रमेयत्व गुण कशाला म्हणतात ?

**उत्तर** : ज्या शक्तीच्या कारणाने द्रव्य कोणत्या ना कोणत्या ज्ञानाचा विषय बनते (ज्ञेय बनते); त्या शक्तीला प्रमेयत्व गुण म्हणतात.[1]

**प्रश्न** 83 : प्रमेयत्व गुणामुळे द्रव्याला काय म्हणतात ?

**उत्तर** : प्रमेयत्व गुणामुळे द्रव्याला प्रमेय अथवा ज्ञेय म्हणतात.

**प्रश्न** 84 : जीवादी सहा द्रव्यामध्ये ज्ञेयरूप द्रव्ये किती व ज्ञातारूप द्रव्ये किती व कोणती ?

**उत्तर** : जीवादी सहाही द्रव्ये ज्ञेय आहेत; कारण सर्व द्रव्यामध्ये प्रमेयत्व नामक गुण आहे.

जीवादी सर्व द्रव्यामध्ये केवळ एक जीवद्रव्यच ज्ञातारूप द्रव्य आहे, कारण जीव ज्ञानवान आहे.

---

1) आलापपद्धती गुणाधिकार सूत्र—9 व गुणव्युत्पत्ति अधिकार सूत्र—98.

7. स्थिती कोणत्याही वस्तूची, एक समान रहात नसे।
या ज्ञानाने राग द्वेष मग, मनात कधिही येत नसे।।
या जीवाच्या हृदयामाजी, समताभाव प्रगट होतो।
ईर्ष्या मत्सर तुच्छ भाव हा, मनातुनि निघुनि जातो।।
8. वर्तमानकालीन भयंकर, दुःखपूर्ण संसार दशा।
जाऊनिया अति सुखमय निर्मल, येवू शकते सिद्ध दशा।।
हा अनुपम विश्वास येतसे, या जीवाच्या हृदयात।
आणि अलौकिक अपूर्व श्रद्धा, प्रगट होतसे जीवात।।
9. द्रव्याची पर्याय निरंतर, बदलत असते जगतात।
हे कळता पर्याय मूढता, निघुनि जाते निमिषात।।
10. परनिंदा करण्याची वृत्ती, अन् परदोष पाहण्याची।
नष्ट होतसे काकदृष्टि ही, नीच व अनुचित जातीची।।
कर्म असे बलवान जगी या, ही मिथ्या भ्रांती जाते।
अन् आत्म्याच्या ज्ञान शक्तिची, दिव्य प्रतीती मग येते।।

## प्रमेयत्व गुण

**82. प्रमेयत्व गुण कुणा म्हणावे ? हे गुरुजी मज सांगावे।**
व्याख्या त्याची अन् विशेषता, आता ऐकुनिया घ्यावे।।
ज्या शक्तीच्या योगाने नित, द्रव्य ज्ञेय जगि बनत असे।
स्वतःसिद्ध तर सारे जग हे, ज्ञेय स्वयं ही बनत असे।।
त्या शक्तीला प्रमेयत्व गुण, श्री जिनवाणी म्हणत असे।
निःशंकित होउनि ज्ञानी जन, तत्त्व खरे हे जाणतसे।।

**83. प्रमेयत्व गुण-शक्तिमुळे, या काय म्हणावे द्रव्याला ?**
प्रमेयत्व गुण-शक्तिमुळे, या ज्ञेय म्हणावे द्रव्याला।।

**84. जीवादिक षट् द्रव्यामध्ये, द्रव्ये किती ज्ञेयरूप ?**
**आणि किती कोणती असे, ते सांगावे ज्ञातारूप ?**
जीवादिक षट् द्रव्ये सारी, ज्ञेयरूप जगतात असे।
कारण या सर्व हि द्रव्यातच, प्रमेयत्व गुण नित्य वसे।।
जीव द्रव्य हे केवळ एकच, ज्ञातारूप जगात असे।
कारण जीव सदा हा एकच, ज्ञानवान जगतात असे।।

**प्रश्न** 85 : ज्ञेयरूप व ज्ञातारूपही कोणते द्रव्य आहे ?

**उत्तर** : एक जीवद्रव्यच ज्ञेय व ज्ञातारूप द्रव्य आहे.

**प्रश्न** 86 : प्रमेयत्व गुणाला न मानले तर काय हानी होईल ?

**उत्तर** : प्रमेयत्व गुणाला नाही मानले तर द्रव्ये सर्वथा अज्ञात राहतील. केवलज्ञान देखील सिद्ध होणार नाही.

**प्रश्न** 87 : **प्रमेयत्व गुणाला जाणल्यामुळे काय फायदे होतात ?**

**उत्तर** : प्रमेयत्व गुणाला जाणल्यामुळे खालीलप्रमाणे अनेक फायदे होतात –

1) प्रत्येक जीवामध्ये प्रमेयत्व गुण असल्यामुळे जीव आपल्या आत्म्याला जाणू शकतो; असा विश्वास उत्पन्न होतो.

2) आमच्या पापकार्याला अरहंत-सिद्ध भगवान जाणत आहेत; असे ज्ञान झाल्यामुळे आम्हाला पाप कार्यांना सोडून देण्याची प्रेरणा मिळते.

3) जीवादी सहाही द्रव्यामध्ये प्रमेयत्व गुण असल्यामुळे ती सर्व (गुण-पर्यायासह) कोणत्या न कोणत्या ज्ञानाने जाणली जाऊ शकतात; म्हणून केवलज्ञानाची सिद्धी होते.

4) पर द्रव्याबरोबर माझा केवळ ज्ञेय-ज्ञायक संबंध आहे; कर्ता-कर्म इत्यादी अन्य कोणताच संबंध नाही; असे जाणल्यामुळे पर द्रव्याबरोबरचा कर्तृत्व-भोक्तृत्व बुद्धीचा नाश होतो.

5) प्रमेयत्व गुणाच्या कारणाने ज्ञेय पदार्थ ज्ञानामध्ये सहजच झळकतात, प्रतिबिंबित होतात; म्हणून ज्ञेयांना जाणण्याची आकुलता ही नाहीशी होते.

6) प्रत्येक पदार्थ आपआपल्या मर्यादेत राहून (ज्ञेय वस्तू आपल्या ठिकाणी, ज्ञानरूप ज्ञाता अर्थात् जीवद्रव्य आपल्या ठिकाणी राहतात) ज्ञानाचे ज्ञेय बनतात; यावरून ज्ञाता द्रव्याची आणि ज्ञेय द्रव्याची भिन्नता लक्षात येते. त्यामूळे जीवाची वृत्ती वीतरागतेकडे वळते.

**85. ज्ञेयरूप अन् ज्ञातारूपचि, द्रव्य कोणते जगी असे ?**
ज्ञेयरूप अन् ज्ञातारूपचि, जीवद्रव्य हे जगी असे।

**86. प्रमेयत्व गुण जर न मानला, काय हानी मग होईल ?**
ही सारी षट् द्रव्ये जगती, नित अज्ञातचि राहील।।
अन् केवलज्ञानाची सिद्धी, कधी कधी नच होईल।
याचमुळे हे विश्वचि सारे, केवळ भ्रममय होईल।।

**87. प्रमेयत्व गुणाच्या ज्ञानाने, जगि काय फायदे होतात ?**
प्रमेयत्व गुणाच्या ज्ञानाने, जगि बहुत फायदे होतात।।

1. या प्रत्येकचि जीवामध्ये, प्रमेयत्व गुण नित असतो।
याचमुळे अपुल्या आत्म्याला, हाच जीव जाणू शकतो।।
जेव्हा हा विश्वास जिवाच्या, हृदयामध्ये येत असे।
तेव्हा त्या जीवाची दृष्टी, निज आत्म्यावर वळत असे।।

2. अमुच्या पाप क्रियेला निश्चित, केवलज्ञानी जाणतसे।
पाप सोडण्याचीच प्रेरणा, या ज्ञानाने मिळत असे।।

3. याच सहाही द्रव्यामध्ये, प्रमेयत्व गुण वसत असे।
म्हणुनि कुण्यातरी ज्ञानाने नित, द्रव्ये ज्ञेयचि बनत असे।।
याचमुळे केवलज्ञानाची, सिद्धी या जगती होते।
अन् जीवाची अविचल श्रद्धा, केवलज्ञानावर बसते।।

4. परद्रव्याशी ज्ञेय व ज्ञायक, माझा नित संबंध असे।
याला सोडुनि अन्य कोणता, माझ्याशी संबंध नसे।।
या ज्ञानाने परद्रव्याशी, कर्ता भोक्ता भावाचा।
नाश होतसे परद्रव्याच्या, स्वामित्वाच्या भावाचा।।

5. प्रमेयत्व गुण-शक्तीद्वारे, ज्ञेय वस्तु ज्ञानामध्ये।
सहजच प्रतिबिंबित होते नित, सर्व विश्व ज्ञानामध्ये।।
या ज्ञानाने ज्ञेय वस्तुला, जाणुनि घेण्याची प्रीती।
नाश पावते आकुलतामय, जीवाची इच्छाशक्ती।।

6. ज्ञेय नि ज्ञाता ही द्रव्ये नित, अपुल्या अपुल्या सीमेत।
राहुनिया मग परस्परांचे, ज्ञेय व ज्ञायक बनतात।।
याचमुळे ज्ञाता ज्ञेयाची, नित्य भिन्नता कळत असे।
सरागता जाउनि जीवाची, वीतरागता येत असे।।

# अगुरुलघुत्व गुण

**प्रश्न** 88 : अगुरुलघुत्व गुण कशाला म्हणतात ?

**उत्तर** : ज्या शक्तीच्या कारणाने द्रव्याचे द्रव्यत्व कायम राहते, अर्थात

1) एक द्रव्य दुसरे द्रव्यरूप होत नाही.

2) एक गुण दुसऱ्या गुणरूप होत नाही. आणि

3) द्रव्यामध्ये असणारे अनंत गुण विखरून अलग-अलग होत नाहीत;

त्या शक्तीला अगुरुलघुत्व गुण म्हणतात.[1]

**प्रश्न** 89 : 'अगुरुलघुत्व' शब्दाचा अर्थ काय आहे ?

**उत्तर** : अ = नाही, गुरु = मोठा, लघु = लहान. अर्थात प्रत्येक द्रव्य आपल्यामध्ये पूर्ण आहे. म्हणजेच द्रव्य आहे तेवढेच व तसेच नेहमीसाठी राहते. एक द्रव्य दुसऱ्या द्रव्यामध्ये मिळून मोठे होत नाही अथवा द्रव्यामधून गुण विखरून वेग-वेगळे होत नसल्यामुळे द्रव्य लहान देखील होत नाही.

**प्रश्न** 90 : अगुरुलघुत्व गुणाला नाही मानले तर काय हानी होईल ?

**उत्तर** : अगुरुलघुत्व गुणाला नाही मानले तर द्रव्य-गुण-पर्यायांच्या स्वतंत्रतेचा नाश होण्याचा प्रसंग येईल.

**प्रश्न** 91 : **अगुरुलघुत्व गुणाला जाणल्यामुळे काय फायदे होतात ?**

**उत्तर** : अगुरुलघुत्व गुणाला जाणल्यामुळे खालीलप्रमाणे अनेक फायदे होतात –

1) विश्वातील प्रत्येक द्रव्य, द्रव्याचा प्रत्येक गुण व गुणाची प्रत्येक पर्याय आपआपल्या अपेक्षेने सत्, अहेतुक आणि निरपेक्ष आहे; अशा वस्तुव्यवस्थेचा स्पष्ट व पक्का निर्णय होतो.

---

1) आलापपद्धति गुणाधिकार सूत्र–९ व गुणव्युत्पत्ति अधिकार सूत्र–९९, समयसार आत्मख्याति टीकेतील 17 वी शक्ती.

# अगुरुलघुत्व गुण

**88. अगुरुलघुत्व गुणाची व्याख्या, हे गुरुवर ! मजला सांगा।**
**विशेषता अन् अर्थ तयाचा, समजावुनि मजला सांगा।।**
ज्या शक्तीच्या सहयोगाने, द्रव्याचे द्रव्यत्व सदा।
कायम असते त्या शक्तीला, अगुरुलघुत्वचि जाण सदा।।
1.एक द्रव्य कधि अन्य द्रव्यमय, होत नसे या जगतात।
2.आणि एक गुण दुसऱ्या गुणमय, होत नसे या जगतात।।
3. द्रव्यातिल गुण अनंत अक्षय कधि, विखरुनिया जात नसे।
आणि कधिही वेगवेगळे, होत नसे हो ! होत नसे।।
त्या शक्तीला अगुरुलघुत्वचि, गुण ज्ञानी जन म्हणतात।
तत्त्व खरे हे जाणुनि योगी, निज द्रव्यातच रमतात।।

**89. अगुरुलघुत्व कशास म्हणावे ? हे गुरुजी मजला सांगा।**
**या शब्दाचा अर्थ काय तो, समजावुनि गुरुजी सांगा।।**
हलके भारी लहान मोठे, द्रव्य कधिही होत नसे।
असे जेवढे तसे राहते, द्रव्य पूर्ण संपूर्ण असे।।
एक द्रव्य दुसऱ्या द्रव्यातच, मिळून मोठे होत नसे।
द्रव्यातिल गुण विखरुन जाउनि, द्रव्य लहानहि होत नसे।।

**90.अगुरुलघुत्वचि गुण न मानला, हानि कोणती होईल ?**
द्रव्य गुणांच्या स्वतंत्रतेचा, विनाश निश्चित होईल।।
स्वतंत्रता या पर्यायांची, नष्ट सर्वथा होईल।
आणि मनोहर या विश्वाचा, अभाव निश्चित होईल।।

**91.अगुरुलघुत्व गुणास जाणता, काय फायदे होतात ?**
अगुरुलघुत्व गुणास जाणता, बहुत फायदे होतात।
1. विश्वातिल प्रत्येक द्रव्य अन्, त्याचे गुण पर्याय सदा।
सत् निरपेक्ष अहेतुक असती, ज्ञान होइ जीवास सदा।

2) प्रत्येक वस्तुचे द्रव्य, क्षेत्र, काल व भाव वेग-वेगळे असल्यामुळे एका वस्तुचा दुसऱ्या वस्तुशी कोणताही संबंध नाही अर्थात द्रत्येक द्रव्य स्वतंत्र आहे; असे वस्तुस्वरूपाचे यथार्थ ज्ञान होते.

3) व 4) एक द्रव्य अन्य द्रव्यरूप होत नाही अर्थात जीवद्रव्य अन्य पुद्‌गलादीरूप होत नाहीत; बदलत नाहीत. किंवा जीवद्रव्य, जीवद्रव्यच आणि पुद्‌गलादी द्रव्य सुद्धा पुद्‌गलादी स्वतःरूपच राहतात. **जसे** – शरीर (पुद्‌गल) कधीही जीवरूप बदलत नाही. टी. वी., टेपरेकॉर्ड, रेडियो कधीही जीव होत नाही. लक्ष्मणाचा जीव रामाचा जीवरूप होऊ शकला नाही, असे जाणल्यामुळे कर्तृत्वबुद्धीचा नाश होतो.

5) प्रत्येक गुणाची पर्याय अर्थात कार्य, भिन्न-भिन्न असल्याने एकाच द्रव्यात राहणाऱ्या एका गुणाची पर्याय, त्याच द्रव्यात राहणाऱ्या अन्य गुणाच्या पर्यायापासून कथंचित पूर्ण स्वतंत्रच आहे; असा निर्णय होतो.

6) श्रद्धागुणाची पर्याय क्षायिक सम्यक्त्वरूप (सिद्ध भगवंताच्या सम्यक्त्वा समान) पूर्ण निर्मल असतांना सुद्धा साधकाच्या ज्ञान व चारित्र गुणाची पर्याय अपूर्ण विकसित असतात. म्हणूनच श्रावक व साधुचे अनेक गुणस्थान होतात; हा विषय आम्हाला अगुरुलघुत्व गुणामुळेच स्पष्ट होतो.

7) व 8) श्रद्धा गुणाची पर्याय चवथ्या गुणस्थानात, ज्ञान गुणाची पर्याय तेराव्या गुणस्थानात आणि चारित्र गुणाची पर्याय सिद्ध अवस्थेमध्ये पूर्ण निर्मल होते; असे पक्के ज्ञान होते.

9) भावलिंगी मुनिराजांच्या भूमिकेयोग्य क्रोधादी कषायरूप परिणमित होत असतांना सुद्धा त्यांचा भावलिंगपणा कायम राहतो व श्रावक पूजनादी शुभ कार्य करतेवेळी किंवा युद्धादी अशुभ कार्य करतेवेळी सुद्धा त्यांचा साधकपणा कायम राहतो; हा विषय लक्षात येतो.

2.विश्वातील प्रत्येक वस्तुचे, वा प्रत्येक पदार्थाचे।
द्रव्य क्षेत्र अन् काल भाव हे, भिन्न असे या जीवाचे।।
याचमुळे प्रत्येक वस्तु अन्, द्रव्य जगात स्वतंत्र असे।
त्याचा दुसऱ्या द्रव्याशी जगि, कधि संबंधचि येत नसे।।
या ज्ञानाने या जीवाचे, विकल्प सारे जात असे।
या जीवाची बुद्धी सुस्थिर, शांत नि निर्मळ होत असे।।

3, 4. शरीर पुद्गल, जीव न होई, जीव देह कधि होत नसे।
एक जीव हा अन्य जीवमय कधी न जगती होत असे।।
पुत्र, पिता कधि जगी न होई, पिता पुत्र कधि होत नसे।
टी. वी. टेप मशीन, दागिणे जीव कधिही होत नसे।।

5.द्रव्याच्या प्रत्येक गुणाची, भिन्न भिन्न पर्याय असे।
याचमुळे प्रत्येक द्रव्य गुण, अन् पर्याय स्वतंत्र असे।।
एक द्रव्य गुण पर्यायाचा, दुसऱ्या गुण पर्यायाशी।
किंचितही संबंध नसे जगि, तत्त्व जाण हे अविनाशी।।

6.याचमुळे क्षायिक सम्यक्त्वी, ज्ञानाने चारित्र्याने।
अपूर्ण असतो परंतु निर्मळ, पूर्ण असे तो श्रद्धेने।।
श्रावक, मुनिच्या जीवनातही, ज्ञानाची चारित्र्याची।
विकसित असुनि अपूर्ण असते, गुण पर्याय साधकाची।।
म्हणुनि साधकाचे जीवन नित, गुणस्थानमय होत असे।
गुण पर्याय स्वतंत्र असे हे, तत्त्व प्रगट जणु होत असे।।

7, 8. चतुर्थ पंचम गुणस्थान हे, साधक जीवाचेच असे।
पुण्यपापमय शुभ अशुभाच्या, उपयोगाने पूर्ण असे।।
परंतु तेथे वीतरागमय, मोक्षमार्ग असतोच सदा।
शुद्ध परिणति हीच असे हे, तत्त्व होतसे स्पष्ट सदा।।

9.अशुद्धोपयोगाचे समयी, भावलिंगि मुनिराजाची।
शुद्ध परिणति नष्ट न होई, महती ही सम्यक्त्वाची।।
सम्यकदर्शन धर्म जिवांचा, जगती एक समान असे।
साधक जीवांचा मंगलमय, मोक्षमार्ग हा एक असे।।
पण सम्यक्चारित्र्य धर्म हा , भिन्न भिन्न राहू शकतो।
या विषयाचा या जीवाला, बोध खरा निश्चित होतो।।

10) द्रव्य अर्थात वस्तु व गुणांचे द्रव्य, क्षेत्र व काल एकच असल्यामुळे द्रव्यामधून गुण विखरून वेग-वेगळे होत नाहीत. ज्याप्रमाणे डब्यात भरलेले गहू डब्यातून विखरून वेग-वेगळे होतात; त्याप्रमाणे जीवद्रव्यातून ज्ञानादी गुण किंवा पुद्गलामधून स्पर्शादी गुण विखरून वेग-वेगळे होत नाहीत.

11) जीव-पुद्गलादी द्रव्यात ज्ञानादी किंवा स्पर्शादी गुण जेवढे व जसे आहेत; ते तेवढेच व तसेच राहतात; कमी-अधिक होत नाहीत किंवा त्यांचा अभाव होत नाही.

# प्रदेशत्व गुण

**प्रश्न** 92 : प्रदेशत्व गुण कशाला म्हणतात ?

**उत्तर** : ज्या शक्तीच्या कारणाने द्रव्याला कोणता ना कोणता आकार अवश्य राहतो, त्या शक्तीला प्रदेशत्व गुण म्हणतात.[1]

**जसे** – जीवाचा शरीरप्रमाण नर-नारकादिरूप आकार अथवा सिद्धरूप आकार.

**प्रश्न** 93 : द्रव्याचा आकार नेहमी एकसमान राहतो की बदलतो ?

**उत्तर** : संसारी जीव व स्कंधरूप पुद्गलांचा आकार बदलतो. सिद्ध जीव, पुद्गल परमाणू, धर्मास्तिकाय, अधर्मास्तिकाय, आकाश व कालद्रव्याचा आकार कधीही बदलत नाही.

**प्रश्न** 94 : प्रदेशत्व गुणाला न मानले तर काय हानी होईल ?

**उत्तर** : प्रदेशत्व गुणाला न मानले तर द्रव्याला आकार न राहिल्यामुळे द्रव्याला निराकार-निराधारपणाचा प्रसंग येईल.

---

1) आलापपद्धती गुणाधिकार सूत्र–9 व गुणव्युत्पत्ति अधिकार सूत्र–100.

10. द्रव्यातिल गुण विखरुन, कधिही वेगवेगळे होत नसे।
जसे डब्यातिल गहू विखरुनी, वेगवेगळे होत असे।।
तसे जिवाचे ज्ञानादिक गुण, विखरुन अलगचि होत नसे।
पुद्गलातले स्पर्शादिक, गुण विखरुन अलगचि होत नसे।।
11. पुद्गल द्रव्याचे स्पर्शादिक, गुण जितके असतात सदा।
अन् या जीवाचे ज्ञानादिक, गुण जितके असतात सदा।।
संख्येने ते निश्चित तितके, गुण जगती असतात सदा।
स्वरूप त्यांचे जसेच असते, तसे राहते नित्य सदा।।
हीनाधिक ते गुण न होतसे, या ज्ञानाने जीवाचा।
जिनवचनावर वाढत जातो, नित विश्वासचि हृदयाचा।।

# प्रदेशत्व गुण

**92. प्रदेशत्व गुण कुणा म्हणावे ? सांगा मजला गुरुराया !**
**विशेषता अन् महत्त्व त्याचे, सांगा मजला गुरुराया !!**
ज्या शक्तीच्या योगाने नित, द्रव्याचा आकार असे।
कसा कोणताही नित जगती, द्रव्याला आकार असे।।
त्या शक्तीला प्रदेशत्व गुण, ज्ञानी जगती म्हणतात।
त्या शक्तीने षट् द्रव्ये ही, नित साकारचि बनतात।।
जसे जीवाचा देहासम अन्, नारकमय आकार असे।
लहान मोठे भिन्न भिन्न अन्, सिद्धरूप आकार असे।।

**93. द्रव्याचा आकार बदलतो, अथवा कधि बदलत नाही।**
**एकसारखा असतो किंवा, एकसमान असत नाही।।**
स्कंधरूप पुद्गल द्रव्याचा, अन् संसारी जीवाचा।
जगी सदा आकार बदलतो, बदलत नाही सिद्धाचा।।
धर्म अधर्म काल द्रव्यांचा, अन् पुद्गल परमाणूंचा।
कधी न जगि आकार बदलतो, आणि द्रव्य आकाशाचा।।

**94. प्रदेशत्व गुण नाहि मानला, हानि कोणती होईल ?**
निराकार अन् निराधार हे, द्रव्य निरंतर होईल ।।
याचमुळे पुद्गल स्कंधाचा, अन् संसारी जीवांचा।
अभाव होईल सदा सर्वदा, जगति सर्व ही द्रव्यांचा।।

**प्रश्न 95 : प्रदेशत्व गुणाला जाणल्यामुळे काय फायदे होतात ?**

**उत्तर** : प्रदेशत्व गुणाला जाणल्यामुळे पुढीलप्रमाणे अनेक फायदे होतात –

1) जीवाच्या लहान-मोठ्या आकाराशी सुख दुःखाचा काही संबंध नाही; असा निर्णय होतो. **जसे** – भरत व बाहुबली सिद्ध भगवान.

2) प्रत्येक द्रव्याला आकार त्याच्या प्रदेशत्व गुणामुळे असतो; म्हणून आम्ही कोणत्याही द्रव्याला आकार देऊ शकतो अशा प्रकारची मिथ्या मान्यता निघून जाते.

3) अरूपी द्रव्याचा आकार देखील भिन्न-भिन्न असल्यामुळे त्याच्या भिन्नतेचा निर्णय होतो. **जसे** – धर्मास्तिकाय, अधर्मास्तिकाय तसेच अनंत सिद्ध भगवंतांचा आकार.

4) संसार अवस्थेमध्ये जीव शरीराकार असून देखील जीवाचा आकार त्याच्या प्रदेशत्व गुणामुळे आहे; शरीराच्या कारणामुळे नाही; असे समजून येते.

# चार अभाव

**प्रश्न** 96 : अभाव कशाला म्हणतात ?

**उत्तर** : एका पदार्थाचे दुसऱ्या पदार्थामध्ये नास्तित्व असते; त्याला अभाव म्हणतात.

**प्रश्न** 97 : अभावाचे किती भेद आहेत ?

**उत्तर** : अभावाचे चार भेद आहेत – 1) प्रागभाव 2) प्रध्वंसाभाव 3) अन्योन्याभाव व 4) अत्यंताभाव.

**प्रश्न** 98 : प्रागभाव (प्राक्+अभाव) कशाला म्हणतात ?

**उत्तर** : एका द्रव्याच्या वर्तमानकालीन पर्यायाचा त्याच द्रव्याच्या पूर्व पर्यायामध्ये अभाव असतो; त्याला प्रागभाव म्हणतात. प्राक् = पूर्व, **जसे** – घट पर्यायाचा पूर्व पर्यायामध्ये (पिंड अथवा मातीमध्ये) अभाव आहे. दह्याचा दुधामध्ये अभाव आहे. केवलज्ञानाचा/पूर्ण ज्ञानाचा अल्पज्ञानामध्ये/मति-श्रुत ज्ञानामध्ये अभाव आहे.

**95. प्रदेशत्व गुण जाणुनि घेता, काय फायदे होतात?**
प्रदेशत्व गुण जाणुनि घेता, बहुत फायदे होतात ।।
1. या जीवाच्या लहान मोठ्या, आकाराशी दुःखाचा।
किंचितहि संबंध नसे हो, सुखमय विविध विचारांचा।।
जसे भरत अन् बाहुबली अन्, सिद्ध प्रभुला जाणावे।
निर्णय होतो असा कि अपुल्या, आकुलतेला सोडावे।।
2. प्रदेशत्व गुण योगाने नित, द्रव्याला आकार असे।
मी त्याला साकार बनवितो, हा मिथ्या भ्रम जात असे।।
3. जगि अरूपी या द्रव्यांचा, भिन्न भिन्न आकार असे।
द्रव्यांच्या भिन्नत्वाचा मग, निर्णय जीवा होत असे।।
या धर्माधर्मास्तिकाय नित, द्रव्यांचा आकार जसा।
अनंत सिद्धांचा या जगती, नित्य असे आकार जसा।।
4. संसारातिल जीवात्मा हा, शरिराकार सदा असतो।
परंतु शरिरामुळे जिवाचा, हा आकार कधी नसतो।।
प्रदेशत्व गुण योगाने हा, जीव सदा साकार दिसे।
जिनवाणीचे खरे ज्ञान हे, जीवाला मग होत असे।।

# चार अभाव

**96. अभाव गुरुजी कुणा म्हणावे, त्याची व्याख्या काय असे?**
एक द्रव्य दुसऱ्या द्रव्यातच, नसते हाच अभाव असे।।

**97. भेद अभावांचे मज, सांगा किती कोणते आहेत?**
प्रागभाव प्रध्वंसाभावचि, अन् अन्योन्याभाव असे।
अन् अत्यंताभाव मिळुनि हे, चार भेद शास्त्रात असे।।

**98. प्रागभाव म्हणतात कशाला? हे गुरुजी! मजला सांगा।**
**व्याख्या त्याची महत्त्व त्याचे, श्री गुरुजी! मजला सांगा।।**
निश्चितही एका द्रव्याचा, वर्तमान पर्याय सदा।
त्या द्रव्याच्या पूर्व दशेतच, कधी न असतो जाण सदा।।
प्रागभाव यालाच म्हणावे, तत्त्व हेच जाणुनि घ्यावे।
जसे दह्याचा दुधामधे नित, अभाव असतो जाणावे।।
आणि जसे केवलज्ञानाचा, मति श्रुतज्ञानामधे सदा।
अभाव असतो नित्य निरंतर, तत्त्व खरे हे जाण सदा।।

**प्रश्न 99 :** प्रागभाव नाही मानला तर काय हानी होईल ?

**उत्तर :** प्रागभाव नाही मानला तर कोणत्याही द्रव्याची वर्तमानकालीन पर्याय अनादी सिद्ध होईल.

**प्रश्न 100 : प्रागभाव जाणल्यामुळे काय फायदे होतात ?**

**उत्तर :** 1) मी अनादी काळापासून मिथ्यात्वादिरूप विपरित परिणमन करीत आलो आहे; तरी सुद्धा वर्तमानकाळी मिथ्यात्वादी दु:खद अवस्थेचा नाश करून खरोखर सुखी व धार्मिक होऊ शकतो; असे समजून येते. म्हणून निराशा टळते.

2) जीवादी सहाही द्रव्यांची इष्टानिष्ट वाटणारी प्राचीन अवस्था बदलणे स्वाभाविक आहे; असे जाणल्यामुळे राग-द्वेषांचा परिहार होतो.

**प्रश्न 101 :** प्रध्वंसाभाव (प्रध्वंस+अभाव) कशाला म्हणतात ?

**उत्तर :** एका द्रव्याच्या वर्तमानकालीन पर्यायाचा त्याच द्रव्याच्या पुढे होणाऱ्या पर्यायामध्ये अभाव असतो; त्याला प्रध्वंसाभाव म्हणतात.

जसे -- घट पर्यायाचा खापरीमध्ये अभाव, दह्याचा लोण्यामध्ये अभाव, मतिज्ञानाचा केवलज्ञानामध्ये अभाव.

*कार्य-द्रव्यमनादि स्यात्प्रागभावस्य निह्नवे।*
*प्रध्वंसस्य च धर्मस्य प्रच्यवेऽनन्ततां व्रजेत्।।*

*जर प्राग्-अभावाचा लोप मानला तर कार्यरूप द्रव्य अनादी मानावे लागेल. जर प्रध्वंसाभावाचा लोप मानला तर ते कार्यरूप द्रव्य अनंत-अविनाशी मानावे लागेल.*

— आप्तमीमांसा, प्रथम परिच्छेद, कारिका-10

**99. प्रागभाव जर नाही मानला, हानि कोणती होईल ?**

प्रागभाव जर नाही मानला तत्त्वदोष मग येईल।।
या प्रत्येक जगी द्रव्याचा, वर्तमान पर्याय सदा।
अनादि सिद्धचि होइल निश्चित, तत्त्वहानि होईल सदा।।
दुधापासुनि दही जहाले, असे मानता येइल ना।
नित अल्पज्ञ दशेतुन, जगती केवलज्ञानी होतिल ना।।
दही आणि अल्पज्ञ दशा ही, सदा वस्तुची राहील।
हे तर वस्तु स्वभाव विपरित, मान्य कधी ना होईल।।

**100. प्रागभाव हा जाणुनि घेता, काय फायदे होतात ?**

प्रागभाव हा जाणुनि घेता, फार फायदे होतात।।

1. अनादिकाळापासुनि माझी, दुःखरूप मिथ्यात्त्व दशा।
पुरुषार्थाने बदलत असते, पुण्य दशा अन् पाप दशा।।
मी सम्यक्त्वी श्रावक साधू, आणि मुक्त होऊ शकतो।
घोर निराशा जाउनि मग हा, दृढ विश्वास मनी येतो।।

2. जीवादिक या षट् द्रव्यांची, इष्टानिष्ट विचित्र दशा।
बदलत असते नित्य निरंतर, शुभाशुभाची पूर्व दशा।।
या ज्ञानाने या जीवाचा, राग-द्वेष निघुनि जातो।
निज आत्म्याच्या ज्ञानस्वभावी, श्रद्धेने तो स्थिर होतो।।

**101. प्रध्वंसाभावाची व्याख्या, सांगा मजला गुरुराया !**
**अर्थ तयाचा महत्त्व त्याचे, सांगा मजला गुरुराया !!**

या जगती एका द्रव्याची, वर्तमान पर्याय सदा।
त्या द्रव्याच्या भविष्यकालिन, पर्यायात नसेच्र सदा।।
जसे दह्याचा लोण्यामध्ये, जाणा नित्य अभाव असे।
जसे घटाचा खापरिमध्ये, जाणा नित्य अभाव असे।।
अन् जीवाच्या मतिज्ञानाचा, केवलज्ञानामधे सदा।
अभाव असतो तत्त्व खरे हे, जिनवाणी सांगते सदा।।

**प्रश्न** 102 : प्रध्वंसाभ्गव नाही मानला तर काय हानी होईल ?

**उत्तर** : प्रध्वंसाभाव नाही मानला तर वर्तमानकाळी दिसणारे कार्य अनंत काळापर्यंत जसेच्या तसेच राहील.

**जसे** – घट कधी फुटणार नाही, खापरी होणारच नाही. दही दहीच राहील, लोणी कधी होणारच नाही. मनुष्य मनुष्यच राहील, देवादी अन्य पर्यायरूप वा मोक्षरूप होणारच नाही; अधार्मिक मनुष्य कधी धार्मिक होणारच नाही. (पण अशी वस्तुस्थिती नाही. वर्तमान अवस्था/कार्य बदलून भविष्यामध्ये नवीन अवस्था होणारच; हे स्पष्ट रीतीने सर्वांच्या लक्षात येते.)

**प्रश्न** 103 : **प्रध्वंसाभावाला जाणल्यामुळे काय फायदे होतात ?**

**उत्तर** : 1) कोणी जीव वर्तमानकाळी धार्मिक नसला तरी भविष्यामध्ये तो जीव धार्मिक होऊ शकतो. वर्तमाकालीन अधार्मिक अवस्थेचा नाश करण्याची अपूर्व शक्ती आपल्यात आहे; असा पुरुषार्थमूलक विचार बलवान होतो.

2) मी फार पापी आहे, माझा उद्धार होणे अशक्य आहे; अशाप्रकारच्या न्यूनगंड विचाराचा (हीन भावनेचा) नाश होतो.

*अभावैकान्त-पक्षेऽपि भावाऽपन्हव-वादिनाम् ।*
*बोध-वाक्यं प्रमाणं न केन साधन-दूषणम् ।।*

*भावाचा (अस्तित्वाचा) सर्वथा अभाव मानणाऱ्या अभाव-एकांतवादींच्या ज्ञान व वचनांच्या (आगम) प्रामाणिकतेच्या अभावी, ते स्वमताची स्थापना व परमताचे खंडन कशाप्रकारे करतील ? म्हणून अभाव-एकांत सुद्धा ठीक नाही.*

– आप्तमीमांसा, प्रथम परिच्छेद, कारिका-12

102. प्रध्वंसाभावास न मानले, हानि कोणती होईल ?
वर्तमानकालीन अवस्था, नित्य निरंतर राहील।।
पर्यायाचे परिवर्तन मग, कधी न जगती होईल।
अनंत काळापर्यंतचि मग, एक दशा नित राहील।।
जसे दही नित दहीच राहील, लोणी कधी न होणार।
आणि घटाचा खापरिमध्ये, बदल कधी नच होणार।।
मनुष्य केवळ मनुष्य राहील, देव पशू ना होणार।
अन् नरकात कधी नच जाइल, मुक्त कधी ना होणार।।
या जगती मग जीव अधार्मिक, धार्मिक कधी न होईल।
मिथ्यात्त्वी, मिथ्यात्त्वी राहिल, सम्यक्त्वी नच होईल।।
वस्तुस्वभावाच्या विपरित हे, कार्य असे या जगतात।
जिनवाणीला मान्य नसे हे, ठेवा अपुल्या ध्यानात।।
वर्तमान पर्याय बदलुनी, नव पर्याय भविष्यात।
नित्य येतसे तत्त्व खरे हे, प्रसिद्ध आहे लोकात।।
येणे जाणे स्वभाव आहे, द्रव्याच्या पर्यायांचा।
जगणे मरणे स्वभाव आहे, द्रव्याच्या पर्यायाचा।।
या ज्ञानाने पर्यायाची, मूढ बुद्धि विलया जाते।
वस्तुस्वभावाचे जीवाला, ज्ञान खरे निश्चित होते।।

103. प्रध्वंसाभावास जाणता काय फायदे होतात ?
प्रध्वंसाभावास जाणता फार फायदे होतात।।

1. वर्तमान पर्याय अधार्मिक, जीवाची बदलू शकते।
भविष्यकाळी दशा तयाची, मग धार्मिक होऊ शकते।।
याचमुळे जीवाला कळते, वस्तुस्वरूपाची महती।
निज आत्म्याच्या पुरुषार्थाची, अपूर्व अन् अनुपम शक्ती।।

2. मी पापी आहे जगती हा, हीन भाव निघुनी जातो।
मी माझा उद्धारक आहे, मंगल भाव मनी येतो।।

**प्रश्न** 104 : अन्योन्याभाव कशाला म्हणतात ?

**उत्तर** : एका पुद्‌गलद्रव्याच्या वर्तमाकालीन स्कंधरूप पर्यायाचा दुसऱ्या पुद्‌गलद्रव्याच्या वर्तमाकालीन स्कंधरूप पर्यायामध्ये अभाव असतो; त्याला अन्योन्याभाव म्हणतात.

**जसे** – घटाचा पटामध्ये अभाव. एका दगडाचा दुसऱ्या दगडामध्ये अभाव. एका फळाचा (केळी इत्यादीचा) दुसऱ्या फळामध्ये अभाव.

**प्रश्न** 105 : अन्योन्याभावाला नाही मानले तर काय हानी होईल ?

**उत्तर** : अन्योन्याभावाला नाही मानले तर वर्तमानकाळामध्ये प्रत्यक्षात भिन्न-भिन्न दिसणारे घट, पट, पुस्तक, पेन, शरीर इत्यादी स्कंधरूप पर्याय भिन्न-भिन्न न राहता सर्व एकच स्कंध वा द्रव्य होऊन जातील. (स्कंधरूप अनेक भिन्न-भिन्न पर्यायी प्रत्यक्ष आमच्या अनुभवात येतात, म्हणजे अन्योन्याभावाचे भिन्न-भिन्न कार्य लक्षात येते; ते न मानणे म्हणजे सत्य परिस्थितीचा विरोध केल्यासारखे होईल.)

**प्रश्न 106 : अन्योन्याभावाला जाणल्यामुळे काय फायदे होतात ?**

**उत्तर** : 1) अन्योन्याभावाला जाणल्यामुळे एक स्कंधरूप पर्याय दुसऱ्या स्कंधरूप पर्यायाचे काहीही करू शकत नाही; हे स्पष्ट समजून येते. कारण एका स्कंधाचा दुसऱ्या स्कंधामध्ये अभाव आहे.

**जसे** – स्त्री भाकरी करू शकत नाही; कारण स्त्री व भाकरीमध्ये तर अत्यंताभाव आहे. पोळपाट, लाटणे, चूल, चिमटा इत्यादी पुद्‌गलाने देखील भाकर केली जात नाही; कारण पोळपाटादीचा भाकरीमध्ये अन्योन्याभाव आहे.

*जर भाव आणि अभाव दोहोंचे एकात्म्य (उभय एकांत) मानले तर स्याद्वाद-विद्वेषींच्या मतामध्ये हे एकात्म्य होऊ शकत नाही; कारण त्यामुळे विरोध दोष उत्पन्न होतो. (भावैकांत अभावैकांताचा आणि अभावैकांत भावैकांताचा सर्वथा विरोधी असल्याने दोहोंमध्ये एकात्मता घटित होऊ शकत नाही.)*

**– आप्तमीमांसा, प्रथम परिच्छेद, कारिका-13**

**104. अन्योन्याभावाची व्याख्या, सांगा मजला गुरुदेवा !**
**अर्थ तयाचा महत्त्व त्याचे, सांगा मजला गुरुदेवा !!**

वर्तमानकालीन सदा ही, एका पुद्गल द्रव्याचा।
स्कंधरूप या पर्यायाचा, दुसऱ्या पुद्गल द्रव्याचा।।
वर्तमानकाळातील नित ही, स्कंधरूप पर्यायात।
अभाव असतो तत्त्व खरे हे, ठेवा अपुल्या ध्यानात।।
अन्योन्याभावाची व्याख्या, हीच असे हे जाणुनि घ्या।
वस्तुस्वरूपाचे हे दर्शन, हे जीवांनो ! समजुनि घ्या।।
जसे घटाचा पटामधे नित, अभाव असतो जाणुनि घ्या।
एका दगडाचा दुसऱ्यातच, अभाव असतो जाणुनि घ्या।।

**105. अन्योन्याभावा न मानले, हानि कोणती होईल ?**

अन्योन्याभावा न मानले, हानी अनेक होतील।।
घटपट पुस्तक शरीर पंखा, स्कंधरूप हे पर्याय।
भिन्न भिन्न प्रत्यक्ष दिसतसे, एकच होतिल पर्याय।।
भिन्न भिन्न जगती न राहता, स्कंधरूप हे पर्याय।
एक स्कंध वा एक द्रव्य हे, मिळुनि होतिल पर्याय।।
अन्योन्याभावा न मानणे, सत्याचाच निषेध असे।
वस्तुस्थितीचा जिनवचनाचा, प्रत्याक्षात विरोध असे।।

**106. अन्योन्याभावास जाणता, काय फायदे होतात ?**

अन्योन्याभावास जाणता, फार फायदे होतात।।
1.पुद्गल स्कंध एक या जगती, दुसऱ्या पुद्गल स्कंधाचे।
कधिही काही करू न शकतो, दुसऱ्याही पर्यायाचे।।
कारण एका स्कंधाचा नित, दुसऱ्या पुद्गल स्कंधात।
अभाव असतो तत्त्व खरे हे, ठेवा अपुल्या ध्यानात।।
जसे कुणी स्त्री करू न शकते, भाकर कधीहि जगतात।
कारण स्त्रीचा अभाव दिसतो, भाकरीत प्रत्यक्षात।।
पोळपाट लाटणे चूल अन्, चिमटादिक या स्कंधाने।
भाकर केली नाही कळते, दुसऱ्या पुद्गल स्कंधाने।।

2) जेथे एक पुद्‌गल, दुसऱ्या पुद्‌गलाचे काही करू शकत नाही; तेथे पुद्‌गल, जीवाचे बरे-वाइट करू शकते; कर्म जीवाला दुःख देते, शेजारी मला त्रास देतो, शरीर रोगमय आहे म्हणून मला त्रास होतो; इत्यादी प्रकारची मिथ्याभ्रांती निघून जाते व सहजच समाधान प्राप्त होते.

**प्रश्न** 107 : अत्यंताभाव कशाला म्हणतात ?

**उत्तर** : एका द्रव्याचा दुसऱ्या द्रव्यामध्ये अभाव असतो; त्याला अत्यंताभाव म्हणतात.

**जसे** — एका जीवाचा दुसऱ्या जीवादी सर्व द्रव्यामध्ये अभाव. एका पुद्‌गलाचा दुसऱ्या अनंत पुद्‌गल व इतर पाच द्रव्यामध्ये अभाव.

**प्रश्न** 108 : अत्यंताभावाला नाही मानले तर काय हानी होईल ?

**उत्तर** : अत्यंताभावाला नाही मानले तर प्रत्येक द्रव्य स्वतंत्र न राहता जीवादी सर्व द्रव्ये एकरूप होतील. अर्थात एकच द्रव्य होतील. प्रत्यक्षात वस्तुस्थिती तशी नाही. जीवादी सर्व द्रव्य भिन्न-भिन्न असल्याचा प्रत्यक्ष अनुभव येतो.

**प्रश्न** 109 : **अत्यंताभावाला जाणल्यामुळे काय फायदा होतो ?**

**उत्तर** : अत्यंताभावाला जाणल्यामुळे या विश्वात असणारी अनंतानंत सर्व द्रव्ये एकमेकापासून भिन्नच आहेत; असा स्पष्ट बोध होतो. म्हणून कोणतेही द्रव्य दुसऱ्या द्रव्यांचे वा त्यांच्या पर्यायांचे बरे-वाईट काहीच करू शकत नाही; अशा मोक्षदायक भेदज्ञानाची प्राप्ती होते.

*हे भगवन् ! आपल्या शासनामध्ये ते वस्तुतत्त्व कथंचित् सत्‌रूपच आहे, कथंचित् असत्‌रूपच आहे, कथंचित् उभयरूपच आहे, कथंचित् अवक्तव्यरूपच आहे, कथंचित् सत् व अवक्तव्यरूपच आहे; कथंचित् असत् व अवक्तव्यरूपच आहे, कथंचित् सदसत् व अवक्तव्यरूपच आहे; आणि हे सर्व अपेक्षांसहित आहेत, सर्वथा नाहीत.*

**— आप्तमीमांसा, प्रथम परिच्छेद, कारिका-14**

2.जे पुद्‌गल कधि करू न शकते, अन्य पुद्‌गलाचे काही।
ते करू शकते बरे नि वाईट, या जीवाचे मग काही।।
कर्म जिवाला दुःख देतसे, रोगग्रस्त हा देह असे।
शत्रू मजला त्रस्त करितसे, मित्र मला सुख देत असे।।
मिथ्या भ्रम हा विलया जातो, खरे ज्ञान जीवा होते।
पराश्रयाची बुद्धी जाते, समाधान सहजचि मिळते।।

107. **अत्यंताभावाची व्याख्या, सांगा मजला गुरुराया !**
**अर्थ तयाचा महत्त्व त्याचे, सांगा मजला गुरुराया !**
एका द्रव्याचा नित दुसऱ्या, अभाव द्रव्यामधे असे।
एका अणुचा नित ही दुसऱ्या, परमाणूत अभाव असे।।
अत्यंताभावाची आहे, अशीच व्याख्या जाणुनि घ्या।
अर्थ तयाचा जाणुनि घ्यावा, महत्त्व त्याचे जाणुनि घ्या।।
जसे जिवाचा अन्य सहाही, अभाव द्रव्यामधे असे।
पुद्‌गलादि द्रव्यांचा दुसऱ्या, अभाव द्रव्यामधे असे।।

108. **अत्यंताभावास न मानले, हानि कोणती होईल ?**
हे प्रत्येक द्रव्य या जगती, स्वतंत्र कधि ना राहील।।
जीवादिक ही सहाही द्रव्ये, एकरूप मग होतील।
नाव तयांचे ओळख त्यांची, कधी न काही राहील।।
जीवादिक ही सहाही द्रव्ये, भिन्न भिन्न ना राहील।
परस्परातच मिळुनि त्यांचे, एक द्रव्य मग होईल।।
परंतु हे तर वस्तुस्थितीच्या, विपरीत प्रत्यक्षात दिसे।
सहाहि द्रव्ये वेग वेगळी, असती अनुभव हाच असे।।

109. **अत्यंताभावास जाणता, काय फायदे होतात ?**
अत्यंताभावास जाणता, फार फायदे होतात।।
विश्वातिल ही अनंत द्रव्ये, भिन्न भिन्न नित असतात।
परस्परापासून वेगळी, नित्य निरंतर राहतात।।
एक द्रव्य दुसऱ्या द्रव्यांचे, अन् त्यांच्या पर्यायांचे।
बरे न वाईट करू न शकते, स्वरूप आहे वस्तूचे।।
या बोधाने या जीवाला, दृष्टी खरी सहज येते।
भव नाशाचे शिवसुखदायक, भेदज्ञान त्याला होते।।

**प्रश्न** 110 : चार अभावापैकी द्रव्यसूचक अभाव किती व कोणते आहेत ?

**उत्तर** : चार अभावापैकी केवळ एक अत्यंताभावच द्रव्यसूचक अभाव आहे; म्हणून अत्यंताभाव सहाही द्रव्यामध्ये लागू होतो; कोणत्याही द्रव्याच्या पर्यायामध्ये लागू होत नाही.

शेष तीन अभाव पर्यायसूचक अभाव आहेत; म्हणून हे अभाव सहाही द्रव्यांच्या आपआपल्या पर्यायामध्ये लागू होतात; कोणत्याही द्रव्यामध्ये लागू होत नाहीत.

**प्रश्न** 111 : चारही अभाव कोणत्या द्रव्यात लागू होतात ?

**उत्तर** : चारही अभाव केवळ पुद्‌गलामध्ये (पुद्‌गल द्रव्यामध्ये व पुद्‌गलाच्या पर्यायामध्ये) लागू होतात.

**प्रश्न** 112 : प्रागभाव व प्रध्वंसाभाव कोठे लागू होतात ?

**उत्तर** : प्रागभाव व प्रध्वंसाभाव सहाही द्रव्यांच्या केवळ आपआपल्या पूर्वोत्तर पर्यायामध्ये लागू होतात; सहाही द्रव्यामध्ये लागू होत नाहीत.

**प्रश्न** 113 : अन्योन्याभाव कोठे लागू होतो ?

**उत्तर** : अन्योन्याभाव केवळ पुद्‌गलद्रव्यांच्या वर्तमानकालीन स्कंधरूप दोन पर्यायामध्ये लागू होतो, इतर कोणत्याही द्रव्यामध्ये लागू होत नाही.

**प्रश्न** 114 : जीव, धर्म, अधर्म, आकाश व काल ही पाच द्रव्ये व या पाचही द्रव्यांच्या पर्यायामध्ये आणि पुद्‌गल द्रव्यामध्ये कोणता अभाव लागू होत नाही ?

**उत्तर** : जीवादी सहाही द्रव्यामध्ये, पुद्‌गल सोडून अन्य पाच द्रव्यांच्या पर्याया मध्ये अन्योन्याभाव लागू होत नाही; कारण अन्योन्याभाव केवळ पुद्‌गल द्रव्याच्या वर्तमानकालीन स्कंधरूप पर्यायामध्येच लागू होतो.

**110. द्रव्य अपेक्षा अभाव सांगा, किती कोणते आहेत ?**
**अन् सूचक या पर्यायाचे, किती कोणते आहेत ?**
चार अभावापैकी केवळ, अत्यंताभावच एक।
द्रव्याचा सूचक हा आहे, जाण अभाव सदा एक।।
म्हणुनि हा अत्यंताभावच, एक सहाही द्रव्यात।
लागू होतो, होत नसे पण, सर्व द्रव्य पर्यायात।।
शेष तीनही अभाव जाणा, सूचक हे पर्यायांचे।
परंतु हे तर सूचक नाही, सदा सहाही द्रव्यांचे।।
म्हणुनी तीन अभाव असे, हे सर्व द्रव्य पर्यायात।
नित्य होतसे परंतु हे तर, होत नसे या द्रव्यात।।

**111. सदा कोणत्या द्रव्यामध्ये, अभाव चारही होतात ?**
पुद्गलात अन् त्याच्या सर्वही पर्यायातच होतात।।

**112. प्रागभाव प्रध्वंसाभावच, कसे व कोठे होतात ?**
**हे गुरुवर ! सांगा मजला हे, कुठे कधी ना होतात।।**
षट् द्रव्यांच्या आपआपल्या, पूर्वोत्तर पर्यायात।
अभाव हे होतात निरंतर, होत नसे षट् द्रव्यात।।

**113. हा अन्योन्याभाव कुठे हे, लागू होतो सांगावे।**
**द्रव्य कोणत्या पर्यायातच, लागू होतो सांगावे।।**
केवळ या पुद्गल द्रव्याच्या, वर्तमानकालीन सदा।
स्कंधरूप द्वय पर्यायातच, लागू होतो जाण सदा।।
अन्य कोणत्या द्रव्यामध्ये, होत नसे हो जाणावे।
आणि अन्य पर्यायामध्ये, होत नसे हे जाणावे।।

**114. जीव धर्म अन् अधर्म नभ, अन् काल पाच या द्रव्यात।**
**अभाव होत नसेच कोणता, यांच्याही पर्यायात ?**
**अन् पुद्गल या द्रव्यामध्ये, गुरुजी ! मजला सांगावे।**
**लागू होत नसेच कोणता, अभाव मजला सांगावे।।**
पुद्गल सोडुनि अन्य पाचही, द्रंव्यांच्या पर्यायात।
हा अन्योन्याभाव न होतो, जीवादिक षट् द्रव्यात।।
पण केवळ पुद्गल द्रव्याच्या, वर्तमानकालीन सदा।
स्कंधरूप पर्यायामध्ये, हाच होतसे जाण सदा।।

**प्रश्न** 115 : अन्योन्याभाव केवळ पुद्गल द्रव्याच्या वर्तमानकालीन स्कंधरूप दोन पर्यायामध्येच का लागू होतो ?

**उत्तर** : कारण एका पुद्गल द्रव्याच्या वर्तमाकालीन स्कंधरूप पर्यायामध्ये राहणारे एक वा अनेक परमाणू त्या स्कंधरूप पर्यायामधून निघून दुसऱ्या पुद्गलाच्या वर्तमानकालीन स्कंधरूप पर्यायामध्ये प्रवेश करू शकतात. अशाप्रकारे स्कंधरूप पर्याय केवळ पुद्गल द्रव्यामध्येच घडू शकते. जीव अथवा कालाणू द्रव्यामध्ये स्कंधरूप पर्याय (अनेक द्रव्यांची बंधरूप अवस्था) होणे संभवत नाही. (धर्म, अधर्म, व आकाश ही तिन्ही द्रव्ये एक-एकच असल्यामुळे यांचा स्कंध बनण्याचा प्रश्नच उत्पन्न होत नाही.)

**जसे** -- लोखंडाच्या गोळ्यामध्ये असणारे परमाणू लोखंडातून निघून चांदीच्या गोळ्यामध्ये प्रवेश करू शकतात. खानीतील अशुद्ध सोने शुद्ध करणे, आरोग्याला बाधक अशुद्ध पाणी आरोग्याला साधक शुद्ध करणे, हे सर्व कार्य अन्योन्याभावरूप योग्यतेमुळेच शक्य आहे.

**प्रश्न** 116 : चार अभावाच्या या विषयाला आचार्य रचित प्राचीन शास्त्राचा आधार आहे काय ?

**उत्तर** : हा आहे. आचार्यश्री समंतभद्र महाराज (सुमारे 1800 वर्षापूर्वीचे रत्नकरंड श्रावकाचाराचे रचियता) रचित आप्तमीमांसा/देवागम स्तोत्र नावाच्या ग्रंथातील श्लोक क्रमांक 9, 10 व 11 च्या आधारेच अभावाचे हे सर्व विवेचन केले आहे. तसेच आचार्यश्री भट्टाकलंकदेव रचित अष्टशती, आचार्यश्री विद्यानंदी महाराज रचित अष्टसहस्त्रीमध्ये याचे विस्तृत वर्णन आपण पाहू शकता.

# सात तत्त्व

**प्रश्न** 117 : तत्त्व कशाला म्हणतात ?

**उत्तर** : वस्तूच्या भावाला म्हणजे वस्तूच्या स्वरूपाला तत्त्व म्हणतात.[1]

**प्रश्न** 118 : प्रयोजनभूत तत्त्व कशाला म्हणतात ?

**उत्तर** : ज्याची खरी श्रद्धा व यथार्थ ज्ञान झाल्यामुळे आमच्या सुखरूपी प्रयोजनाची/उद्देशाची सिद्धी होते; त्यांना प्रयोजनभूत तत्त्व म्हणतात.

---

1) सर्वार्थसिद्धी अध्याय–1 सूत्र–2 ची टीका.

**115. केवळ या पुद्गल द्रव्याच्या, वर्तमान द्वय स्कंधात।**
**कां होतो अन्योन्याभावच, स्कंधरूप पर्यायात।।**
या एका पुद्गल द्रव्याच्या, वर्तमान स्कंधात अणू।
दुसऱ्या वर्तमान स्कंधातुन, जात असे हे परमाणू।।
कारण स्कंधरूप पर्यायहि, पुद्गल द्रव्यातच घडते।
जीव नि कालाणू द्रव्यातच, स्कंध अवस्था ना घडते।।
धर्म अधर्म आणि नभ द्रव्ये, एक एक जगती असती।
कारण या तिन्ही द्रव्यांच्या, स्कंध अवस्था ना बनती।।
जसे सुवर्णाच्या स्कंधातुन, चांदीच्या स्कंधामध्ये।
प्रवेश करू शकतात अणू हे, दुसऱ्या पर्यायामध्ये।।
अन् खाणीतील अशुद्ध सोने, विशुद्ध करण्याचे कार्य।
अन्योन्याभावाने होते, जल मल शुद्धीचे कार्य।।

**116. चार अभावांच्या विषयाला, काय असे हो आधार ?**
**श्री आचार्य आणि ग्रंथाचा, सांगा मजला आधार।।**
श्री आचार्य समंतभद्र अन्, भट्टाकलंक आचार्य।
हे आधार असे जाणा, अन् विद्यानंदी आचार्य।।
देवागम हा स्तोत्र ग्रंथ अन्, अष्टशती उत्तम ग्रंथ।
हे आधार असे जाणा, अन् अष्टसहस्त्री हा ग्रंथ।।
अभाव विषयाचे प्रामाणिक, विस्तृत वर्णन यात असे।
आचार्यांच्या या ग्रंथातुन, यथार्थ दर्शन होत असे।।

# सात तत्त्व

**117. हे गुरुराया ! सांगा मजला, तत्त्व कशाला म्हणतात ?**
वस्तूच्या भावाला ज्ञानी, तत्त्व असेची म्हणतात।।

**118. तत्त्व प्रयोजनभूत, कशाला म्हणती ते मज सांगावे ?**
**कुणा म्हणावे आणि कोणते, आहे मजला सांगावे।।**
ज्याच्या श्रद्धा अन् ज्ञानाने, जीवाला सुख मिळत असे।
तेच प्रयोजनभूत खरोखर, जाणुनि घ्यावे तत्त्व असे।।

**प्रश्न** 119 : प्रयोजनभूत तत्त्व किती व कोणती आहेत ?

**उत्तर** : प्रयोजनभूत तत्त्वे सात आहेत – जीव, अजीव, आस्रव, बंध, संवर, निर्जरा व मोक्ष.[1]

**प्रश्न** 120 : जीवतत्त्व कशाला म्हणतात ?

**उत्तर** : ज्ञान-दर्शनस्वभावी अर्थात ज्ञानानंदस्वभावी आत्म्यालाच जीवतत्त्व म्हणतात.[2]

**प्रश्न** 121 : जीवतत्त्व व जीवद्रव्यामध्ये काय अंतर आहे ?

**उत्तर** : समस्त विकारी-अविकारी अशा भावांनी/परिणामांनी रहित ज्ञानानंदस्वभावी त्रिकाली ध्रुव आत्माच जीवतत्त्व आहे. जीवद्रव्यामध्ये संपूर्ण विकारी-अविकारी पर्याय गर्भित आहेत.

जीवतत्त्वामध्ये केवळ भावांची (गुणांची) मुख्यता आहे. **जसे** – अनादी-अनंत चैतन्यभावच (ज्ञायक भावच) जीवतत्त्व आहे.

जीवद्रव्यामध्ये जीवांचा द्रव्य, क्षेत्र, काल, भाव (गुण पर्यायादी) सर्व गर्भित आहेत. **जसे** – संसारी व सिद्ध हे जीवद्रव्याचे दोन भेद आहेत.

**प्रश्न** 122 : अजीवतत्त्व कशाला म्हणतात ?

**उत्तर** : ज्ञान-दर्शनस्वभावी/ज्ञानानंदस्वभावी आत्म्याला सोडून समस्त पदार्थांना अजीवतत्त्व म्हणतात. पुद्‌गल, धर्म, अधर्म, आकाश व काल ही सर्व द्रव्ये अजीवतत्त्व आहेत.

---

1) पंचास्तिकाय गाथा–108 च्या दोन्ही टीका, सर्वार्थसिद्धी अध्याय–1 सूत्र–4 ची टीका, मोक्षमार्गप्रकाशक अध्याय–7 पृष्ठ–224 ते 235, समयसार व तत्त्वार्थसूत्र दोन्हीही ग्रंथ सात तत्त्वांसाठीच समर्पित आहेत.

2) समयसार आचार्यश्री जयसेनकृत टीकेच्या अनुसार मोक्षाधिकाराच्या अंतिम तीन गाथांची टीका – 'बंधस्य विनाशार्थं विशेषभावनामाह' च्या पुढील अंश, गाथा–28 ची भूमिकारूप संस्कृत टीका.

119. **हे गुरुराया ! तत्त्वे सांगा, नित्य प्रयोजनभूत किती ?**
**नावे त्यांची कोणकोणती, सांगा मजला ती असती ।।**
सात प्रयोजनभूत तत्त्व ही, आहे श्री जिनवाणीत।
नावे त्यांची ऐकुन घ्यावे, अन् ठेवावी ध्यानात ।।
जीव अजीव नि आस्रव बंध हि, नावे त्यांची आहेत।
संवर अन् निर्जरा अशी ही, मोक्ष तत्त्व ही आहेत ।।

120. **हे गुरुदेवा ! जीव तत्त्व हे कुणा म्हणावे सांगावे ?**
ज्ञानानंदी स्वभावी आत्मा, जीवतत्त्व हे जाणावे ।।

121. **जीवतत्त्व अन् जीवद्रव्य हे, दोन असे या जगतात।**
**हे गुरुदेवा ! सांगा मजला, भेद कोणता यांच्यात ?**
चैतन्याने पूर्ण शुद्ध अन्, त्रैकालिक ध्रुव हा आत्मा।
ज्ञानानंदस्वभावी निर्मळ, जीवतत्त्व आहे आत्मा ।।
सर्व विकारी अन् अविकारी, ज्यात अवस्था नित्य असे।
जाणुनि घ्यावे सत्य ज्ञान हे, जीव द्रव्य हे एक असे ।।
एक जीवतत्त्वामध्ये नित, भावांची मुख्यता असे।
जसे अनादि अनंत निरामय, जीवतत्त्व आत्माच असे ।।
ज्ञायक भाव एक आत्म्याचा, अक्षय अविनाशी आहे।
अचल अमल तो नित्य निरंजन, जीवतत्त्व आत्मा आहे ।।
आणि जीवद्रव्यामध्ये तर, गुण पर्याय सदाच असे।
द्रव्य क्षेत्र अन् काल भाव हे, या जीवाचे नित्य असे ।।
संसारी अन् सिद्धजीव हे, नित्य असे जाणुनि घ्यावे।
भेद जीवद्रव्याचे दोनच, असती हे जाणुनि घ्यावे ।।

122. **अजीवतत्त्व कशास म्हणावे, हे गुरुजी मजला सांगा।**
**किती आणि कोणती असे ती, नावे त्यांची मज सांगा ।।**
ज्ञानानंद-स्वभावी आत्मा, जीवतत्त्व हे नित्य असे।
याला सोडुनि पदार्थ सारे, अजीवतत्त्व जगात असे ।।
पुद्गल धर्म अधर्म काल नभ, द्रव्ये पाचही नित्य असे।
हीच अजीवतत्त्व जाणावे, हे जिनवाणीचे कथन असे ।।

**प्रश्न** 123 : आस्रवतत्त्व कशाला म्हणतात ?

**उत्तर** : आत्म्यामध्ये उत्पन्न होणाऱ्या राग-द्वेष-मोहरूप शुभाशुभ (पुण्य-पाप) विकारी परिणमांना भावास्रव म्हणतात. आणि त्यांच्या निमित्ताने ज्ञानावरणादी आठ द्रव्यकर्माच्या स्वयं आत्म्याकडे येण्याला द्रव्यास्रव म्हणतात.

**प्रश्न** 124 : बंधतत्त्व कशाला म्हणतात ?

**उत्तर** : राग, द्वेष, मोहरूप, शुभाशुभ (पुण्य-पाप) रूप विकारी/विभाव परिणामामध्ये थांबणे; याला भावबंध म्हणतात आणि त्यांच्या निमित्ताने कार्माणवर्गणारूप पुद्‌गलांचा आत्मप्रदेशाशी (एकक्षेत्रावगाहरूप) बंधन होणे याला द्रव्यबंध म्हणतात.

**प्रश्न** 125 : पुण्य-पापाला आस्रव बंधासोबत का जोडले आहे ?

**उत्तर** : पुण्य-पाप, आस्रव-बंधाचेच पोटभेद अर्थात अवांतर भेद आहेत. शुभ राग अर्थात प्रशस्त अनुरागामुळेच पुण्यरूप आस्रव-बंध होतात आणि अशुभ राग-द्वेष-मोहामुळे पापरूप आस्रव-बंध होतात; म्हणून पुण्य-पापाला आस्रव-बंधाबरोबर जोडले आहे.

**प्रश्न** 126 : संवरतत्त्व कशाला म्हणतात ?

**उत्तर** : ज्ञानानंदस्वभावी आपल्या आत्म्यामध्ये ज्ञानाला केंद्रित केल्याने आत्म्यात उत्पन्न होणाऱ्या शुद्धी (वीतरागते) ने शुभाशुभ (पुण्य-पाप) रूप विकारी परिणामांना रोकणे; याला भावसंवर म्हणतात आणि आत्म्यामध्ये उत्पन्न वीतरागतेने

*आस्रव भावांचा/परिणामांचा मुळासकट नाश करण्यासाठी सपूंर्ण आस्रव परिणामांना आपण हेय जाणले पाहिजे, मानले पाहिजे. ते आस्रव परिणाम पापरूप, पुण्यारूप किंवा शुभाशुभरूप कोणत्याही प्रकारचे असोत, त्या सर्वांना हेयच जाणले-मानले पाहिजे. शुभास्रवासंबंधी उपादेयबुद्धी बाळगणे मिथ्यात्व नावाचा अशुभतम आस्रव आहे. तीर्थंकरनामकर्माचा बंध करणाऱ्या शुभतम परिणामासंबंधी जरी जीव उपादेयबुद्धी बाळगेल तर तो भाव अनंत संसाराला कारणीभूत अशुभतम आस्रवभाव ठरतो.*

**— बारा भावना : एक अनुशीलन पृष्ठ-104**

123. **आस्रवतत्त्व कशास म्हणावे, हे गुरुराया ! मज सांगा।**
**कोणकोणते भाव असे ते, आस्रवतत्त्व मला सांगा।।**
पुण्यपापमय रागद्वेषमय, अन् मोहादिक परिणाम।
आत्म्याचे हे भाव विकारी, भावास्रव त्यांचे नाम।।
अन् त्यांच्याच निमित्ताने ही, अष्टद्रव्य कर्मे येती।
ज्ञानावरणादिक ही कर्मे, आत्म्याकडे स्वयं येती।।
द्रव्यास्रव यालाच म्हणावे, ज्ञानीजन हे सांगतसे।
भावस्रव अन् द्रव्यास्रव हे, जाणा आस्रवतत्त्व असे।।

124. **बंधतत्त्व म्हणतात कशाला ? गुरुराया सांगा मजला।**
**कोणकोणते भाव असे ते, बंधतत्त्व सांगा मजला।।**
रागद्वेष अन् मोहादिक या, विभाव परिणामात सदा।
या जीवाचे स्थिर होणे हा, भावबंध जाणाच सदा।।
त्यांच्याच निमित्ताने मग, आत्मप्रदेशाशीच सदा।
पुद्गलमय कार्माणवर्गणा, यांचे बंधन होइ सदा।।
द्रव्यबंध यालाच म्हणावे, योगी जन हे सांगतसे।
भावबंध अन् द्रव्यबंध हे, समजावुनिया सांगतसे।।

125. **पुण्य-पाप का म्हणुनि जोडले, आस्रव बंधाशी सांगा ?**
**पुण्य-पाप हे आस्रव बंधचि, तत्त्व असे का मज सांगा।।**
पुण्य-पाप आस्रव बंधाचे, भेद अवांतर आहेत।
पुण्य-पाप आस्रव बंधाच्या, अंतर्गत नित येतात।।
शुभ रागाने पुण्यास्रव अन्, पुण्यबंध नित होत असे।
अशुभाने पापास्रव होतो, पापबंध अन् होत असे।।
याचमुळे तर पुण्य पाप हे, आस्रव बंधाशी जुळले।
पुण्य पाप हे भेद यामुळे, आस्रव बंधाचे ठरले।।

126. **संवरतत्त्व कशास म्हणावे ? सांगा मजला गुरुराया !**
**संवरभाव कोणते आहे ? सांगा मजला गुरुराया !!**
ज्ञानानंदस्वभावी अपुल्या, ज्ञानामध्ये आत्म्याला।
केंद्रित करता वीतरागमय, भाव येतसे जन्माला।।
शुद्ध भाव हा निरोध करतो, सर्व विकारी भावांचा।
राग-द्वेष अन् पुण्य-पाप या, विषमय सर्व विभावांचा।।
हाच भावसंवर जाणावा हा, मंगल पथ धर्माचा।
भावास्रव हा नित्य रोकतो, प्रभाव संवरतत्त्वाचा।।

(शुद्धतेमुळे) नवीन येणाऱ्या कर्मांना थांबविणे (येऊ न देणे); याला द्रव्यसंवर म्हणतात.

**प्रश्न** 127 : निर्जरातत्त्व कशाला म्हणतात ?

**उत्तर** : ज्ञानानंदस्वभावी आपल्या आत्म्यामध्ये ज्ञानाला केंद्रित केल्याने आत्मस्थिरतेच्या वृद्धीमुळे आंशिक शुद्धीच्या वृद्धीला भावनिर्जरा म्हणतात. आणि वीतरागतेच्या (शुद्धीच्या) निमित्ताने जड कर्म निघून जाते; याला द्रव्यनिर्जरा म्हणतात.

**प्रश्न** 128 : मोक्षतत्त्व कशाला म्हणतात ?

**उत्तर** : ज्ञानानंदस्वभावी आपल्या आत्म्यामध्ये ज्ञानाला केंद्रित केल्याने ध्यानामुळे झालेल्या शुद्धीच्या पूर्णतेला (सिद्धावस्थेला) भावमोक्ष म्हणतात आणि शुद्धीच्या निमित्ताने द्रव्यकर्मांचा सर्वथा नाश होणे याला द्रव्यमोक्ष म्हणतात.

**प्रश्न** 129 : शुद्धीला दुसरी कोण-कोणती नावे आहेत ?

**उत्तर** : शुद्धीला वीतरागता, मोक्षमार्ग, रत्नत्रय, धर्म, सुख, शांती इत्यादी अनेक नावे आहेत.

**प्रश्न** 130 : सात तत्त्वामध्ये हेय-ज्ञेय-उपादेय तत्त्वे कोण-कोणती आहेत ?

**उत्तर** : * सात तत्त्वामध्ये आस्रव व बंधतत्त्व दुःखाला कारण व दुःखरूप असल्यामुळे आस्रव व बंधतत्त्व हेय (त्यागण्यायोग्य) आहेत.

* अजीवतत्त्व सुख-दुःखाला कारण नाही आणि स्वयं सुख-दुःखरूप देखील नाही. म्हणून अजीवतत्त्व मात्र ज्ञेय (जाणण्यायोग्य) आहे. खरे पाहिले असता सातही तत्त्वांना जाणणे आवश्यक असल्याने सात ही तत्त्वे देखील ज्ञेय आहेत.

*वास्तविक पाहिले असता हा साक्षात् संवर शुद्ध आत्मतत्त्वाच्या प्राप्ती/उपलब्धीमुळेच होतो आणि शुद्धात्मतत्त्वाची प्राप्ती भेदविज्ञानानेच होते; म्हणून भेदविज्ञानाची भावना विशेष रीतीने जीवनामध्ये बाळगली पाहिजे.*

**— समयसार कलश**-129

अन् आत्म्याची शुद्ध अवस्था, निरोध करिते कर्मांचा।
पुद्गल कर्म वर्गणांचा, अन् येणाऱ्या नव कर्मांचा।।
हाच द्रव्यसंवर जाणावा, संवरतत्त्व असे धर्म।
याचमुळे आत्म्याशी कधि नच, जुळते भाव द्रव्यकर्म।।

127. **तत्त्व निर्जरा कुणा म्हणावे ? सांगावे मज गुरुदेवा !**
**आणि निर्जरा भाव कोणता ? सांगावे मज गुरुदेवा !!**
ज्ञानानंदस्वभावी अपुल्या, आत्म्यामध्ये ज्ञानाला।
स्थिर केल्याने प्राप्त करितसे, आत्मा आंशिक शुद्धीला।।
या शुद्धीच्या वृद्धीने मग, भावकर्म हे जात असे।
भावनिर्जरा ही जाणावी, श्री जिनवाणी सांगतसे।।
या शुद्धीच्या योगाने मग, हे जडकर्म निघुनि जाते।
द्रव्यनिर्जरा ही जाणवी, श्री जिनवाणी हे म्हणते।।

128. **मोक्षतत्त्व म्हणतात कशाला ? हे गुरुदेवा ! मज सांगा।**
**मोक्ष भाव हा असे कोणता ? हे गुरुदेवा ! मज सांगा।।**
ज्ञानानंदस्वभावी अपुल्या, ज्ञानाला नित आत्म्यात।
केंद्रित करुनी मग्न होतसे, आत्मा निश्चल ध्यानात।।
या ध्यानाने आत्म्यामध्ये, पूर्ण शुद्धता येत असे।
भावमोक्ष हा जाणुनि घ्यावा, संत पुरुष हे सांगतसे।।
या शुद्धीच्या संयोगाने, अष्टद्रव्य जड कर्मांचा।
विनाश होतो पूर्ण सर्वथा, संसारातिल दुःखांचा।।
द्रव्यमोक्ष हा जाणुनि घ्यावा, हे जिनप्रभुचे वचन असे।
मोक्षतत्त्व हे सुखमय आहे, हे जिनप्रभुचे कथन असे।।

129. **या शुद्धीला कोणकोणती, दुसरी नावे आहेत ?**
वीतरागता रत्नत्रय सुख, धर्म शांति ही आहेत।।

130. **सातहि तत्त्वामधे कोणती, हेय ज्ञेय तत्त्वे सांगा ?**
**उपादेय अन् किती कोणती, तत्त्वे ही मजला सांगा ?**
आस्रव बंध हेय तत्त्वे ही, दुःखरूप नित आहेत।
हीच दोन तत्त्वे दुःखाचे, कारण निश्चित आहेत।।
आणि अजीव तत्त्व हे एकच, जड आहे अन् ज्ञेय असे।
सुखदुःखाशी या तत्त्वाचा, किंचितही संबंध नसे।।

* जीवतत्त्वाच्या आश्रयानेच सुख प्रगट होते; म्हणून जीवतत्त्व परम उपादेय (ज्ञेय/ध्यान करण्यायोग्य) आहे.

* संवर-निर्जरातत्त्व पूर्ण सुखाला कारण व स्वयं आंशिक सुखरूप आहेत.म्हणून संवर-निर्जरातत्त्व एकदेश उपादेय (ग्रहण करण्यायोग्य/प्राप्त करण्यायोग्य/साध्य) आहेत.

* मोक्षतत्त्व पूर्ण सुखरूप असल्यामुळे सर्वथा उपादेय (ग्रहण करण्यायोग्य/प्राप्त करण्यायोग्य/साध्य) आहे.

**प्रश्न** 131 : सात तत्त्वामध्ये सामान्यतत्त्व व विशेषतत्त्व असे विभाग कसे करता येतील ?

**उत्तर** : जीव व अजीव ही दोन तत्त्वे सामान्य तत्त्वे आहेत व आस्रव बंधादी पाच तत्त्वे जीवाजीवाचेच विशेष तत्त्वे आहेत.

**प्रश्न** 132 : सात तत्त्वापैकी प्रत्येक तत्त्वाचा काळ सांगा ?

**उत्तर** : जीव व अजीवतत्त्व अनादी-अनंत आहेत. आस्रव व बंधतत्त्व अनादी-सांत आहेत. तसेच अभव्याच्या अपेक्षेने अनादी-अनंत आहे. संवर व निर्जरातत्त्व सादी-सांत आहेत. मोक्षतत्त्व सादी-अनंत आहे.एक समयवर्ती पर्यायाच्या अपेक्षेने आस्रवादी पाच तत्त्वे सादी-सांत आहेत.

## कार्य-कारण

**प्रश्न** 133 : कार्य कशाला म्हणतात ?

**उत्तर** : विश्वातील प्रत्येक द्रव्य परिणमनशील आहे. द्रव्याच्या परिणमनाला पर्याय अथवा कार्य म्हणतात.[1] (पर्यायाला जी दुसरी नावे आहेत, ती सर्व नावे कार्याला जाणावीत.)

**प्रश्न** 134 : कार्य कसे होते ?

**उत्तर** : कार्य कारणाला अनुसरून होते.

1) कार्तिकेयानुप्रेक्षा गाथा–230, जैनमिमांसा पृष्ठ–75, निमित्तोपादान पृष्ठ–2, 3, 4.

खरे पाहता सातहि तत्त्वे, ज्ञेय असे नित ज्ञेय असे।
म्हणुनी यांना जाणुनि घेणे, आवश्यक हे कार्य असे।।
जीव तत्त्व हे उत्तम आहे, परम उपादेयचि आहे।
याचा आश्रय परमसुखाचे एकमेव साधन आहे।।
संवर आणि निर्जरातत्त्वे, आंशिक सुखमय आहेत।
एकदेश नित उपादेय ही, अन् सुखसाधन आहेत।।
मोक्षतत्त्व हे पूर्ण सर्वथा, उत्तम्र सुखमय नित्य असे।
उपादेय अन् अखंड शाश्वत, परमामृत हे नित्य असे।।

131. **हे गुरुराया ! सांगा मजला, याच सातही तत्त्वात।**
**विशेष अन् सामान्यचि तत्त्वे, किती कोणती आहेत ?**
जीव अजीव दोन ही तत्त्वे, नित सामान्य असे जाणा।
आस्रव बंध संवरादिक ही, पाच विशेष असे जाणा।
आस्रव बंध आणि संवर ही, अन् निर्जरा मोक्ष तत्त्वे।
जीवाजीवाशी संबंधित, म्हणुनि विशेष असे तत्त्वे।।

132. **सातहि तत्त्वांचा प्रत्येकी,काल किती अन् कसा असे ?**
जीव अजीव दोन ही तत्त्वे, नित्य अनादि अनंत असे।।
आस्रव आणि बंध ही तत्त्वे, दोन अनादि सांत असे।
आणि अभव्याच्या दृष्टीने, हीच अनादि अनंत असे।।
संवर आणि निर्जरा तत्त्वे, सादि सांत असे जाणा।
मोक्ष तत्त्व हे एक अलौलिक, सादि अनंत असे जाणा।।
एक समय पर्याय दृष्टीने, आस्रव आणि बंध तत्त्वे।
संवर अन् निर्जरा मोक्ष ही, सादि सांत जाणा तत्त्वे।।

# कार्य-कारण

133. **हे गुरुदेवा ! सांगा मजला, कार्य कशाला म्हणतात ?**
द्रव्याच्या नित परिणमनाला, कार्य असेची म्हणतात।।
विश्वातिल प्रत्येक द्रव्य हे, करित असे परिणमन सदा।
या परिणमनालाच कार्य वा, म्हणा दशा पर्याय सदा।।

134. **हे गुरुदेवा ! सांगा मजला, कार्य कसे जगि होत असे ?**
कार्य कारणाला अनुसरुनि, नियमित जगती होत असे।।

**प्रश्न** 135 : कारण कशाला म्हणतात ?

**उत्तर** : कार्याच्या उत्पादक सामग्रीला कारण म्हणतात.[1]

**प्रश्न** 136 : उत्पादक सामग्रीचे किती भेद आहेत ?

**उत्तर** : उत्पादक सामग्रीचे दोन भेद आहेत – 1) उपादान कारण व 2) निमित्तकारण.

**प्रश्न** 137 : उपादानकारण कशाला म्हणतात ?

**उत्तर** : जे द्रव्य स्वतः कार्यरूप परिणमते; त्याला उपादानकारण म्हणतात.

**जसे** – घटाच्या उत्पत्तीमध्ये माती.[2]

**प्रश्न** 138 : उपादान कारणाचे किती भेद आहेत ?

**उत्तर** : उपादान कारणाचे दोन भेद आहेत – 1) त्रिकाली/ध्रुवउपादान व 2) क्षणिकउपादान.

**प्रश्न** 139 : त्रिकाली उपादान कशाला म्हणतात ?

**उत्तर** : जे द्रव्य अथवा जो गुण स्वतः कार्यरूपाने परिणमतो; त्या द्रव्य वा गुणाला त्रिकालीउपादान म्हणतात.[3]

**जसे** – घटरूप कार्याच्या उत्पत्तीमध्ये माती त्रिकालीउपादान आहे. मिथ्यात्व वा सम्यक्त्वरूप कार्यामध्ये श्रद्धागुण त्रिकालीउपादान आहे.

त्रिकालीउपादान, कार्यामध्ये मूळ कारण असणाऱ्या द्रव्याचे वा गुणाचे ज्ञान करून देते. तसेच अन्य सर्व द्रव्यांचे व गुणांचे निराकरण करते. त्रिकाली उपादानालाच द्रव्यशक्ती देखील म्हणतात.

---

1) कार्तिकेयानुप्रेक्षा गाथा–230.

2) भैया भगवतीदास : उपादान-निमित्त संवाद दोहा–3, निमित्तोपादान पृष्ठ–6 ते 9.

3) निमित्तोपादान पृष्ठ–5, 6.

**135. हे गुरुदेवा ! सांगा मजला, कारण कशास म्हणतात ?**
कार्योत्पादक सामुग्रीला कारण असेचि म्हणतात ।।

**136. कार्योत्पादक सामुग्रीचे, भेद किती ते सांगावे ?**
उपादान अन् निमित्तकारण, भेद असे हे जाणावे ।।

**137. उपादान अन् निमित्तकारण, यांची व्याख्या मज सांगा।**
**हे गुरुदेवा ! महत्त्व यांचे, अन् विशेषता मज सांगा ।।**
अपुल्या कार्याच्या रूपाने, द्रव्य स्वयं परिणमित असे।
उपादानकारण नित त्याला, ज्ञानी योगी म्हणत असे ।।
जसे मृत्तिका बदलुनि जाते, सदा स्वयं घटरूपात।
तसे द्रव्य नित बदलत असते, अपुल्याही पर्यायात ।।

**138. याच उपादानाचे सांगा, भेद कोणते आहेत ?**
त्रैकालिक अन् क्षणिक असे हे दोन भेद नित आहेत।।

**139. त्रैकालिक ध्रुव उपादान हे, कुणा म्हणावे मज सांगा ?**
**कार्य तयाचे महत्त्व त्याचे, हे गुरुदेवा ! मज सांगा ।।**
द्रव्य स्वतः जे अथवा गुण जो परिणमतो निज कार्यात।
त्यास त्रिकाली उपादान नित, साधु संत जन म्हणतात ।।
जसे घटोत्पत्तीत मृत्तिका, असे त्रिकालि उपादान।
जसे चतुर्गतिमधे जीव हा, स्वयं करितसे परिणमन ।।
सम्यग्दर्शन मिथ्यादर्शन, यांच्या कार्योत्पत्तीत।
श्रद्धा गुण हा स्वयं सदा ही, होतच असतो परिणमित ।।
माती जीव अन् श्रद्धा गुण हे, असे त्रिकालि उपादान।
कारण हे तर स्वतः करितसे, कार्यरूप नित परिणमन ।।
कार्योत्पत्तीमधे मूळ जे, कारण स्वतः सदा असते।
उपादान हे द्रव्य गुणांचे, ज्ञान करुनिया नित देते ।।
तसेच दुसऱ्या द्रव्य गुणांचे, निराकरण ही नित करते।
त्रैकालिक ध्रुव उपादान हे, निजशक्तीने परिणमते ।।
नित्य त्रिकाली उपादान हे, कार्याचे कारण आहे।
मूळ असे कार्योत्पत्तीचे, द्रव्यशक्ति ही तर आहे ।।

**प्रश्न** 140 : क्षणिकउपादानाचे किती भेद आहेत ?

**उत्तर** : क्षणिकउपादानाचे दोन भेद आहेत – 1) अनन्तरपूर्वक्षणवर्ती पर्याय व 2) तत्समयाची योग्यता.

**प्रश्न** 141 : अनंतरपूर्वक्षणवर्ती पर्यायाचा काय अर्थ आहे ?

**उत्तर** : अनादी काळापासून प्रत्येक द्रव्यामध्ये पर्यायाचा जो अखंड प्रवाह चालू आहे; त्यात अनंतरपूर्वक्षणवर्तीपर्याय उपादान कारण आहे. व अनंतर उत्तरक्षणवर्ती पर्याय हे कार्य आहे.

**जसे** – 1) घटरूप कार्य होण्याच्या अगोदर एकसमयवर्तीपर्यायामध्ये स्थित मातीची अवस्था. म्हणजेच स्थास-कोष-कुशलस्वरूप परिणत ओल्या मातीच्या गोळ्याची शेवटच्या समयातील विशिष्ट अवस्था, ज्या अवस्थेनंतर साक्षात घट उत्पन्न होतो; तीच अनंतरपूर्वक्षणवर्तीपर्याय.

2) सम्यक्त्वरूप कार्यामध्ये करणलब्धिपैकी अनिवृत्तिकरणमधील शेवटच्या समयाची अवस्था, ज्याच्यानंतर तत्काल (अनंतर समयामध्ये) सम्यक्त्वरूप कार्य प्रगट होते.

**प्रश्न** 142 : तत्समयाची योग्यता/क्षणिक उपादान कशाला म्हणतात ?

**उत्तर** : ज्या समयामध्ये जे कार्य प्रगट होते; तेच कारण व तेच कार्य यालाच तत्समयाची योग्यता/क्षणिक उपादान म्हणतात. (त्रिकाली वा ध्रुव उपादान द्रव्यार्थिक नयाचा विषय आणि क्षणिक उपादान हा पर्यायार्थिक नयाचा विषय आहे.)

*कालाची नियामक पर्यायशक्तीच आहे. कालाचे दुसरे नाव देखील पर्यायच आहे. ही पर्यायशक्ती अनंतरपूर्वक्षणवर्ती पर्यायाच्या व्ययरूप आणि तत्समयाच्या योग्यतेरूप असते. म्हणून या दोन्हीचे नाव देखील क्षणिक उपादान आहे. म्हणून क्षणिक उपादानाला कार्याचा नियामक म्हटले आहे.*

– **निमित्तोपादान पृष्ठ**-11,12

**140. क्षणिक उपादानाचे सांगा, भेद किती ते आहेत ?**

क्षणिक उपादानाचे ऐका, दोन भेद हे आहेत।।
जाणुनि घ्यावे एक अनंतर, पूर्वक्षणवर्ती पर्याय।
तत्समयाची पूर्ण योग्यता, हीच असे दुसरी पर्याय।।

**141. हे गुरुदेवा ! एक अनंतर, पूर्वक्षणवर्ती पर्याय।**
**कुणा म्हणावे कार्य कोणते, सांगा करिते ही पर्याय ?**

अनादि काळापासुनिया, नित पर्यायांचा द्रव्यात।
अखंड नियमित प्रवाह चालू, असतो जाणुनि घ्या सतत।।
त्याच प्रवाहामधे अनंतर, पूर्वक्षणवर्ती पर्याय।
उपादान कारण हे आहे, जाणावे ही नित पर्याय।।
अन् समजुनि घ्या एक, अनंतर उत्तरक्षणवर्ती पर्याय।
कार्य असे हे संत सांगती, जिनवाणीचे तात्पर्य।।

1. जसे घटाची पूर्व अवस्था, एक समयवर्ती त्यास।
स्थास कोष अन् कुशलरूप, ती परिणत ओल्या मातीत।।
अंतिम समयातिल मातीची, जीच विशेष दशा होते।
त्यानंतर घट पर्यायाची, निश्चित उत्पत्ती होते।।

2. सम्यक्त्वाच्या कार्यामध्ये, अनिवृत्तीकरणातील।
अंतिम समय अवस्थेनंतर, समकित होते तत्काल।।

**142. तत्समयाची पूर्ण योग्यता, कुणा म्हणावे सांगावे ?**
**दुसऱ्या क्षणिक उपादानाचे, महत्त्व मजला सांगावे।।**

ज्या समयामध्ये जेव्हा जे, कार्य प्रगट होतसे सदा।
कारण तेच असे जाणावे, कार्य तेचही असे सदा।।
तत्समयाची हीच योग्यता, आहे हे तर जाणुनि घ्या।
उपादान हे क्षणिक म्हणावे, संत सांगती समजुनि घ्या।।
त्रैकालिक ध्रुव उपादान हा, द्रव्यार्थिकनय विषय असे।
अन् पर्यायार्थीक नयाचा, क्षणिक उपादान विषय असे।।

**प्रश्न** 143 : निमित्तकारण कशाला म्हणतात ?

**उत्तर** : जो पदार्थ, स्वयं कार्यरूप परिणमित होत नाही; परंतु कार्याच्या उत्पत्तीमध्ये अनुकूल होण्याचा ज्याच्यावर आरोप येतो; त्या पदार्थास निमित्तकारण म्हणतात.[1]

**प्रश्न** 144 : निमित्तकारणाचे किती भेद आहेत ?

**उत्तर** : निमित्तकारणाचे दोन भेद आहेत – 1) प्रेरक निमित्त व 2) उदासीन निमित्त.[2]

**प्रश्न** 145 : प्रेरक निमित्तामुळे न होणारे कार्य होते अथवा प्रेरक निमित्त बलवान असते; असेच समजले पाहिजे ना ?

**उत्तर** : नाही, प्रेरक निमित्त देखील स्वरूपाच्या अपेक्षेने उदासीनच आहे; तरीदेखील प्रेरक निमित्त स्वयं गतिशील वा ज्ञानवान असते; म्हणून त्याला उपचाराने प्रेरक नाव दिले आहे.

जसे – 1) अध्ययनरूप कार्यामध्ये दिपक, खोली, टेबल इत्यादी उदासीन निमित्त आणि शिक्षक प्रेरक निमित्त.

2) गमनरूप कार्यामध्ये रस्ता, प्रकाश, धर्मद्रव्य उदासीननिमित्त व मोटार, ड्रायव्हर इत्यादी प्रेरक निमित्त.

**प्रश्न 146 : उपादान व निमित्त कारणाला जाणल्यामुळे काय फायदे होतात ?**

**उत्तर** : उपादान व निमित्त कारणाला जाणल्यामुळे अनेक फायदे होतात –

---

1) प्रमेयकमलमार्तंड पृष्ठ–187.

2) इष्टोपदेश श्लोक–35 व त्याची संस्कृत टीका.

*इच्छारहित व निष्क्रिय द्रव्य उदासीन निमित्त असतात. इच्छावान व क्रियावान द्रव्यास प्रेरक निमित्त म्हणतात. जसे – धर्म, अधर्म, आकाश व काल ही चारही द्रव्ये इच्छा शक्तीने रहित व निष्क्रिय सुद्धा आहेत, म्हणून ते उदासीन निमित्त होत. तसेच विद्यार्थ्यांना शिकविण्याकरीता इच्छावान अध्यापक आणि झेंड्याला फडकविण्याकरीता हवा प्रेरक निमित्त आहेत. येथे निमित्तांच्या अस्तित्वाचा निषेध केला जात नाही; परंतु निमित्तांच्या कर्तृत्वाचा निषेध अवश्य केला जातो.*

– निमित्तोपादान पृष्ठ-17, 18

**143. निमित्तकारण कुणा म्हणावे ? हे गुरुवर ! मजला सांगा।**
**महत्त्व त्याचे कार्य तयाचे, हे गुरुवर ! मजला सांगा।।**
कार्यरूप जो पदार्थ जगती, स्वयं कधी परिणमित नसे।
परंतु कार्योत्पत्तीमध्ये, तोच उपस्थित नित्य असे।।
अन् जो कार्योत्पत्तीमध्ये असे, सदा अनुकूल असा।
ज्याच्यावर आरोप होतसे, हा मिथ्याभ्रम जाइल कसा ?
निमित्तकारण पदार्थ तोची, असे हे निश्चित जाणावे।
कार्यामध्ये असणे त्याचे, निमित्तकारण जाणावे।।

**144. भेद निमित्ताचे मज सांगा, किती कोणते आहेत ?**
**कार्य तयाचे अन् विशेषता, कोण कोणत्या आहेत ?**
प्रेरक उदासीन हे दोनच, भेद निमित्ताचे जाणा।
प्रेरक नाव जरी हे त्याचे, उदासीन ते परि जाणा।।

**145. प्रेरक निमित्त कार्य करी कां ? अथवा ते बलवान असे ?**
**समजावुनि सांगा मज गुरुजी ! महत्त्व त्याचे काय असे ?**
प्रेरक निमित्त जाणुनि घ्यावे, ज्ञानवान गतिशील असे।
परंतु त्याचा स्वभाव जाणा, उदासीन हा नित्य असे।।
1.अध्ययनाच्या कार्यामध्ये, खुर्ची टेबल अन् दीपक।
उदासीन हे निमित्त आहे, खोली पंखा अन् पुस्तक।।
अन् अध्यापक वा शिक्षागुरु, ज्ञानदान जे देतात।
म्हणुनि प्रेरक निमित्त यांना, उपचाराने म्हणतात।।
2.धर्मद्रव्य अन् प्रकाश रस्ता, गमनरूप कार्यामध्ये।
उदासीन हे निमित्त आहे, हलनचलन कार्यामध्ये।।
गाडी घोडा रिक्शा ड्रायव्हर, गमनरूप कार्यामध्ये।
प्रेरक निमित्त हे तर आहे, हलनचलन कार्यामध्ये।।

**146. उपादान अन् निमित्त यांच्या, ज्ञानाने या जीवाला।**
**किती फायदे होत असे नित? हे गुरुवर! सांगा मजला।।**
उपादान अन् निमित्त कारण याचे ज्ञान करूनि घेता।
निम्नलिखित हे बहू फायदे, होत असे जीवास सदा।।

1) जीवामध्ये स्वतःचेच दोष पाहण्याची प्रवृत्ती उत्पन्न होते.

2) परद्रव्याच्या कर्तृत्वाचा मिथ्या अभिमान निघून जातो.

3) परद्रव्याचे महत्त्व कमी होत राहते; म्हणून धनादीरूप अनुकूल सामुग्री नसली तरी मनात हीनभाव-दीनभाव येत नाही.

4) स्वातंत्र्य व स्वावलंबनाचे पुरुषार्थमूलक विचार दृढ/पक्के होतात.

5) इतरांची मदत मिळावी; अशी भावना निघून जाते. म्हणून मानसिक व्यग्रता नष्ट होते. जीवनात स्वाभाविक शांती प्राप्त होते.

6) निमित्त-उपादानाची चर्चा करित राहल्याने आपले अल्पज्ञान सहजच जिनेंद्रकथित वीतरागी तत्त्वज्ञानामध्ये गुंतून राहते. शुभोपयोग होत राहतो. म्हणजेच शुद्धोपयोगासाठी (धर्माच्या उत्पत्तीसाठी) आवश्यक भूमिका तयार होते.

# नय

**प्रश्न** 147 : नय कशाला म्हणतात ?

**उत्तर** : जे ज्ञान प्रमाणज्ञानाने जाणलेल्या वस्तूच्या एका अंशाला जाणते; त्याला नय म्हणतात.[1]

**प्रश्न** 148 : नयाच्या दुसऱ्या कोण-कोणत्या व्याख्या आहेत ?

**उत्तर** : अ) श्रुतज्ञानाच्या विकल्पाला अर्थात भेदाला नय म्हणतात. म्हणजेच श्रुतज्ञानाच्या अंशाला नय म्हणतात.[2]

---

1) आलापपद्धती सूत्र–181.

2) आलापपद्धती सूत्र–181.

*अग्नीला स्पर्श केला व म्हटले की अग्नी उष्ण आहे. अग्नीद्वारे अन्न शिजतांना पाहिले आणि म्हटले की अग्नी पाचक आहे. अग्नीला प्रकाशित करताना पाहिले आणि म्हटले की अग्नी प्रकाशक आहे. इत्यादीरूपाने अग्नी अनंतरूप आहे. अशाप्रकारे अग्नीला संबोधने किंवा विकल्प करणे सर्व वचनविलास आहे. या वचनविलासाद्वारे नयरूपाने लोकामध्ये (विश्वामध्ये) व आगमग्रंथामध्ये उपचार केला जातो.*

**– पंचाध्यायी, प्रथम खंड, श्लोक**-513

1)जीव आपुले दोष पाहतो, आत्मनिरिक्षण नित करतो।
2)परद्रव्याच्या कर्तृत्वाचा, वृथा दंभ सोडुनि देतो।।
3)धनादिकांच्या अभावात ही, मलीन मन कधि होत नसे।
जीव सदा प्रतिकूल दशेतहि, दीन हीन कधि होत नसे।।
4)अपुल्या स्वातंत्र्याचे हृदयी, विचार दृढ नित होत असे।
स्वावलंबनाचा पुरुषार्थ हि, हृदयी जागृत होत असे।।
5)पराश्रयाचा भाव सर्वथा, हृदयातुनि निघुनि जातो।
आणि मनातिल आकुलतेचा, अभाव निश्चितही होतो।।
या जीवाच्या जीवनात मग, स्वाभाविक शांती येते।
समाधान सुख जीवा मिळते, अस्थिर मन सुस्थिर होते।।
6)उपादान अन् निमित्त कारण, यांच्या चर्चेमुळे सदा।
वीतराग तत्त्वज्ञानातच, मग्न होतसे जीव सदा।।
या चर्चेने या जीवाची, बुद्धी विकसित होत असे।
जिनेश्वराच्या धर्म चिंतनी, गुंतुनिया मन जात असे।।
मिथ्याभ्रम अन् गर्व सर्वथा, नष्ट होतसे जीवाचा।
अन् हृदयी प्रारंभ होतसे, पावन शुभोपयोगाचा।।
याचमुळे मग या जीवाची, धर्मभावना वाढतसे।
अन् शुद्धोपयोगमय अंकुर, वृद्धिंगत नित होत असे।।

## नय

**147. मला नयाची व्याख्या सांगा, अर्थ तयाचा मज सांगा।**
**हे गुरुराया ! महत्त्व त्याचे, कृपा करुनिया मज सांगा।।**
प्रमाण ज्ञाने ज्ञात वस्तुच्या, केवळ एका अंशाला।
जेच जाणते ज्ञान सदोदित, नित्य म्हणावे नय त्याला।।

**148. मला नयाच्या व्याख्या सांगा, कोण कोणत्या आहेत ?**
**महत्त्व त्याचे अन् विशेषता, किती कोणत्या आहेत ?**
अ) श्रुतज्ञानाच्या विकल्पास वा, भेदाला नय म्हणतात।
अथवा श्रुतज्ञानाच्या एका, अंशाला नय म्हणतात।।

ब) ज्ञात्याच्या अथवा वक्त्याच्या अभिप्रायाला नय म्हणतात.[1]

क) जे ज्ञान अनेक प्रकारच्या स्वभावाने सहित असलेल्या वस्तुला एका स्वभावामध्ये स्थापित करते; त्या ज्ञानाला नय म्हणतात.[2]

**प्रश्न** 149 : प्रमाणज्ञान कशाला म्हणतात ?

**उत्तर** : * सम्यक् अर्थात खऱ्या ज्ञानाला प्रमाणज्ञान म्हणतात.[3]

* जे ज्ञान समग्र वस्तूला जाणते; त्या ज्ञानाला प्रमाणज्ञान म्हणतात.[4]

**प्रश्न** 150 : नयाचे किती भेद आहेत ?

**उत्तर** : नयाचे भेद भिन्न-भिन्न अपेक्षेने अनेक आहेत.

अ) प्रत्येक द्रव्यामध्ये अनंत गुण आहेत. प्रत्येक गुणाला जाणणारा एक नय आहे. म्हणून नय अनंत आहेत.

ब) जेवढे वचन-विकल्प आहेत, तेवढे नय आहेत.[5]

क) प्रवचानसार ग्रंथामध्ये 47 नय सांगितले आहेत.

ड) तत्त्वार्थसूत्र शास्त्रामध्ये नैगमादी 7 नय सांगितले आहेत.

ई) द्रव्यार्थिक व पर्यायार्थिक असे 2 व निश्चयनय व व्यवहारनय असेही 2 भेद नयाचे पहावयास मिळतात.[6]

**प्रश्न** 151 : निश्चयनय कशाला म्हणतात ?

**उत्तर** : जो नय आत्माश्रित/स्वाश्रित कथन करतो, त्याला निश्चयनय म्हणतात.[7]

**प्रश्न** 152 : निश्चयनयाच्या दुसऱ्या देखील व्याख्या आहेत काय ?

**उत्तर** : होय, निश्चयनयाच्या दुसऱ्या देखील व्याख्या आहेत –

क) जो नय, आत्म्याच्या भूतार्थ/सत्यार्थ स्वभावाचे कथन करतो; त्याला निश्चयनय म्हणतात.[8]

ख) जो नय, ज्या द्रव्याची जी पर्याय आहे, त्याला त्या द्रव्याची आहे, असे सांगतो; त्याला निश्चयनय म्हणतात.[9]

ग) जो नय, स्वद्रव्य-परद्रव्याला व त्यांच्या परिणमनाला तसेच कारण-कार्यादीकांना यथावत कथन करतो; त्याला निश्चयनय म्हणतात.[9]

---

1) आलापपद्धती सूत्र–181. 2) आलापपद्धती सूत्र–181. 3) तत्त्वार्थसूत्र अध्याय–1, सूत्र–10. 4) आलापपद्धती सूत्र–177. 5) गोम्मटसार कर्मकांड गाथा–894, सन्मतितर्क कारिका–3, गाथा–47. 6) द्रव्यस्वभावप्रकाशकनयचक्र गाथा–142. 7) समयसार गाथा–272 ची टीका. 8) समयसार गाथा–11, पुरुषार्थसिद्ध्युपाय श्लोक–5. 9) मोक्षमार्गप्रकाशक पृष्ठ–248 ते 257.

ब.ज्ञात्याच्या अभिप्रायाला नित, संत पुरुष नय म्हणता।
अन् वक्त्याच्या अभिप्रायाला, संत पुरुष नय म्हणतात।।
क.अनेकांतमय वस्तूला जे, ज्ञानच एका धर्मात।
स्थापित करते त्या ज्ञानाला, संत पुरुष नय म्हणतात।।

149. **प्रमाण ज्ञान कशास म्हणावे? हे गुरुजी! मजला सांगा।**
**अर्थ तयाचा महत्त्व त्याचे, श्री गुरुवर! मजला सांगा।।**
सम्यक् ज्ञानाला योगी जन, प्रमाण ज्ञानचि म्हणतात।
पूर्ण वस्तुला जेच जाणते, प्रमाण त्याला म्हणतात।।

150. **भेद नयाचे किती कोणते, सांगा मजला आहेत?**
भिन्न भिन्न दृष्टीने ते तर, भेद अनेकचि आहेत।।
अ.एका एका द्रव्यामध्ये, अनंत गुण नित असतात।
जो प्रत्येक गुणास जाणतो, त्याला नित नय म्हणतात।।
याच अपेक्षेने जाणावे नय, अनंत हे आहेत।
ब.वचन विकल्प जेवढे असती, नयहि तेवढे असतात।।
क.प्रवचनसारामधेच नय हे, सत्तेचाळिस सांगितले।
ड.मोक्षशास्त्र ग्रंथात सात हे, नैगमादि नय सांगितले।।
ई.द्रव्यार्थिक अन् पर्यायार्थिक, हेच दोन नय आहेत।
निश्चय अन् व्यवहार दोन हे, भेद नयाचे आहेत।।

151. **निश्चय नय म्हणतात कशाला, हे गुरुराया! सांगावे।**
जो आत्माश्रित कथन करितसे, तो निश्चय नय जाणावे।।

152. **निश्चय याच नयाच्या व्याख्या, अन्य कोणत्या आहेत?**
निश्चय याच नयाच्या व्याख्या, दुसऱ्या अनेक आहेत।।
क.जो नय कथन करी आत्म्याच्या, नित भूतार्थ स्वभावाचे।
तो निश्चय नय कथन करितसे, यथार्थ वस्तुस्वरूपाचे।।
ख.ज्या द्रव्याची जी पर्यायचि, निश्चित नियमित नित्य असे।
त्याला त्या द्रव्याची आहे, हे निश्चय नय सांगतसे।।
ग.निज द्रव्याला परद्रव्याला, त्यांच्या नित परिणमनाला।
निश्चय नय सांगतो यथावत, त्यांच्या कारण कार्याला।।

**प्रश्न** 153 : निश्चयनयाचे भेद किती व कोणते आहेत ?

**उत्तर** : निश्चयनयाचे चार भेद आहेत[1] –

1) परमशुद्धनिश्चयनय, **जसे** – जीव सत्ता, चैतन्य व ज्ञानादी शुद्ध प्राणाने जीवंत आहे.

2) शुद्धनिश्चयनय/साक्षात शुद्धनिश्चयनय, **जसे** – निरुपाधी स्फटिकमण्यासमान आत्मा समस्त रागादी विकल्परूप उपाधीने रहित आहे.

3) एकदेशशुद्धनिश्चयनय, **जसे** – परमध्यानामध्ये स्थित जीवाला परमात्मस्वरूप जाणणे वा म्हणणे.

4) अशुद्धनिश्चयनय, **जसे** – आत्मा संपूर्ण मोह-राग-द्वेषादीरूप भावकर्माचा कर्ता व भोक्ता आहे.

**प्रश्न** 154 : व्यवहारनय कशाला म्हणतात ?

**उत्तर** : जो नय पराश्रित कथन करतो; त्याला व्यवहारनय म्हणतात.[2]

**प्रश्न** 155 : व्यवहारनयाच्या दुसऱ्या कोण-कोणत्या व्याख्या आहेत ?

**उत्तर** : व्यवहारनयाच्या दुसऱ्या देखील अनेक व्याख्या आहेत –

अ) जो नय आत्म्याच्या अभूतार्थ स्वभावाचे कथन करतो त्याला व्यवहारनय म्हणतात.[3]

ब) जो नय वस्तुच्या अयथार्थ स्वरूपाचे कथन करतो त्याला व्यवहारनय म्हणतात.[3]

क) जो नय ज्या द्रव्याची जी पर्याय आहे त्याला त्या द्रव्याची न सांगता दुसऱ्या द्रव्याची सांगतो; त्याला व्यवहारनय म्हणतात.[3]

ड) जो नय स्वद्रव्याला, त्याच्या अवस्थेला व कारण-कार्यादिकांना अयथार्थ सांगतो; त्याला व्यवहारनय म्हणतात.[3]

---

1) परमभावप्रकाशक नयचक्र पृष्ठ–76 ते 87.

2) समयसार गाथा–272 ची टीका.

3) मोक्षमार्गप्रकाशक पृष्ठ–248 ते 257, आलापपद्धती सूत्र–205 ते 211 आणि 218 ते 225.

**153. निश्चय याच नयाचे भेदचि, किती कोणते आहेत ?**
**नावे त्यांची सांगा गुरुजी ! कोण कोणती आहेत ?**

1. परमशुद्धनिश्चयनय हा तर, जाणा पहिला भेद असे।
जसे जीव चैतन्य ज्ञानमय, प्राणाने जीवंत असे।।
2. दुसरा भेद शुद्धनिश्चयनय, जाणुनि घ्यावा हाच असे।
जसे उपाधि विहीन स्फटिक मणि, या जगती नित दिसत असे।।
तसेच रागादिक भावांनी, आत्मा हाच विहीन असे।
सर्व विभाव विकल्पांनी हा, आत्मा नित्य विहीन असे।।
सर्व विकार विवर्जित आत्मा, सर्व उपाधी रहित असे।
हा साक्षात शुद्धनिश्चयनय, सांगे आत्मा शुद्ध असे।।
3. एकदेश शुद्धचि निश्चयनय, तिसरा भेद असे म्हणतो।
जसे परमध्यानी स्थित जीवा, परमात्म्यासम नित म्हणतो।।
4. अशुद्धनिश्चयनय हा चवथा, जाणुनि घ्यावे भेद असे।
जसे रागद्वेषाचा कर्ता, भोक्ता हाआत्माच असे।।

**154. अन् व्यवहार नयाची व्याख्या, सांगा मला काय आहे ?**
कथन पराश्रित जो नय करितो, तो व्यवहारचि नय आहे।।

**155. या व्यवहार नयाच्या व्याख्या, अन्य कोणत्या आहेत ?**
या व्यवहार नयाच्या व्याख्या, ऐका अनेक आहेत।।

**अ.** जो नय आत्म्याचा अभूतार्थमय, स्वभाव वर्णन करितसे।
ज्ञानी पुरुष तयाला नित्यहि, व्यवहारचि नय म्हणत असे।।
**ब.** जो नय वस्तु स्वरूपाचे नित, यथार्थ वर्णन करित नसे।
संत पुरुष त्यालाच नित्यहि, व्यवहारचि नय म्हणत असे।।
**क.** ज्या द्रव्याची जी पर्यायचि, असते ती त्या द्रव्याची।
जो नय सांगत नसे परंतू, तो सांगे परद्रव्याची।।
**ड.** स्वद्रव्य अन् परद्रव्यालाही, अन् त्यांच्याच अवस्थेला।
हा नय नित अयथार्थ सांगतो,त्यांच्या कारण कार्याला।।
या व्यवहार नयाच्या व्याख्या, आचार्यांनी सांगितल्या।
अर्थ तयाचा अन् विशेषता, आचार्यांनी सांगितल्या।।

**प्रश्न** 156 : व्यवहारनयाचे भेद किती आहेत ?

**उत्तर** : व्यवहारनयाचे भेद चार आहेत –

1) अनुपचरितसद्भूतव्यवहारनय. **जसे** – जीवाचे केवलज्ञानादी गुण आहेत.

2) उपचरित सद्भूतव्यवहारनय. **जसे** – जीवाचे मतिज्ञानादी गुण आहेत.

3) अनुपचरित असद्भूतव्यवहारनय. **जसे** – जीवाचे शरीर आहे.

4) उपचरित असद्भूतव्यवहारनय. **जसे** – देवदत्ताचे धन.

**प्रश्न** 157 : **नय जाणल्यामुळे काय फायदे होतात ?**

**उत्तर** : नय जाणल्यामुळे आम्हाला अनेक फायदे होतात –

1) वस्तू निरपेक्ष असून स्वभावानेच अनेकांतात्मक आहे; तरी सुद्धा त्याचे कथन सापेक्ष आहे. म्हणून अल्पज्ञ जीवाला वस्तूचे कथन करण्यासाठी व वस्तूला जाणण्यासाठी नयज्ञानाची गरज आहे; असे समजते.

2) नयज्ञानामुळे ज्ञेय वस्तूमध्ये गौण-मुख्य करणे संभवते. म्हणूनच वर्तमानकालीन पर्याय अशुद्ध असतांना देखील शुद्धस्वभावाची मुख्यता करून मोक्षमार्ग प्रगट करणे शक्य होते.

3) ध्यान करण्यायोग्य/ध्येयरूप निज त्रिकाली शुद्धात्मा लक्षात येतो.

4) विकल्पात्मक नयज्ञानाशिवाय निर्विकल्पस्वरूप आत्मानुभूती होत नाही. म्हणून नयाज्ञानामुळे वीतरागता/धर्म प्रगट करण्याची कला समजून येते.

5) निश्चय-व्यवहारनयाच्या कथनामध्ये वरवर पाहता भासीत होणारा विरोध नाहीसा होतो.

6) जैनेतरामध्ये नसलेल्या नयज्ञानामुळे जैनधर्माची सत्यता, सूक्ष्मता समजते व जिनधर्मासंबंधी श्रद्धा दृढ बनते.

**156. या व्यवहार नयाचे सांगा, भेद कोणते आहेत ?**

या व्यवहार नयाचे जाणा, भेद चार हे आहेत।।
1.अनुपचरित सद्भूत प्रथम हा, नित व्यवहारचि नय जाणा।
केवलज्ञानादिक जीवाचे, गुण आहेत असे जाणा।।
2.अन् उपचरितहि सद्भुत दुसरा, व्यवहारचि नय जाणावे।
मतिज्ञानादिक गुण जीवाचे, जसे असे ते जाणावे।।
3.अनुपचरितहि असद्भूत हा, तिसरा नय व्यवहार असे।
या जीवाचे मन वाणी अन्, पंचेद्रिय अन् देह जसे।।
4.अन् उपचरित असद्भूत हा, चवथा नय व्यवहार असे।
धन दौलत अन् वैभव सारे, जीवाचे हे असे जसे।।

**157. हे गुरुराया ! नयज्ञानाने, किती फायदे होतात ?**

नयज्ञानाने ऐका जीवा, अनेक फायदे होतात।।
1.वस्तु असे निरपेक्ष सदा ही, कथन सदा सापेक्ष असे।
वस्तु अनेकांतात्मक आहे, नय अंशात्मक सांगतसे।।
वस्तु कथन अन् वस्तु ज्ञान हे, आवश्यक जीवास असे।
म्हणुनी या अल्पज्ञ जिवाला, नयज्ञानाची गरज असे।।
2.नयज्ञानाने ज्ञेयामध्ये, गौण मुख्यता संभवते।
नयज्ञानाने या जीवाची, मंदमती विकसित होते।।
वर्तमान पर्याय अशुद्धहि, मोक्षमार्ग पाहू शकते।
शुद्ध स्वभावाच्या प्रामुख्ये, स्वयं शुद्ध होवू शकते।।
3. ध्यानायोग्य त्रिकाली शाश्वत, परमशुद्ध निज आत्म्याचे।
नयज्ञानाने दर्शन होते, अपुल्या शुद्ध स्वभावाचे।।
4.विकल्पमय नयज्ञानाविण तर, निर्विकल्प निज अनुभूती।
होत नसे या जीवाला निज, शुद्ध स्वभावाची प्रीती।।
म्हणुनी या नयज्ञानाने नित, धर्मभावना मनि येते।
वीतरागता प्रगटविण्याची, सहज कला ध्यानी येते।।
5.निश्चय अन् व्यवहार नयांच्या, कथनामध्ये दिसणारा।
विरोध खोटा निघुनी जातो, वरवर हा भ्रम दिसणारा।।
6.जैनेतर धर्मामध्ये तर, नयज्ञानाचे कथन नसे।
म्हणुनी जिनधर्माची महती, सकल जनांना कळत असे।।
जिनधर्माची पूर्ण सत्यता, आणि सूक्ष्मता नित कळते।
मग श्री जिनधर्मावर निर्मळ, श्रद्धा भक्ती दृढ होते।।

# अहिंसा

अहिंसा धर्माला महत्त्व केवळ जैनधर्मामध्येच नसून जैनेतर धर्मांनी देखील अहिंसेला स्वीकारलेले आहे. विश्वशांतीसाठी देखील सर्व लोक अहिंसेला महत्त्वपूर्ण मानतात. जैनेतर धर्मापेक्षा जैनधर्माने स्वीकारलेल्या अहिंसेचे स्वरूप अतिशय सूक्ष्म व व्यापक आहे.

आचार्यश्री अमृतचंद्रांनी अहिंसेची व्याख्या करताना सांगितले आहे – "आत्म्यामध्ये मोह-राग-द्वेषरूप विकारी परिणामांची उत्पत्ती होणे हिंसा होय व त्यांची उत्पत्ती न होणे म्हणजेच अहिंसा होय. हाच जिनागमाचा सार आहे.[1]"

अहिंसेचे स्वरूप समजण्यासाठी हिंसेच्या स्वरूपाचा पण सूक्ष्मरीतीने विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

हिंसेचे दोन प्रकार आहेत– 1) भावहिंसा व 2) द्रव्यहिंसा.[2]

आत्म्यामध्ये मोह-राग-द्वेषरूप विकारी परिणामांची उत्पत्ती होणे याला भावहिंसा म्हणतात.व भावहिंसेच्या निमित्ताने दुसऱ्या जीवाचा प्राणघात करणे, त्रास देणे, सतावणे, दुःखी करणे इत्यादी क्रियेला द्रव्यहिंसा म्हणतात. हिंसा इत्यादी पाच पापामध्ये हिंसेलाच महान पाप म्हटले आहे. म्हणून आम्हाला हिंसेचा प्रयत्नपूर्वक त्याग केला पाहीजे.

---

1) पुरुषार्थसिद्ध्युपाय श्लोक–44.

2) पुरुषार्थसिद्ध्युपाय श्लोक–51, 58.

*आत्म्याच्या शुद्धोपयोरूप परिणामांचा घात होणे ही हिंसा आहे. असत्यवचन इत्यादींचे भेद तर फक्त शिष्यांना समजाविण्याकरीता उदाहरणस्वरूप सांगितले आहेत.* – पुरुषार्थसिद्ध्युपाय, श्लोक-42

# अहिंसा

एक अहिंसा धर्म खरोखर, जिनधर्माचे सार असे।
जिनधर्माचे मर्म असे हा, विश्व शांति आधार असे।।
जैनेतर धर्मांनी केला नित, स्वीकार अहिंसेचा।
अन् सामान्य जनांनी केला, जयजयकार अहिंसेचा।।
एक अहिंसा तत्त्व अलौकिक, नरजीवन अमृत आहे।
संसारातील दुःखावरती, शुद्ध रसायन घन आहे।।
लोक आणि परमार्थाचे हे, पावन सुख साधन आहे।
परमानंदाच्या प्राप्तीचे, हेच सहज कारण आहे।।
जिनधर्मात अहिंसेचे जे, व्यापक सूक्ष्म कथन आहे।
आणि अहिंसेचे स्वरूप जे, अपूर्व सर्वंकष आहे।।
जैनेतर धर्मात नसे ते, हे संतांचे वचन असे।
म्हणुनि अहिंसा एक धर्म हा, सर्वमान्य जगतात असे।।
श्री अमृतचंद्रांनी केली, व्याख्या एक अहिंसेची।
तर्क शुद्ध अन् प्रामाणिक या, जिन भारती रहस्याची।।
राग द्वेष आत्म्यातचि होणे, ही तर हिंसा जाणावी।
अन् त्यांची उत्पत्ति न होणे, हीच अहिंसा जाणावी।।
जिनागमाचा सार असे हा, सांगितला संक्षेपात।
आचार्यांनी हा सांगितला, अपूर्व अनुपम सिद्धांत।।
तत्त्व अहिंसा जाणुनि घेण्या, हिंसेला जाणुनि घेणे।
अति आवश्यक कार्य असे हे, सूक्ष्म निरीक्षण ही करणे।।
भाव द्रव्य हिंसेचे दोनच, भेद असे हे नित जाणा।
राग द्वेष आत्म्यातच होणे, हीच भाव हिंसा जाणा।।
याच भाव हिंसेच्या द्वारे, रडणे ओरडणेच सदा।
अशुभ अनर्गल शब्द बोलणे, दुसऱ्यांना दुखविणे सदा।।
दीन हीन निर्बल जीवांचा, प्राण घात करणेच सदा।
अज्ञानी भोळ्या जीवांचे, शोषण करणे फार सदा।।
याच सर्वही पाप क्रियांना, नित्य द्रव्य हिंसा जाणा।
पाचही पापामधेच हिंसा, महान पाप असे जाणा।।
म्हणुनी संतांनी सांगितले, हिंसेचा नित त्याग करा।
आणि अहिंसा धर्म पाळुनी, उत्तम सुखमय मार्ग धरा।।

**प्रश्न** 158 : गृहस्थ जीवनामध्ये सर्व प्रकारच्या हिंसेचा त्याग करणे कसे शक्य आहे ?

**उत्तर :** गृहस्थ जीवनामध्ये आरंभी, उद्योगी, व विरोधी हिंसेचा त्याग करणे जरी शक्य नसले तरी संकल्पी हिंसेचा त्याग तर करता येतोच. **प्रत्येक जैन मनुष्य संकल्पी हिंसेचा त्याग करतोच.**[1]

**प्रश्न** 159 : संकल्पी हिंसा कशाला म्हणतात ?

**उत्तर :** निर्दय परिणामाने निरपराधी जीवांचा जाणून-बुजून/उद्देशपूर्वक प्राणघात करणे, याला संकल्पी हिंसा म्हणतात. **जसे** – ढेकूण, विंचू, साप इत्यादी जीवांना मारणे. **संकल्पी हिंसा करणाऱ्या मनुष्याला जैन म्हणता येत नाही.**

**प्रश्न** 160 : उद्योगी हिंसा कशाला म्हणतात ?

**उत्तर :** शेती, व्यापारादी उद्योग करीत असतांना हिंसा न व्हावी अशी दक्षता बाळगून देखील जी हिंसा होते, त्याला उद्योगी हिंसा म्हणतात. **जसे** – शेती नांगरत असतांना होणारी हिंसा.

**प्रश्न** 161 : आरंभी हिंसा कशाला म्हणतात ?

**उत्तर :** स्वयंपाक किंवा झाडलोट इत्यादी घरची कामे करीत असतांना हिंसा न व्हावी अशी भावना ठेवून व प्रयत्न करूनही जी हिंसा होते, त्याला आरंभी हिंसा म्हणतात.

1) रत्नकरण्ड श्रावकाचार अधिकार–3 श्लोक–53 ची पं. सदासुखदासजींची टीका.

*जर एका जीवाला (मुंगी, मुंगळा, डास इत्यादीला) मारल्यामुळे श्रावकाचा रोग दूर होत असेल, एखादी आपत्ती/संकट दूर होत असेल तरी देखील जगण्याच्या आशेने/लोभाने दयावान श्रावक त्रस जीवांचा घात करीत नाहीत.*

**– रत्नकरंड श्रावकाचार (पं. सदासुखदासजी टीका), तृतीय खंड, शलोक-53**

158. **सर्वप्रकारे करु शकतो का, त्याग गृहस्थहि हिंसेचा ?**
काही अंशी गृहस्थ करतो, त्याग जीवनी हिंसेचा ।।
आरंभी उद्योगी जाणा, आणि विरोधी संकल्पी ।
यातुन हाच गृहस्थ सोडतो, एकच हिंसा संकल्पी ।।
संकल्पी हिंसा त्यागी जो, तोच खरोखर जैन असे ।
जिनधर्माचा भक्त असे तो, गृहस्थ सेवक तोच असे ।।

159. **संकल्पी हिंसेची व्याख्या, सांगा मजला गुरुराया !**
**महत्त्व त्याचे अर्थ तयाचा, सांगा मजला गुरुराया !!**
कठोर निर्दय परिणामांनी, प्राणघात बुद्ध्या करणे ।
निरपराध निर्बल जीवांचे, छळुनी प्राण हरण करणे ।।
ही संकल्पी हिंसा जाणा, पाप भयंकर हेच असे ।
ढेकुण विंचू जसे चिरडणे, माशी मुंगीलाच जसे ।।
जो संकल्पी हिंसा करतो, जैन नसे तो जैन नसे ।
जिनानुगामी गृहस्थ सज्जन, उत्तम श्रावक तोच नसे ।।

160. **उद्योगी हिंसेची व्याख्या, सांगा मजला गुरुराया !**
**अर्थ तयाचा कार्य तयाचे, सांगावे मज गुरुराया !!**
व्यापारादिक उद्योगातच, अन् शेतीच्या धंद्यात ।
सावधान असुनी ही होते, हिंसा या व्यवसायात ।।
अकस्मात इच्छेविण होते, हिंसा साऱ्या धंद्यात ।
ही आहे उद्योगी हिंसा, श्री आचार्य हे सांगतात ।।
जसे शेत नांगरतांना नित, निश्चित हिंसा होत असे ।
अन् मळणी करतांना ही, नित निश्चित हिंसा होत असे ।

161. **आरंभी हिंसेची व्याख्या, सांगा मजला गुरुराया !**
**अर्थ तयाचा कार्य तयाचे, सांगावे मज गुरुराया !!**
स्वयंपाक करतांना होते, हिंसा भोजन करतांना ।
गृह कार्यातच हिंसा होते, जलसिंचनही करतांना ।।
हिंसेची भावनाच नसता, हिंसा नियमित होत असे ।
ही आरंभी हिंसा आहे, संत पुरुष नित सांगतसे ।।

**प्रश्न 162 :** विरोधी हिंसा कशाला म्हणतात ?

**उत्तर :** आपल्यावर, आपल्या कुटुंब परिवार अथवा मंदीरावर शत्रूंनी आक्रमण केले असता स्वसंरक्षणाचा प्रयत्न करीत असतांना अनिच्छेपूर्वक होणाऱ्या हिंसेला विरोधी हिंसा म्हणतात.

**प्रश्न 163 :** वरील चारही प्रकारच्या हिंसेचा त्याग कोण करू शकतो ?

**उत्तर :** दिगंबर जैन मुनिराजच (आचार्य, उपाध्याय, साधू) वरील चारही प्रकारच्या हिंसेचा त्याग करतात. म्हणूनच शास्त्रात सांगितलेल्या विधीला अनुसरून श्रावक आहारादानादीरूपाने त्यांची सेवा भक्ती करतात व करावयास पाहिजे.

परम अहिंसा धर्माचे पालन करणारे मुनिराज व वीतरागी तथा सर्वज्ञ भगवानच आपले आदर्श आहेत. ज्यांच्या जीवनात किंचित् मात्र देखील हिंसा घडते; ते आमचे आदर्श होऊ शकत नाहीत.

● ● ●

*षट्काय जीवन हननतैं, सब विधि दरबहिंसा टरी।*
*रागादि भाव निवारतैं, हिंसा न भावित अवतरी।।*

*षट्कायिक (पृथ्वीकाय इत्यादी पाच स्थावरकाय जीव व एक त्रसकाय) जीवांचा घात न करण्याच्या परिणामाने सर्व प्रकारची द्रव्यहिंसा दूर होते अर्थात् द्रव्यहिंसेपासून मुनिराज विरक्त असतात; तसेच राग-द्वेष, काम, क्रोध, मान, माया, लोभ इत्यादी परिणामांना दूर सारल्यामुळे मुनिराजांच्या जीवनात भावहिंसा सुद्धा होत नाही. अशाप्रकारे भावलिंगी मुनिराज या दोन – द्रव्याहिंसा व भावहिंसेपासून विरक्त असतात. म्हणून त्यांच्या जीवनात अहिंसा महाव्रताची साधना सतत होत असते.*

— छहढाला ढाल-6, पद्य-1

162. **आणि विरोधी हिंसेची मज, व्याख्या सांगा गुरुराया !**
**अर्थ तयाचा महत्त्व त्याचे, सांगावे मज गुरुराया !!**
अपुले अन् अपुल्या धर्माचे, नित संरक्षण करतांना।
देश समाज व परिवाराचे नित, संरक्षण करतांना।।
इच्छा नसता हिंसा होते, असे विरोधी हिंसा ही।
जिनधर्माचा पालक श्रावक, निरिच्छ होवुनि करतो ही।।

163. **हे गुरुराया ! मजला सांगा, चार भेद हे हिंसेचे।**
**कोण सोडतो सर्वप्रकारे, पापी जीवन हिंसेचे ?**
जैन दिगंबर केवळ मुनिवर, त्याग करितसे हिंसेचा।
महाव्रती मुनि सर्वप्रकारे, समस्त पाचही पापांचा।।
वीतराग आचार्य देव अन्, उपाध्याय अन् साधूंना।
आहार देता पुण्य मिळतसे, निर्मोही निर्ग्रंथांना।।
श्री अरिहंत सिद्ध परमात्मा, श्री आचार्य उपाध्याय।
सर्व साधु या परमेष्ठींचे, पूज्य असे आम्हा पाय।।
हेच पंच परमेष्ठी जगती, वंदनीय नित सर्वांना।
यांच्या उपदेशाने दिसतो, नित पावन पथ मोक्षाचा।।
हेच असे आदर्श आमुचे, पूर्ण अहिंसक देव गुरू।
अतिशय भाव भक्तिने यांचे, मंगलमय श्री चरण धरू।।
यांना सोडुनि कुणीच नाही, वंदनीय या जगतात।
साध्य हेच आराध्य आमुचे, त्रिकाल अविरत जगतात।।
पाप निकंदन पुण्य उपार्जन, स्वर्ग मोक्ष साधन आहे।
परम पंच परमेष्ठी पावन, भवसागर नावचि आहे।।
जिनेश्वराचा परम अहिंसा, धर्म एक उज्ज्वल आहे।
परम श्रेष्ठ हा परमप्रकाशक, परमोत्तम मंगल आहे।।
या धर्माची ध्वजा पताका, त्रैलोक्यामधि फडकवुया।
या धर्माचा प्रकाश दीपक, त्रैलोक्यामधि मिरवूया।।
या धर्माचे पालन करुनी, परमात्मपद मिळवूया।
सुख शांतीमय सहज सुधारस, श्रद्धेने प्राशन करूया।।

● ● ●

# मैं ज्ञानानंद स्वभावी हूँ

मैं हूँ अपने में स्वयंपूर्ण, पर की मुझमें कुछ गंध नहीं।
मैं अरस अरूपी अस्पर्शी, पर से कुछ भी संबंध नहीं।।

मैं रंग-राग से भिन्न, भेद से भी मैं भिन्न निराला हूँ।
मैं हूँ अखंड चैतन्यपिंड, निज रस में रमनेवाला हूँ।।
मैं ही मेरा कर्ता-धर्ता, मुझ में पर का कुछ काम नहीं।
मैं मुझ में रहनेवाला हूँ, पर में मेरा विश्राम नहीं।।
मैं शुद्ध बुद्ध अविरुद्ध एक, पर-परिणति से अप्रभावी हूँ।
आत्मानुभूति से प्राप्त तत्त्व, मैं ज्ञानानंद स्वभावी हूँ।।

– डॉ. हुकमचंद भारिल्ल

# मेरा धाम

शुद्धातम है मेरा नाम, मात्र जानना मेरा काम।
मुक्तिपुरी है मेरा धाम, मिलता जहाँ पूर्ण विश्राम।।

जहाँ भूख का नाम नहीं है, जहाँ प्यास का काम नहीं है।
खाँसी और जुखाम नहीं है, आधि-व्याधि का नाम नहीं है।
सत् शिव सुंदर मेरा धाम, शुद्धातम है मेरा नाम।
मात्र जानना मेरा काम।।1।।

स्वपर-भेद विज्ञान करेंगे, निज आतम का ध्यान करेंगे।
राग-द्वेष का त्याग करेंगे, चिदानंद रसपान करेंगे।।

सब सुख दाता मेरा धाम, शुद्धातम है मेरा नाम।
मात्र जानना मेरा काम।।2।।

– डॉ. हुकमचंद भारिल्ल

# अरहंत स्तुति

जयाची महाघोर कर्मे निमाली । खरी ज्ञानदृष्टी जया प्राप्त झाली ।
हिताचाच जो मार्ग दावी जनाला । सदा भक्तीभावे नमू त्या जिनाला ।। 1 ।।
परंज्योति जो केवलज्ञान भानू । असे भव्य लोकास जो कामधेनू ।
जया पाहता शांति होते मनाला । सदा भक्तीभावे नमू त्या जिनाला ।। 2 ।।
नको संसृतीचा पसारा मनाला । असे पूर्ण वैराग्य वाटून ज्याला ।
तपाने भवातून जो मुक्त झाला । सदा भक्तीभावे नमू त्या जिनाला ।। 3 ।।
सभामंडपी अंतराळी विशाल । जणू दिव्यमूर्ती दिसे सूर्य गोल ।
जयावाचुनी सौख्य नाही जनाला । सदा भक्तीभावे नमू त्या जिनाला ।। 4 ।।
जयाचि महादिव्यवाणी उदेली । खरी आत्मतत्त्वे जगा दाखवीली ।
झणी नेतसे अज्ञता जो लयाला । सदा भक्तीभावे नमू त्या जिनाला ।। 5 ।।
जयाचा यशोदुंदुभी नित्य गाजे । महाप्रातिहार्ये सदा जो विराजे ।
महेंद्रास जो सर्वदा वंद्य झाला । सदा भक्तीभावे नमू त्या जिनाला ।। 6 ।।
जयापासुनी शोक गेला लयाला । म्हणूनी अशोकास जो प्राप्त झाला ।
टिळा जो असे खास भूमंडळाला । सदा भक्तीभावे नमू त्या जिनाला ।। 7 ।।
प्रभा फाकली सर्व लोकात ज्याची । जगी जाहली कीर्ति ज्याच्या गुणांची ।
त्रिलोकास जो सर्वदा वंद्य झाला । सदा भक्तीभावे नमू त्या जिनाला ।। 8 ।।
जयाची महाभारती रत्नमाला । गळा घालुनी भूषवी जो तनूला ।
खरा या जगी तोच जन्मास आला । सदा भक्तीभावे नमू त्या जिनाला ।। 9 ।।
महामंत्र उच्चारिता जीवकाने । सुखे सोडिला प्राण ज्या कुक्कुराने ।
जयाच्या बले तो पहा देव झाला । सदा भक्तीभावे नमू त्या जिनाला ।। 10 ।।
जयाच्या णमोकार मंत्रे अनेक । जगी जाहले मुक्त योगींद्र लोक ।
समुद्रातुनी भूपही पार झाला । सदा भक्तीभावे नमू त्या जिनाला ।। 11 ।।
जली मंत्र ज्याचा लिहूनी कराने । स्वयं त्यावरी ठेविला पाय ज्याने ।
महीपाल तो पोचला दुर्गतीला । सदा भक्तीभावे नमू त्या जिनाला ।। 12 ।।
जयाचे सदा नाम योगींद्र घेती । सदा किर्ती गाती जगी भव्यपंक्ती ।
णमोकार ज्यांचा जना गोड झाला । सदा भक्तीभावे नमू त्या जिनाला ।। 13 ।।

उठा ! बंधूनो आठवू त्या प्रभुला ।तयाच्या गुणांची स्तुती गावयाला ।
मुखे आदरे लावू या हो ! जनाला । सदा भक्तीभावे नमू त्या जिनाला ।। 14 ।।

## भगवान बनेंगे

सम्यग्दर्शन प्राप्त करेंगे । सप्त भयों से नहीं डरेंगे ।। 1 ।।
सप्त तत्त्व का ज्ञान करेंगे । जीव-अजीव पहिचान करेंगे ।। 2 ।।
स्व-पर भदेविज्ञान करेंगे । निजानंद रसपान करेंगे ।। 3 ।।
पंच प्रभु का ध्यान करेंगे । गुरुजन का सम्मान करेंगे ।। 4 ।।
जिनवाणी का श्रवन करेंगे । पठन करेंगे मनन करेंगे ।। 5 ।।
रात्रि भोजन नहीं करेंगे । बिना छना जल काम न लेंगे ।। 6 ।।
निज स्वभाव को प्राप्त करेंगे । मोह भाव का नाश करेंगे ।। 7 ।।
राग-द्वेष का त्याग करेंगे । और अधिक क्या बोलो ! बालक ।। 8 ।।
भक्त नहीं भगवान बनेंगे ।।

●

### या आवृत्तीला अल्पमूल्यात उपलब्ध करण्यासाठी सहकार्य करणाऱ्यांची नामावली

| | |
|---|---|
| 1) श्री अमोलक रतीलाल शहा,सोलापूर | 1011=00 |
| 2) श्री प्रीतमकुमार मोतीचंद दोशी, पंढरपूर | 525=00 |
| 3) श्री रायचंदभाई दोशी, नातेपुते | 501=00 |
| 4) श्री चंद्रकांत फूलचंद शहा गांधी, सोलापूर | 501=00 |
| 5) श्री प्रवीणभाई व्होरा (गुजरात जनरल स्टोअर्स),सोलापूर | 501=00 |
| 6) श्री कस्तूरचंद गुलाबचंद गांधी, सोलापूर | 501=00 |
| 7) सौ. प्रणया अमोल शहा, सोलापूर | 101=00 |
| 8) सौ. पार्वतीबाई माधवराव गुंगे, साखरा | 101=00 |
| एकूण | 3742=00 |